५८

म. ग्रं. सं. ठाणें

विषय
निबंध

संग्रहालय क्रमांक
७९
५८

लेखक एक सनातन वैदिक धर्माभिमानी

पुस्तकाचें नांव सत्यशोधकांचे असत्य प्रलाप

सन

७९
संक्र.

# सत्यशोधकांचे असत प्रलाप.

निबंध

अभिप्रायार्थ नि. २०७

...संकात अभिप्राय मिळाला.

...अभिप्राय येईल तो बडोदे फले

...यांच्या पत्त्यावर पाठवावा.



फले.

सं. नि. २०३

मराठी ग्रंथ संग्रहालय
१८०५

नि. १४ / २

# ...त्यशोधकांचे असत्यप्रलाप

अथवा

"धर्म ढोंग परिस्फोटण" या पुस्तकाचें

सशास्त्रखंडन

हें

पुस्तक

एका सनातनवैदिकधर्माभिमानीगृहस्थानें

तयार केलें

तें

बडोदें येथें "फत्तेसिंह" छा० छा०

आवृत्ति पहिली प्रती १०,०००

सन १८९३

किंमत चार आणे.

...ठी ग्रंथ संग्रहा...

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

श्री

# अर्पणपत्रिका.

वीरक्षेत्रसनातनवैदिकधर्म मंडळींचें स्वध-
र्माच्या अभ्युत्कर्षार्थ प्रयत्न करणें, ईश्वर-
प्रणीत वेदांच्या गंभीरतत्वांचा विचार
करणें, अज्ञमतांच्या विध्वंसनार्थ
त्यांचे चाललेले अत्यंत प्रयत्न
इत्यादि अभिनंदनीय गो-
ष्टी मनांत आणून हें
लहानसें पुस्तक
ह्या मंडळींच्या
चरणसरो-
जीं अर्पण
करितों.

# प्रस्तावना.

कै० विष्णु शास्त्री चिपळूणकर यांनीं निबंधमालेंत सत्यशोधक समाजांतील पुढाऱ्यासंबंधानें केलेल्या टीकेवर अलिकडच्या विचित्ररीतीनें सुधारलेल्या मराठे लोकांनीं मुद्दाम झांकण घालून, स्वतःचें मत पुनः प्रचालित करण्याकरितां त्यांनीं आकटोविकट प्रयत्न चालविले आहेत. अज्ञजनांचीं मतें नेहमीं अज्ञानभरित असणें स्वाभाविक आहे. धर्माचें खरें रहस्य काय आहे, हें जोंपर्यंत अज्ञानजनांस समजणार नाहीं, तोंपर्यंत त्यांच्या तर्कास महत्व देतां येत नाहीं. त्यांनीं केलेल्या ह्या निरर्थक वल्गना आहेत असेंच आमचे श्रेष्ठ लोक समजतील.

ह्या अज्ञमतपरिपूर्ण लोकांनीं मुंबई, पुणें, जुन्नर इत्यादि ठिकाणीं समाज स्थापन केले आहेत. आमच्या या गायकवाडी धर्मराज्यांतही त्यांनीं एक लहानसा समाज स्थापिल्याचें समजतें. ज्या मुसलमान लोकांनीं एका हातांत तरवार व दुसऱ्या हातांत कुराण घेऊन ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र इत्यादि सर्व हिंदुलोकांस बाटविण्याचा प्रयत्न केला; तथापि हिंदुलोकांचा सनातनआर्यधर्म जसाच्या तसाच कायम राहिला आहे, आणि याच उदाहरणावरून पुढें यावच्चंद्रदिवाकर तो तसाच राहणार हें निःसंशय आहे. अर्थात् या तुटपुंज्या समाजाच्यानें आमच्या वैदिकधर्माचा एक केंसही वांकडा व्हावयाचा नाहीं हें निर्विवाद आहे. तथापि कडुवृंदावनासारख्या बाहेरील रूपास भुलून कुलिन मराठे लोक न फसावेत एतदर्थच माझा हा प्रयत्न आहे. यांत कोणा व्यक्तिविषयीं द्वेषभाव

मुळींच केला नाहीं; सत्यशोधकांनीं आरंभिलेलें कृत्य केवळ विष कालविलेलें अन्न आहे; त्याचा स्वीकार करून पश्चात्तापांत पडणें, या-पेक्षां पूर्वींच त्यापासून अलिप्त राहणें अधिक हितावह आहे. आणि माझी ही इच्छा कुलिन मराठे लोक पूर्णकरतील अशी माझी सृष्टि-कर्त्यां परमेश्वरास सविनय प्रार्थना आहे.

प्रस्तुत पुस्तक पुणें येथलि सत्यशोधकसमाजांतील प्रसिद्ध उपदेशक जे दाजीसाहेब तुकाराम यादवराव पाटील उर्फ गोपाळे यांनीं केलेल्या " **धर्म ढोंग परिस्फोटण** " ह्या पुस्तकाचें खंडन-विषयक आहे. अर्थात् यांतील प्रतिपादन मूळ पुस्तकाच्या विरुद्ध व त्यांतलि विवेचनाच्या धोरणास अनुसरून असणें हें स्वाभाविक आहे. मूळ पुस्तक एकच विषयावर अवलंबित नाहीं; इतकेच नव्हे तर त्यांत धर्मशास्त्रांतील अनेक गोष्टींचा समावेश केला असल्या-मुळें ह्या टीकाविषयक पुस्तकालाही तेंच वळण द्यावें लागलें.

प्रस्तुत पुस्तकाच्या मुखपृष्ठावर मीं आपलें नांव प्रदर्शित केलें नाहीं, त्यामुळें कित्येक टीकाकारांस छिद्रस्थळ सांपडेल; परं-तु त्यानां माझें असें सांगणें आहे कीं, पुस्तकावर नांव छापवून मी एक मोठा विद्वान् अथवा ग्रंथकर्ता आहे असें लोकांस ठरवून, [illegible] डकाविणें हें मला मुळींच प्रशस्त दिसत नाहीं. माझ्या [illegible] जें सत्य दिसलें तें मी वेड्यावांकड्या रीतीनें पुढें आणि-[illegible] डे सज्जन दृष्टि देतील अशी मी अपेक्षा ठेवितों.

[illegible] तारीख १ माहे सप्टेम्बर [illegible] २३ इ० शुक्रवार.

पुस्तककर्ता.

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ | ओळ | अशुध्द. | शुध्द. |
|---|---|---|---|
| १ | १० | ऊपेदशक | उपदेशक |
| १६ | ११ | ब्राह्मांनींच | ब्राह्मणांनींच |
| २९ | ६ | नाहिंत | नाहींत |
| ३१ | २२ | ब्राह्मणवंधुनीं | ब्राह्मणबंधुंनीं |
| ३४ | ९ | धर्माध्यक्षांनों | धर्माध्यक्षांनीं |
| ” | २४ | मीळतो | मिळतो |
| ३७ | १७ | करणाचा | करण्याचा |
| ” | १८ | स्यतःच्या | स्वतःच्या |
| ४० | ८ | अशांतल | अशांतला |
| ४९ | ९ | तामसीवत्तीच्या | तामसीवृत्तीच्या |
| ४६ | २९ | यतअर्थी | त्याअर्थी |
| ” | ” | क | करा |
| ४७ | २४–२९ | केयलस | केल्यास |
| ९८ | १३ | मनुप्यास | मनुष्यास |
| ६७ | १८ | अश्लद्दय | अश्लाघ्य |
| ६८ | २१ | सत्यतेकीरतां | सत्यतेकरितां |
| ७० | २१ | कोणतों | कोणतीं |

विशेष सूचनाः—या प्रथमावृत्तींत हेस्तदोषानें अशुद्धें राहिलीं आहेत, तीं अगोदर दुरस्त करून नंतर वाचण्यास सुरुवात करावी.

पुस्तककर्त्ता.

श्री.

# सत्यशोधकांचे असत्यप्रलाप

अथवा

## "धर्मढोंगपरिस्फोटन" या पुस्तकाचें सशास्त्रखंडन.

यस्त्वधर्मेषु निरतः सर्वलोकविरोधकृत् ।
तं रिपुं परमं विद्याच्छास्त्राणामेष निर्णयः ॥ *

बृहन्नारदीयपुराणपूर्वार्ध प्र. पाद अ. ८

मुंबई, पुणें, बडोदें इत्यादि ठिकाणीं मराठे-समाज स्थापन होऊन त्यांतील सभासद व प्रसिद्ध ऊपदेशक यांनी सनातनवैदिकधर्मावर येथेच्छ तोंडसुख घेण्यास आरंभ केला आहे. या अज्ञान ब्राह्मणेतरांना धर्माचें ज्ञान आहे किंवा नाहीं ? हा प्रश्न तूर्त एके बाजूस ठेवून त्यांचे विचार कितपत पोक्त व सत्यास अनुसरून आहेत ते पाहिले पाहिजेत. धर्माचें खरें रहस्य काय आहे; या तत्वास जोंपर्यंत ब्राह्मणेतर लोक अनभिज्ञ असणार, तोंपावेतों त्यांचे कुतर्क असेच चालणार यांत संशय नाहीं. विद्येंत मागें पडलेल्या लोकांस एकदम ती प्राप्त झाल्यामुळें त्यांना गर्वगिरीवर आरुढ होतां येणें व त्यांजकडून नित्यशः प्रमाद घडणें

---

* जो अधर्माच्याठायीं रत झालेला व लोकांशी विरुद्ध रीतीनें वागणारा तोच मोठा शत्रु समजला पाहिजे. असा शास्त्रांचा निर्णय ठरलेला आहे.

साहजिक आहे. धर्मतत्व इतकें गुप्त आहे कीं, तें बूटपाटलूण व चष्मे धारण करणारे, आणि आंग्लविद्यासुधारसाचा आकंठ-स्वाद घेणाऱ्या लोकांस कधींही समजणार नाहीं. कोणत्याही शास्त्राचें खरें ज्ञान झाल्यावांचून त्यांतील मूलतत्वांचा बोध होत नाहीं; हीच गोष्ट येथें लागू आहे. संस्कृतभाषा समजण्याची मारामार, आणि धर्मशास्त्रावर टीका करण्यास तयार होणारे असे जे लोक त्यांच्या ज्ञानाला काय म्हणावें ? जोंपर्यंत धर्मग्रंथांच्या भाषेचें पूर्ण ज्ञान होणार नाहीं, तोंपावेतों या लोकांच्या कुतर्कास महत्व देतां येत नाहीं.

पुणें येथील सत्यशोधकसमाजाचे प्रसिद्ध उपदेशक रा० दाजीसाहेब तुकाराम यादवराव पाटील ऊर्फ गोपाळे यांनीं " धर्म ढोंग परिस्फोटण " या नांवाचें पुस्तक इ० स० १८९२ सालीं मुंबईतील दीनवत्सल छापखान्यांत छापिलेलें माझ्या पाहण्यांत आलें. पुस्तककर्ते हे त्या समाजाचे उपदेशक व तेएक कवि असावेत असें मलपृष्ठावरून दिसतें.

" धर्म ढोंग परिस्फोटण " हें टोपण नांव धारण करून पुस्तककर्त्यानें मलपृष्ठ सुशोभित केलें आहे; परंतु धारण केलेलें नांव योग्य व शुद्ध आहे किंवा नाहीं ? हा प्रश्न प्रसिद्ध उपदेशकांच्या लक्षांत आला नाहीं असें वाटतें; नाहीं तर ते **परिस्फोटण** असें मुळींच न लिहिते. तसेंच पुस्तकाच्या नांवाचे शब्द तोडिलेले कां बरे आढळतात ? धर्मढोंगपरिस्फोटन हा सामासिकशब्द असता समासभंग होणें हें वैय्याकरणरीत्या अयोग्य आहे. शब्द तोडिल्यानें खऱ्या अर्थाचा मुळींच बोध होत नाहीं. " घोडा गाडी आली " हें वाक्य जितकें शुद्ध आहे तितकेंच या पुस्तकाचें नांव जें " धर्म ढोंग परिस्फोटण " हें शुद्ध आहे. मूळ नांवच खोटें तेथें सत्य तें कोठून आढळेल ?

मलपृष्ठावर एक शार्दूलविक्रीडित स्वकृत श्लोक ग्रंथकर्त्यानें दिला आहे. शार्दूलविक्रीडित वृत्ताचे कोण कोणते गण असतात; या गोष्टीस प्रसिद्ध उपदेशक अनभिज्ञ असावेत असें वाटतें. ह्या वृत्तांत पहिला मगण लागतो; परंतु येथें तर तगण आहे; हें " स्वज्ञाति " हें पहिलेंच पद पाहिलें असतां, खात्री होईल. "ज्ञाती कार्य" हा संयुक्त शब्द पाहिजे. दुसऱ्या चरणाच्या शेवटीं " पुरतें " असा शब्द आहे. " पु " ला गुरुत्व आलें पाहिजे होतें तें येत नाहीं; आणि या चुकीनें जेथें तगण पाहिजे तेथें भगण झाला आहे. तसेंच चवथ्या चरणांत प्रथम मगण पाहिजे तेथें रगण योजिला आहे; हें " बिंदु बिंदु " ह्या शब्दांवरून व्यक्त होतें. सत्यशोधक जर कवि असतील तर त्यांजकडून असे प्रमाद घडणें हें केवढें आश्चर्य ? सत्यशोधक या नांवाला वरील प्रमाद मुळींच शोभत नाहींत.असो; पुस्तककर्ता कोण? तो श्लोक किं गोपाळे? मलपृष्ठावरून तर तो श्लोक हा कर्ता व त्याला साहाय्य करणारा गोपाळे असेंच सिद्ध होतें. मग खरें काय असेल तें नकळे !

मलपृष्ठाच्या आंतील भागावर दोन दिंड्या व एक पद आणि शेवटच्या रंगीत पृष्ठाच्या अंतर्भागावर दोन अभंग व एक शार्दूलविक्रीडित श्लोक दिला आहे. त्यावरून गोपाळे हे एक शीघ्र कवि असावेत असें अनुमान होतें. या कवितेंतही वरप्रमाणेंच गण, मात्रा, स्वर इत्यादिकांची ओढाताण करून आलेला प्रसंग टाळून नेण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थगांभीर्य तर मुळींच आढळत नाहीं. दीनवत्सलाची स्तुति करून दोन दिंड्या भरून काढिल्या आहेत. पदामध्यें " कर्माची कहाणी गाया" हें पालुपद घालून कृपिकर्मांत विशेष आयास आहेत म्हणून त्याची निर्भत्सना केली आहे. शेत-

की करण्यांत आतिशय मेहनत पडते व त्या लोकांस पोटभर खाण्याला मिळत नाहीं म्हणून " शेतकी करू नका, विद्या शिका आणि कारकुनी करा. " हें सांगणें कितपत योग्य आहे त्याचें अनुमान सहज होईल. कृषिकर्मांत सुधारणा करून संपत्ति मिळवा, नेहमीं उद्योग करा, उद्योगावांचून उन्नति होत नाहीं; या तत्वास आमचे ब्राह्मणेतर अज्ञान असावेत असें वाटतें. कृषिकर्मांत सुधारणा करण्याकडे जर आमच्या सत्यशोधकमित्रानें दृष्टि दिली असती तर या भारतवर्षांतील आठ्ठावीस कोटी प्रजेवर अत्यंत उपकार झाले असते; परंतु दुःखाची गोष्ट ही कीं, गोपाळ्यासारख्या मनुष्याचें वरील महत्वाच्या गोष्टीकडे लक्ष गेलें नाहीं! ज्या धार्मिकविचारांत कोणत्याही प्रकारचा अर्थलाभ अथवा राष्ट्रोन्नति नाहीं अशा शुष्क, पाकनिष्पत्तिगृहासंबंधानें ऊहापोह करून कंठशोष करणें यापरता दुसरा अज्ञानपणा तो कोणता?

आमच्या देशांतील शेतकरी दारिद्र्यानें पीडित झाले आहेत, त्यासंबंधांत इंग्लीश व फ्रेंच लोकांची साक्षी दिली आहे. साक्षी देण्यासारखे दुसरे लोकच आढळले नाहींत त्याला ग्रंथकर्त्यानें तरी काय करावें? आमची गृहस्थिति इंग्लीश व फ्रेंचांना काय माहिती? भारतवर्षांत ते आज दोन तीन शतकें जरी राहतात; तरी आर्य लोकांचा खरा धर्म कोणता? असा त्या ईश्वरपुत्राचे गुणानुवाद गाणाऱ्या लोकांस प्रश्न केल्यास त्याचें उत्तर ते काय देतील? जे आमच्या येथें अज्ञान अथवा अनभिज्ञ त्यांचा पुरावा रुजू करण्यापेक्षां तीन महिन्यांच्या एखाद्या अर्भकाची साक्षी दिली असती तरी बरें झालें असतें.

आपल्या देशांतील शेतकऱ्यांची स्थिति अत्यंत दोषास्पद आहे हें मी कबूल करितों. शेतकींत सुधारणा करून गरीब

१०-८१

बिचाऱ्या शेतकऱ्यांच्या दुःखाचा नाश करण्याकरितां प्रयत्न करणें हें आपलें मुख्य कर्तव्यकर्म; असें असतां, उद्योग धंद्यांत गढून गेलेल्या लोकांच्या दुःखावर डाग देऊन त्यांच्या नैसर्गिक-धैर्यास फाटा देवविणें हा केवढा कृतघ्नपणा ?! कांहीं असो; आमच्या शेतकऱ्यांना साहाय्य करणें हाच आमचा धर्म. धान्याचा पुरवठा होण्याकरितां प्रयत्न करून देशाचा अभ्युत्कर्ष चिंतणें हें सज्जनाचें मूळ बीज; परंतु या लोकोपयुक्त गोष्टींकडे सत्यशोधकसमाजाच्या उपदेशकांचें अद्यापि लक्ष गेलें नाहीं; यापेक्षां दुसरें मोठें दुर्भाग्य तें कोणतें ?!

" दाजीराव कवन जें करितों घालवू नका श्रम वाया."
हें चरण पदाच्या शेवटीं आढळतें. त्यावरून पुस्तककर्त्यानेंच हें कवन केलें असावें असें वाटतें. या चरणांत श्रम वाया घालवू नका असें कवीनें सूचविलें आहे; परंतु अमुक धंदा करा असें मात्र सांगितलेलें आढळत नाहीं. धन्य आहे अशा ग्रंथकारांची अथवा उपदेशकांची कीं ते वाचकांस किंवा श्रोत्यांस नेहमीं सांगतात " अरे, तूं या रस्त्यानें कोठें जातोस, चुकतोसना ? " येथवरें म्हटलें म्हणजे उपदेशक आपणांस कृतार्थ मानितात; परंतु खरा मार्ग कोठें आहे, तो दाखविण्यास ते तयार होत नाहींत; हीच अवस्था दाजी साहेबांची. सन्मार्ग कोणता ? हें त्यांना माहित आहे किंवा नाहीं याचीच शंका वाटते. कदाचित माहीत आहे असें मानावें; तर यांनीं तो मुद्दाम कपटानें दाखविला नाहीं हें उघड आहे. असो; पुस्तकाच्या शेवटील मलपृष्ठाच्या अंतर्भागावर " विद्या शिका व ब्राह्मणांची निंदा करा, ते महान् दुष्ट आहेत; पेशव्यांनीं आपल्या लोकांची विद्या हिरावून घेतली. " इत्यादि प्रकारचे असत्योद्गार काढून " आम्ही सर्वज्ञ आहोंत " असा तदनुषंगी लोकांस आभास दाखविला आहे. अस्तु.

मित्रा, मी ब्राह्मण नव्हें; ब्राह्मणेतर, परंतु द्विजांतर्गत आहें. वरील लिहिण्याच्या झोंकावरून माझी गणना अज्ञानामुळें ब्रह्मवर्गांत होईल; परंतु तो समज केवळ चुकीचा आहे; हें नीट लक्षांत ठेव. माझ्या अल्पदृष्टीला जें खरें वाटलें, ज्याविषयीं माझा उत्तमोत्तम ग्रह झाला, अशीं जीं परम पवित्रब्रह्मवृंदें, त्यांच्यावर तूं आणिलेल्या खोट्या आरोपांच्या निरसनार्थ व सत्याच्या शुद्ध्यर्थ प्रयत्न करण्याचा माझा पूर्ण निश्चय ठरला आहे. सत्यशोधकसमाजासारख्या मोठ्या समाजाच्या प्रसिद्ध उपदेशका समोर लेखणी घेऊन उभें राहणें हें जरा अप्रशस्त तर खरेंच; परंतु सत्याच्या शुद्ध्यर्थ प्रयत्न करीत असतां, त्यांत माझा पराभव झाला, मी धुळीस मिळालों तरी हरकत नाहीं. माझ्या अल्पदृष्टीला जें खरें वाटलें तेंच आज जनसमूहापुढें आणिलें आहे. याकडे सत्यशोधकसमाजाचे प्रसिद्ध उपदेशक निःपक्षपातबुद्धीनें लक्ष देतील तर बरें पडेल.

शेवटील रंगीत पृष्ठाच्या अंतर्भागावर एक अभंग दिला आहे; तो पाहिला असतां हे दुसरे तुकारामबुवा तर निर्माण नाहींना झाले ? असा कित्येक लोकांस व तदनुयायी मंडळीस कदाचित् भास होत असेल; परंतु तसें नाहीं. हे आधुनिक दाजीसाहेब जे पाद्रीसाहेबांचा अवतार घेतलेले, तेच हे पुरुष होत. यांना पुरुष म्हणण्या पेक्षां परुष हें नांव विशेष शोभेल. असो. प्रस्तुत अभंगांत ते इंग्रेज सरकारांची विनंती करित आहेत कीं, “ चहुकडे भटशाई मातली आहे; कुळकर्णी, चिटणीस, दप्तरदार, फौजदार, मामलतदार, कलेक्टर, जज्ज व त्यांचे शिरस्तेदार वगैरे लोक ब्राह्मण आहेत; किंवा ब्राह्मणांच्या अंकित आहेत; तेव्हां त्यांचा तुह्मी तिरस्कार करून त्यांना हद्दपार करा.” अशा आशयाची रा० दाजीसाहेबांनीं विनंति केली आहे.

सत्यशोधकसमाजाच्या प्रसिद्ध उपदेशकांची ही विनंति आहे तेव्हां राणीसरकारांनीं एक वेळ ती अंमलांत आणून वरील सर्व ठिकाणीं मोठ्या पोटानें व्याप्त, भव्य दाढीमिशावाले, कंबरेस आंकडीकोयता बांधून व खांद्यावर बैल घेऊन " व्हय दाजी जी जी " हा लावणीचा स्वर काढणाऱ्या लोकांस नेमावें अशी मी शिफारस करितों.

राणीसरकारांस या सत्यशोधकसमाजाच्या पुढाऱ्यांनीं केलली विज्ञापना किती तरी योग्य आहे!! दाजी साहेबासारख्या सत्याचें शोधन करणाऱ्या मनुष्यास मोठमोठ्या सर्व जागेवर भट ( योद्धे तर नव्हेना! ) दिसले! येवढें तरी चांगलें झालें कीं, एखाद्या पोस्टमनच्या अथवा पोलसांतील शिपाईगिरीच्या जागेवर उदरभरणार्थ नोकरी करीत असलेला भिक्षुक अथवा ब्राह्मण त्यांना आढळला नाहीं ! तर त्यांनीं यथेष्ट तोंड—सुख घेतलें असतें. आमच्या ब्रह्मवृंदाची ही पुण्याई कीं त्यावेळीं एखादा नीचनोकरी करणारा ब्राह्मण त्यांच्या लक्षांत आला नाहीं. असो. सत्यशोधकांच्याच वर्गापैकीं मोठ्या हुद्याच्या जागेवर कोठेंही त्यांचे अनुयायी नाहींत; तेच तेवढे काबाडकष्ट करणारे असें सत्यशोधकांस दिसलेंना!!

मलपृष्ठ उलटल्यानंतर या पुस्तकाच्या पहिल्या पृष्ठास म्हणजे गणपतिगजाननास आरंभ होतो. या पृष्ठावर " एक तर्फी लेखापासून धूर्तांच्या श्रेष्ठपणाचा बोज गेला. " हें ढळढळित मोठ्या अक्षरांचें जाडें मथाळें दिलें आहे. आतां पहिल्या पृष्ठावरचें नांव खरें कीं मलपृष्ठावरचें खरें? हा एक प्रश्न सहज उत्पन्न होतो. मलपृष्ठावरचेंच नांव खरं असावें असें स्वकपोलकल्पित अनुमान करून घ्यावें लागतें. प्रस्तुत पुस्तक " धर्मढोंगपरिस्फोटन " या विषयीं आहे आणि प्रथम पृष्ठावर " एक तर्फी लेखापासून धूर्तांच्या श्रेष्ठपणाचा बोज गेला. " हें जाडें वाक्य कां बरें आढळावें?

माझें पण असेंच मत आहे कीं, पुस्तककर्त्यानें शिरोभागीं धारण केलेलें वाक्य खरें, व शुद्ध आहे; परंतु असे एकतर्फी लेख ते कोणते? आणि धूर्तांचा बोज तो काय गेला? धर्मशास्त्रें जर एकतर्फी आहेत असें ग्रंथकर्त्यांचें ह्मणणें असेल तर ज्या शास्त्राव-र लोकायत, चार्वाक, बृहस्पति वगैरे मंडळी टीका करण्यांत चकचूर होऊन गेली होती; इतकेंच नव्हे तर शेवटीं त्या नास्तिक मंडळींनीं धर्मशास्त्र खरें आहे असें प्रांजलपणानें कबूल केलें होतें. असें असतां, धूर्तांचा बोज कसा गेला तें मात्र समजत नाहीं. प्रसिद्ध उपदेशकांनीं या शंकेच्या निवारणार्थ थोडासा खुलासा केल्यास बरें पडेल.

पुस्तकाचें पहिलें वाक्य " या देशाच्या तमाम हिंदुलोकांस या लेखानें प्रसिद्ध करण्यांत येतें कीं, आपल्या देशांत ज्याप्रमाणें यवनादि म्लेंच्छ लोक परदेशांतून येऊन राहिले आहेत. त्या प्रमाणें ब्राह्मणलोक येऊन राहिले आहेत. " या पुस्तकांत सर्वत्र भाषादोष अनेक झालेले आढळतात; परंतु ते सर्व येथें दर्शविण्याचा प्रयत्न करणें म्हणजे या छोट्याशा पुस्तकाला मोठें रूप देऊन वाऊ दाखविणें हें होय. आणि याच कारणानें भाषादोष काढण्याविषयीं मी प्रयत्न केला नाहीं. प्रस्तुत पुस्तकाच्या मतासंबंधानें व अर्थसादृश्याविषयीं विवेचन सत्याम स्मरून करावयाचें आहे. सत्यशोधकांचा झालेला माहेर, कितपत आदरणीय आहे हें प्रमाणें प्रत्येक वाचकाचें एक कालेंच समजलें पाहिजे. आणि त्याच हेतूनें हें पुस्तक आज मीं हातीं घेतलें आहे.

" तमाम हिंदु लोकांस " ह्मणजे कोणास? ब्राह्मणेतर असा हेतु पुस्तककर्त्याच्या पुढील लिहिण्यावरून सिद्ध होतो. परंतु

" हिंदु " म्हणजे कोण ! या शब्दाच्या अर्थाची पुस्तककर्त्यास विस्मृति झाली असें वाटतें. " हिंदु " हा शब्द पर्शीयन असून त्याचा अर्थ त्या भाषेंतील शब्दकोषांत "काळा, लुटारू, चोर, पेंढारी, दस्यु" इत्यादि शब्दांचा अर्थवाचक आहे. हा अर्थ जर मनांत आणून सत्यशोधकसमाजांतील प्रसिद्ध उपदेशकांनीं जाहीर केलें असेल तर नकळे. कारण मराठ लोकांची या गुणाविषयीं ख्याति आहे. सात्विकीवृत्तीचे परिपालक जे ब्रह्मवर्ग त्यांना ही खबर सत्यशोधक कसे बरे देतील ? असें जरी एकपक्षीय रीतीनें सिद्ध होतें; तथापि " लोकांस " या शब्दाच्या पाठीमागें " तमाम " हें पद योजिलें आहे; येवढ्यावरून इतकेंच सिद्ध होतें कीं, या शब्दांत ब्राह्मणांचा समावेश करावा असें पुस्तक लिहितेवेळीं ग्रंथकर्त्यास वाटलें असावें; परंतु या दस्युवाचकशब्दांत गणना होण्याचें विचार ब्राह्मणवर्गाच्या महत्पुण्यानें पुस्तककर्त्याच्या मस्तकांतून काढून टाकिले असावेत असेंच वाटतें. नाहीं तर या दाजीसाहेबांनीं येथें दुसरा एखादा कोर्डा ओढिला असता. अस्तु; हें पुस्तक तमाम हिंदु लोकांस समजण्याकरितां ग्रंथकर्त्यानें प्रसिद्ध केलें असावें असें पहिल्या वाक्यावरून सिद्ध होतें; असें असतां, तें ब्राह्मणादिवर्णचातुष्टयाला न वाटतां फक्त मराठ्यांनाच का फुकट वाटलें तें मात्र समजत नाहीं.

" ब्राह्मण लोक परदेशांतून येऊन राहिले आहेत. " अशा अर्थाचें ग्रंथकर्त्याचें ह्मणणें आहे. ब्राह्मण परदेशांतून आले यांस प्रमाण काय ? ब्रह्मवर्ग दुसऱ्या देशांमधून ह्मणजे हिंदुस्थानाच्या बाहेरून आले आणि सत्यशोधकांचे आजे, पणजे अथवा त्यांचे पितामहादिपूर्वज हिंदुस्थानाच्या उदरांत जन्मले हें कशावरून

सिद्ध होतें? इंग्लीश ग्रंथकारांच्या कपोलकल्पित ग्रंथावरूनच ना ! त्या दाढी-दिक्षितांना आमच्या पूर्वजांची हकीकत काय हो माहित? ते त्यांच्या भाषेत निष्णात असणार; आमच्या भाषेत प्रवीण होणें सर्वथा अशक्य. इंग्लीश ग्रंथकार व्यासमंडळापैकीं एखादी व्यक्ति असून त्यांनीं सांप्रत अवतार धारण करून, प्राचीनकाळचा इतिहास लिहिण्याचा विडा तर उचलला नसेल ना? गोरे लोक कृष्णद्वैपायन आहेत असें जर सत्यशोधकांस वाटत असेल तर त्यांनीं त्या लोकांचा खुशाल अनुग्रह घ्यावा; या वेषांतराबद्दल आमचीं ब्रह्मवृंदें कधींही विरुद्ध मत देणार नाहींत.

इंग्लीश ग्रंथकारांच्या ह्मणण्याप्रमाणें पूर्वेकडून आर्य (श्रेष्ठ) लोक आले, त्यांत आमच्या सत्यशोधकांचे प्रपितामह नव्हते, यास कांहीं प्रत्यक्ष प्रमाण जर असेल, तर त्यांनीं तें जाहिर करावें. त्यांनीं तें रुजूं केलें तथापि असेंही ह्मणतां येईल कीं, पूर्वेकडून आर्यलोक आले तर येथें राहणारे मूळ खडू कोण ? दस्यु हें उघड आहे. तेव्हां दस्युजनांच्या कल्पना विचित्र असणें हें साहजिक आहे. त्यांच्याच ह्मणण्याप्रमाणें या देशांत राहणारे अनार्य लोक अथवा हा सर्व निर्जनप्रदेश असला पाहिजे. अनार्य येथें नव्हते असें जर सत्यशोधक ह्मणतील, तर हे मराठे पण आर्यलोकांबरोबर सेवा चाकरी करीत आले असावेत असें इंग्लीश ग्रंथांवरूनच नाहीं कां सिद्ध होत?

" देशाची मलई बहुतकरून अशाच ऐतकव्यूंनीं यथेच्छ चापिली आहे. " हें दुसरें वाक्य. देशाची मलई आणि ती ऐतखाऊंनीं यथेच्छ चापिली, तेव्हां सत्यशोधकांस थोडेसें दुःख वाटणें हें साहजिक आहे; परंतु तसें दुःख प्रदर्शित केल्याचें आढळत नाहीं.

असो. देशाची मळई विकत घेतली कि लुटून? आर्यलोकांचे वर्तन सत्यास स्मरून असावयाचें, चोरी करण्याचें नव्हें; अशा प्रकारचे इंग्लीश ग्रंथकारांनीं अनेक ठिकाणीं ह्मटलें आहे. तेव्हां सत्यशोधकांकडून गुरुवाक्यांचा आव्हेर न होणें विशेष उचित दिसतें, असें असतां गुरुवाक्यें खरीं कीं गोपाळ्यांचीं वाक्कुसुमें खरीं? हा एक प्रश्न सहज उत्पन्न होतो. पुस्तककर्त्याचें वाक्य खरें मानिल्यास गोरकाय अथवा अवतारिक व्यासगुरुजींचा द्रोह केल्याचें पातक येतें; इत्यादि अडचणीसंबंधानें दाजीसाहेबांनीं पूर्वी कांहीं विचार करून ठेविला आहे कां?

ब्राह्मणलोक ऐतकब्बू आहेत हें गोपाळ्यांच्या पितामहांस कसें समजलें नाहीं; याचें आश्चर्य वाटतें. त्यांचे खरे हिंदु-पूर्वज इतके अज्ञान होते असें ह्मणण्याचें धाडस मी करित नाहीं. कारण स्वर्गलोकनिवासी त्यांच्या पितरांवर असा असत्यारोप आणणें हें मला अप्रशस्त वाटतें. गोपाळे स्वमुखानें जर निजधामास गेलेल्या पितृगणांवर दोषारोप आणीत असतील तर ते खुशाल आणोत. त्यांच्या त्या करण्यानें त्यांची पितृभक्ति किती अलौकिक आहे त्याचें वाचकवर्गास अनुमान होईल.

देशाची मळई अशा ऐतकब्बूंना, तुह्मी कां दिलीत? असा गोपाळ्यांनीं स्वर्गीच्या पितृगणांस प्रश्न केला होता कां? जर तसा प्रश्न करून त्यांना त्यांच्या वृद्धपितृगणांनीं "ब्राह्मणांनीं फसविलें" असा जबाब दिला असेल तर, मात्र आमच्यानें ना ह्मणवत नाहीं. केवळ कपोलकल्पित विचार लिहून ऐतिहासिक शास्त्रावर गदा मारणें, हें गोपाळ्यासारख्या जाड्या गृहस्थास कसें रुचलें तें मात्र कळत नाहीं.

आतां ऐतकऴ्बू कोण ? हा एक प्रश्न राहिला. जे अज्ञान, जे आयत्या पिठावर रेघा ओढणारे, ज्यांना कृषिकर्मांत कोणत्या उपायानें सुधारणा करावी, ही गोष्ट माहीत नाहीं; अशा लोकांस विद्वान् लोकांनीं त्यांच्या धंद्यासंबंधाचें ज्ञान देऊन त्यांत त्यांना पारंगत केलें; इतकेंच नव्हे तर त्यांना ज्यांनीं अज्ञानावस्थेंत बोळ्यानें दूध पाजिले, ते ऐतकऴ्बू किं ते पिणारे? शेतकी ह्मणजे काय? वस्त्र कसें असतें ! इत्यादि गोष्टींस जे अनभिज्ञ अशा लोकांनीं आर्य लोकांचें अनुकरण करून स्ववर्तनांत सुधारणा केली व स्वतः सुखोपभोग घेऊं लागले. येवढ्या ऐतिहासिक माहितीवरून ऐतकऴ्बू कोण; गोपाळ्यांचे पूर्वजचना ? ज्ञान संपादन करण्यास आमच्या आर्यलोकांना मुळींच आयास पडत नाहींत, तें सहज प्राप्त होतें असें दाजीसाहेबांना वाटतें कां ? दुसऱ्या लोकांचें ज्ञानभाण्डार चोरून घेणारा ऐतकऴ्बू किं स्वकष्टानें विद्या शिकणारा ऐतकऴ्बू ? या प्रश्नाचा विचार सत्यशोधकसमाजाच्या प्रसिद्ध उपदेशकानें अगदीं शांत प्रसंगीं करावा अशी मी शिफारस करितों.

अन्नपूर्णागृहांत नियमानें नियमित पैसे देऊन भोजन करण्याऱ्या भोजनभाऊस त्या आत्याबाईनें ऐतकऴ्बू असें ह्मणणें जितकें योग्य तितक्याच योग्यतेचें गोपाळ्यांचें हें दुसरें वाक्य होय.

" जसा एखादा देवऋषि खेड्यांतील भोळ्या लोकांस आपल्या छापेंत ठेवितो व श्रेष्ठपणा संपादून तेथील लोक अंकीत करितो तसा ह्या ब्राह्मण लोकांनीं आपला श्रेष्ठपणा या देशांत स्थापन केला " हें तिसरें वाक्य. गोपाळ्यासारख्या सद्गृहस्थास ब्राह्मण देवर्षिप्रमाणें [पूज्य तर नव्हेना? ] वर्तन करितात ही गोष्ट सूचण्यास कारण काय बरें असावें ? " तुम्ही आमचा सन्मान करा,

आम्ही तुमचे परमेश्वर आहोंत. तुमच्या दुःखाचा आम्ही विपर्यास करूं. आम्हांस मंत्रतंत्र वगैरे यक्षणींच्या विद्या अवगत आहेत. " अशा प्रकारचे उद्गार एका तरी ब्राह्मणानें काढिले असतील असें वाटत नाहीं. मग सत्यशोधकानें देवर्षासारखे भोंदू ब्राह्मण आहेत हें कोणत्या प्रमाणावरून सिद्ध केलें ? " तुम्ही आमच्याकडे या आणि आम्हांस दंडवत करा " असें जोंपर्यंत देवर्षि सांगणार नाहींत तोंपर्यंत इतर लोकांनीं त्यांजकडे जाणें अप्रशस्त होईल. असें असतां, खेड्यापाड्यांतील लोक त्यांजकडे कां बरें जातात ? ज्याअर्थी या लोकांच्या अंगीं अज्ञानपणा आहे त्याअर्थी हा भोळ्या लोकांचाच दोष; हें मी प्रतिज्ञेनें सिद्ध करून देईन.

सत्यशोधकांनीं स्वतःच्या अज्ञानावर झांकण घालून ज्ञानवान् अर्थात् ब्रह्मवर्गाचे खोटे अवगुण बाहेर काढण्याचा प्रयत्न केला आहे; हें कोणीही विचारवान् मनुष्य कबूल करील. ब्राह्मण लुचे आहेत असें जर गोपाळ्यांना वाटतें, तर त्यांच्या महद्वर्गानें ( ब्राह्मणांच्या मोठ्याभागानें) संगृहित जी विद्या, ती पण भोंदुगिरीची असली पाहिजे. गोपाळ्यांच्या म्हणण्याप्रमाणें कपट कसें करावें ? या प्रश्नाची त्यांत मीमांसा असणें विशेष प्रशस्त दिसतें; असें असतां गोपाळ्यांना ब्राह्मणी छेः ! भटोरी विद्या [ लेखन कला ] कां प्रिय झाली तें मात्र समजत नाहीं !

ब्राह्मणांच्या छापेंत राहणें हें तुमच्या पूर्वजांस कां म्हणून आवडलें ? ब्राह्मणांत कांहीं दैवत अथवा विद्येचें महत्व होतें म्हणूनच ना ? तुमच्या पूर्वजांस नेहमीं उपदेश करून ऐहिक व पारमार्थिक सुखाचा लाभ करून दिला, त्याचें उसणें जर गोपाळे

फेडित असतील तर न कळे ! तसेंच ब्राह्मणांनीं उपदेश केला यांत त्यांनीं सत्यशोधकांच्या पूर्वजांवर वंशपरंपरेनें छापा तो काय बसविला ? या प्रश्नाचा निर्णय होणें निदान माझ्या मतें तरी अशक्य आहे.

ब्राह्मणांनीं आपलें ज्ञानभांडार तुह्मांस दिलें त्याचें हें ऋण जर फिटत असेल तर मात्र माझा निरुपाय आहे. "भटांनीं आह्मास अंकीत करून ठेविलें." हें कितपत योग्य व सयुक्तिक आहे त्याचा विचार वाचकांकडेसच सोंपितों. कारण या अज्ञान लोकांच्या आचरणास कांहीं निर्बंध असलेला कोठें आढळतो कां? जर तसा सक्तीचा कोर्डा ब्राह्मणांनीं या अज्ञवर्गावर ओढिला नाहीं, तर त्यांनीं देवर्षिप्रमाणें यांच्यावर छापा तो काय बसविला?

चवथें वाक्यः—"त्यास बळकटी आणण्याकरितां, नानाप्रकारचे ग्रंथ लिहून ते ईश्वराच्या व महान् पुरुषांच्या नांवानें प्रसिद्ध केले." पुस्तककर्त्यानें असा एक तरी ग्रंथ दाखवावा, असा मी प्रश्न करितों. वेद ईश्वरप्रणीत आहेत असें ब्रह्मवृंद ह्मणतात, तेवढ्यावरून तर गोपाळ्यांनीं ही कोटी लढविली नसेल ना ! वेद अपौरुष ह्मणजे परमेश्वरप्रणीत आहेत; या विषयीं प्रमाणें पहाणें असल्यास सत्यशोधकमित्रानें हल्लींच्या काळचें चार्वाकानुयायी व आर्यसमाजाचे मूळ स्तंभ जे दयानंद सरस्वती त्यांचे ग्रंथ पहावेत. धन्य आहेत असे कल्पितहेतुदर्शक किं त्यांनीं वेद मनुष्यप्रणीत आहेत असें ठरविलें, नव्हे अनुमान धप्यानें ठोकून दिलें ! परंतु दाजीसाहेब, वेदांत काय अक्षरें व तीं कोणत्या अर्थाचीं आहेत हें आपण प्रत्यक्ष पाहिलें आहे कां ?

वेद जर पौरुष असतील तर सत्यशोधकानें सर्व सामग्री घेऊन वादास तयार व्हावें. आणि तसें करण्याचें जर त्यांच्या अंगीं सामर्थ्य नसेल तर ऋग्वेद अष्टक १ याची मक्समूलर भट्ट यांनीं लिहिलेली प्रस्तावना निदान एक वेळ तरी वाचावी, ह्मणजे त्यांची खात्री होईल. गोरकायगुरुजींनीं सांगितलेली वाक्यें सत्यशोधकांस बरींच आवडतील यांत शंका नको. परक्या मनुष्यानें कसेंही सांगितलें तरी आमचे मराठे- बंधु माना डोलवितात; अर्थात् त्यांना त्या गोष्टी संमत असतात, हें उघड आहे. असो. वेदाची भाषा कोणती ? संस्कृत ( लौकिकसंस्कृत ) असें जर दाजीसाहेब ह्मणतील; तर त्यांच्या त्या विचारांची कमालच झाली असें ह्मटलें पाहिजे.जी वैदिक ( देवनागरीभाषा ), जिचा अर्थ अत्यंत गहन, विचार अतिशय अपूर्व अशा त्या भाषेस भलतेंच नांव देणें कितपत प्रशस्त आहे ? तसेंच संपूर्ण पृथ्वींतील पाहिला ग्रंथ, तसाच ज्ञानभाण्डारानें पूर्ण भरलेला, सर्व गोष्टींचें ज्यांत परिस्फोटन केलें आहे अशा ग्रंथास ब्राह्मणानें रचिला; असें म्हणण्या पूर्वी सत्यशोधक हें टोपण नामधारकवर्गानें सत्यासत्याचा निर्णय कां केला नाहीं ?

बरें सत्यशोधकांच्या म्हणण्याप्रमाणें वेदांची रचना ब्राह्मणांनीं केली असें घटकाभर कल्पिलें; तथापि जो अत्युत्तम ग्रंथ ब्राह्मणांनीं निर्माण केला, त्यांचें सामर्थ्य केवढें असलें पाहिजे? मित्रा, तूं असा एखादा ग्रंथ लिहून तर दाखीव? ब्रह्मवर्गाचें ज्ञानभांडार कोठें आणि गोपाळ्यांची ती तुटपुंजी सामग्री कोठें ? कोठें इंद्राचा ऐरावत आणि कोठें गोपाळ्यांचें मरतुटलें तट्टू- मित्रा, ग्रंथ लिहिणें हें काम अतिशय कठीण आहे; ह्यांत साधारण मनुष्यांची कांहीं मात्रा चालत नाहीं.

आतां दुसरा आक्षेप व्यासासंबंधानें. व्यासांनीं पुराणें लिहिलीं; तेव्हां त्यांत अविचार हा असलाच पाहिजे, असें निदान दाजीसाहेबांना तर वाटतें. व्यास ब्राह्मण नव्हता असें दाजी साहेब स्वतःच्या पुस्तकाचें पान १४ वर म्हणत आहेत. आतां ब्राह्मणानें पुराणें केलीं असें सिद्ध होईल कीं इतरानें? व्यास शूद्र असून ते पुढें स्वपराक्रमानें पवित्र झाले, असें ग्रंथकर्त्यांचें म्हणणें आहे. ज्याअर्थी व्यासांनीं पुराणें केलीं त्याअर्थी ब्राह्मणांनीं पोटभरण्याकरितां स्वकपोलकल्पित ग्रंथ ते कोणते केले; तें मात्र समजत नाहीं.

धर्मशास्त्रांतील ग्रंथांवर तिसरा आक्षेप स्मृत्यासंबंधाचा. स्मृत्याही ब्राह्मांनींच केल्या असा दाजीसाहेबांच्या चवथ्या वाक्यांत गर्भित बोध होतो. कलियुगांतील स्मृतिकार जे पराशर, त्यांची स्मृति हल्लीं विशेष श्रेष्ठ मानितात. हे पराशर कोण होते? या प्रश्नाचा निर्णय सत्यशोधकसमाजाच्या प्रसिद्ध उपदेशकानें त्याच पुस्तकाच्या १४ व्या पृष्ठावर लिहिला आहे. आतां ग्रंथ ब्राह्मणांनीं तयार केले कीं अन्यांनीं! सारांश धार्मिक ग्रंथासंबंधानें गोपाळ्यांनीं जो आक्षेप पुढें आणिला आहे तो कितपत मानार्ह आहे याविषयीं वाचकवर्गच विचार करतील.

" त्या आधारें ते आपल्या लोकांस विश्वजन्मविणाऱ्या ईश्वरापेक्षां व मनुष्यदेह देणाऱ्या मातापित्यापेक्षां अधिक वंद्य होऊन बसले. " हें पांचवें वाक्य. कोणत्या आधारानें वंद्य झाले तर ग्रंथ लिहिले त्या. ग्रंथ लिहिले कोणी? पराशरादि ऋषिवर्यांनीं; आणि वंद्य कोण झाले? ब्राह्मण. वाः! हेंच सत्यशोधन नाः सत्यशोधका, तुझ्या त्या सत्यतेची कमाल आहे बुवा!

ब्राह्मण येवढ्यावरूनच पूज्य नाहींत. त्यांच्यांत दुसरें कांहीं खरें तेज आहे. त्यांची नेहमीं वृत्ति सात्विकी व आहार पण तसाच असतो. हे विचार आमच्या या नूतनमित्रास कसे सूचले नाहींत कोण जाणें! मित्रा, तूं सत्याचा कांहीं थोडा तरी विचार करावयाचा होतास? तुझ्यांत जर सत्याचा अभाव होता तर तूं सत्यशोधकांचें उपदेशकत्व कां बरें स्वीकारिलेंस?

" या कृत्रिम श्रेष्ठपणाच्या आड त्यांनीं प्राचीन काळापासून आपणांस पुष्कळ प्रकारें भोंदून खाल्लें. त्याकरितां त्यांनीं आपल्या लोकांच्या मानवी अधिकारांस धुळीस मिळवून केवळ गुलाम करून सोडिलें. " हें सहावें अनुसंधान. ब्राह्मणांनीं त्यांना भोंदून तें काय खाल्लें? ग्रंथ केले कोणी आणि तुह्मांस भोंदणारे कोण? तसेंच तुमचे मानवी अधिकार कोणी धुळीस मिळविले! मानवी अधिकार कशाला ह्मणतात; हें तरी समजतें कां? विचार करण्याचें जें सामर्थ्य तेंच मानवी अधिकार. एका मीमांसकानें ह्मटलें आहे कीं "सकलवेदार्थादितत्वमननात् मनुष्यः" ह्मणजे संपूर्ण वेदांच्या तत्वांचा व त्याच्या अर्थसादृश्याचा जो विचार करितो तोच मनुष्य. सत्यशोधका, तुझ्या पूर्वजाकडे हे अधिकार होते कां रे? मग ते हिरावून ते कसे घेतले? असो. अज्ञाननिद्रेनें अत्यंत घेरिल्यामुळें दाजीसाहेयांकडून असे प्रमाद घडणें साहाजिक आहे.

ब्राह्मणांनीं गोपाळ्यांच्या पुर्वजांस व त्यांना गुलाम कशा प्रकारानें केलें? या प्रश्नाचा खुलासा गोपाळ्यांच्या लेखांत होत नाहीं. धुळीस मिळविणारे ब्राह्मण कीं तुमचेच शूद्रपूर्वज? या प्रश्नाचा निर्णय सत्यशोधकसमाजाचे मंत्री अथवा उपदेशक करतील अशी मी आशा बाळगितों.

" ही वहिवाट परंपरेनें चालल्यानें तिच्यामध्यें संशय घेण्यास किंवा तिच्यांत फेरफार करण्यास आपल्या लोकांस अज्ञानामुळें सवडच झाली नाहीं. आणि त्या करितांच त्यांनीं आपल्या लोकांस मुद्दाम अज्ञान ठेविलें. " या सातव्या वाक्यानें पहिल्या प्यारिग्राफाचा शेवट झाला. अज्ञानपणामुळें सवड झाली नाहीं, इतकें पुस्तककर्त्यानें ह्मटलें हें तरी आपलें पुण्यच समजलें पाहिजे. नाहीं तर " ब्राह्मण दुराग्रही, त्यांनीं आपल्या पूर्वजांस सुधारूं दिलें नाहीं," असें ह्मटलें असतें तर ब्राह्मणवर्गानें गोपाळ्यांचें काय केलें असतें? सत्यसोधकासारख्या मित्रानें आपल्या पूर्वजास अज्ञानीं ठरविणें हें जरा अप्रशस्त तर दिसतेंच. अस्तु. ब्राह्मणांनीं तुमच्या पितृगणांस अज्ञानी ठेविलें; पण ते स्वतः अज्ञानी कां राहिले? ब्राह्मण मनुष्य होते आणि तुमचे पूर्वज अन्ययोनींत जन्मले होते किं काय? चांगले सशक्त व मिशांना पीळ देणारे होते; मग ते ज्ञानी कां झाले नाहींत? स्वशक्तीनें ज्ञान संपादितां येतें हा सिद्धांत सत्यशोधकांच्या गौरकाय गुरुजींनीं त्यांना शिकविला नाहीं वाटतें?

अहो, ज्या क्षत्रियकुलांत श्रीराम व कृष्ण हे अवतारिक पुरुष निर्माण होऊन, त्यांनीं आपली अचलकीर्ति सर्वत्र दुमदुमत ठेविली; त्या पुरुषांचें सामर्थ्य लहान कां होतें? ज्या रामानें वनवासांत असतां, स्वपत्नी चोरून नेणाऱ्या रावणाचा नाश करण्याकरितां, द्रव्यसामर्थ्य नसतांही पशुकोटींत जन्मलेल्या वानरांस युद्धकलेंत निष्णात करून, त्या दशमुखी रावणाचा नाश केला. हें त्याचें सामर्थ्य लहान होतें कां? तसेंच जो प्रजापालनांत तत्पर. प्रजेस दुःख झाल्यास त्याला

स्वतःचें मोठें नुकसान झालें असें वाटत असें, ज्यानें आपलें शरीर, वाचा व मन हीं प्रजेच्या हितार्थ खर्च करण्याचा कृतसंकल्प केला होता, जो एकपत्नी व एकबाणी इतकेंच नव्हें, तर ज्यानें एके प्रसंगीं असे उद्गार काढिले होते कीं,:—

स्नेहं दयां च सौख्यं च यदि वा जानकीमपि ।
आराधनाय लोकेऽस्मिन् मुंचतो नास्ति मे व्यथा ॥ *

हे ज्याचे उदात्त विचार, ज्यानें बाल्यावस्थेंत महर्षि विश्वामित्राच्या यागाचें संरक्षण व शिवधनुष्याचा भंग केला, त्या श्रीरामाचे गुण काय सांगावे ? महर्षि वसिष्ठऋषींनीं हा मनुष्य नव्हे तर साक्षात् परब्रह्ममूर्ति असें स्पष्ट म्हटलें. ज्या दशरथराजास वसिष्ठाचें चरणसरोजतीर्थ प्राशन करावें लागत असें, त्याच दशरथाचा पुत्र जो श्रीरामचंद्र त्याला वसिष्ठ नमस्कार करीत असत. अर्थात् त्या क्षत्रियकुलोत्पन्न श्रीरामाचें सामर्थ्य अलौलिक होतें यांत संशय नाहीं; आणि याच हेतूनें ते पवित्र पुरुष आमच्या ब्रह्मवृंदाच्या देव्हारीं येऊन बसले व पूजार्ह झाले. जे क्षत्रिय ते ब्राम्हणांचे देव बनले. सत्यशोधका, रामासारखा श्रेष्ठ पुरुष जर निर्माण झाला होता, आणि त्यावेळीं ब्राम्हण विद्यमान होते, इतकेंच नव्हे तर त्यांची सर्व संस्कारिककृत्यें हल्लींप्रमाणें चालत असत, व तो काल वैदिककाळाशीं अगदीं सन्निध असतां,

* ह्या लोकांत आराधनाकरितां ह्मणजे प्रजारंजनार्थ जरी मला स्नेहाचा, दयेचा, सौख्याचा, किंबहुना जानकीचाहि त्याग करावा लागला तरी दुःख नाहीं.

ब्राम्हण ढोंगी आहेत असें त्यांच्या लक्षांत कां बरें आलें नाहीं ? गोपाळ्या, ते केवळ दैविपुरुष असतां; त्यांच्या लक्षांत ती गोष्ट कां येऊ नये? तुझ्या सारख्या पामरांनां हें कपट वाटावें-ना? त्या रामाच्या एका रोमाचीही तुझ्या अंगीं बरोबरी करण्याचें सामर्थ्य नाहीं. मग तूं असा त्यांच्यावर दोषारोप ते काय ह्मणून आणितोस?

सत्यशोधका, हीच गोष्ट श्रीकृष्णाची. ज्याचें सर्व आयुष्य ब्राह्मणलोकांच्या रक्षणांत व युद्धांत गेलें, भगवद्गीतेसारखे प्रचंड उपदेश ज्यानें अर्जुनास केले, तो महात्मा साधारण होता कां? ब्राह्मण जर कपटी असते, तर त्या पवित्र पुरुषानें त्यांचा केंव्हांच नाश करून टाकिला असता. मित्रा, ब्राह्मणांस तो अत्यंत वंद्य मानीत असे. त्यांचा सत्कार करणें हें त्याला अतिशय इष्ट वाटे. जो केवळ परब्रह्म त्याचें सामर्थ्य लहान होतें कां ? आमचे ब्रह्मवर्ग त्याला ईश्वर असेंच म्हणतात. आणि याचकारणानें तो आमच्या देंव्हाऱ्यांतील एक मुख्य देव बनला. सत्यशोधका, **ब्राह्मण त्या क्षत्रियवीरांची पूजा करूं लागले.** ते अत्यंत पवित्र पुरुष होते. मित्रा, सांग आतां ब्राम्हण कपटी किं काय?

आतां दुसऱ्या प्यारिग्राफास आरंभ करितों. " थोड्याशा दुधासाठीं ज्याप्रमाणें मांजरानें धन्यास अंधळेपणा चिंतिला, व त्या अंधळेपणामुळें धन्याच्या जन्माचें, त्याच्या कुटुंबाचें अनिवार नुकसान झालें, तसेंच ह्या लोकांनीं आपल्या लोकांस अज्ञान ठेवून आपल्या थोड्याशा लाभासाठीं एकंदर देशाचें नुकसान करून सोडिलें. " मांजरें कोण तर ब्राम्हण

आणि धनि आमच्या दाजीसाहेबांचे पूर्वज. तेव्हां ब्राम्हणांनीं ह्या येवढ्यामोठ्या कुटुंबावर संकटावस्था आणिली ना ? अशा कृतघ्न ब्राम्हणांना देहांतप्रायश्चित्त देण्यास गोपाळ्यांचे पितामह कां सिद्ध झाले नाहींत? तुमच्या वडिलांस ज्ञान प्राप्त व्हावें एतदर्थ प्रयत्न करून कलाकौशल्यांत सुधारणा केली यांत देशाचें नुकसान तें काय झालें? या प्रघातानें नुकसान झालें असतें तर प्राचीन काळच्या इतिहासांत यंत्रकलेचें नांव का बरें निघावें? ब्राम्हणांनीं, तुम्हांस सर्व गोष्टी शिकावित्या; परंतु तुम्ही अज्ञानपणामुळें त्या सोडून देऊन दरिद्री झाला; यांत ब्राम्हणांनीं मांजराप्रमाणें अहित तें काय चिंतिलें ?

देशाचें नुकसान होण्यास ब्राह्मण मुळींच कारण झाले नाहींत. तुमच्या लोकांत व्यसनप्रभाव जागृत झाल्यामुळें देशाचें सौभाग्य लयास गेलें ! एव्ह्यावरून जर खात्री होत नसेल तर जुन्या इतिहासांचें थोडेसें अध्ययन करून या आणि मग समाजाचीं सूत्रें धारण करा; असें मी सूचवितों. ब्राह्मणांनीं आपलें औपदेशिककार्य बजाविलें; परंतु तुह्मी स्वकर्तव्य पराङ्मुख झालात; याला ब्राह्मणांनीं काय करावें ?

स्वतःची चुकी लपवून अपयशाचें खापर गरीब बिचाऱ्या ब्रह्मवर्गाच्या माथ्यावर फोडणें हें सत्यशोधकांचें जर खरें कर्तव्य असेल तर न कळे ! केशाचें प्रायश्चित्त नाऱ्याला देणें ही अवस्था सांप्रत गोपाळ्यांनीं मांडिली आहे. गोपाळे म्हणतात, ब्राम्हणांनीं आम्हांस धुळीस मिळविलें; परंतु तुम्ही कोणत्या कारणानें धुळीस मिळाला ? या प्रश्नाचा निर्णय जरा दूरवर विचार करून सत्यशोधकांनीं केल्यास बरें पडेल.

" उघड आहे, अंधळ्या घोड्यास कोणींही धरावें, त्यावर बसावें आणि मजल उरकली म्हणजे सोडून द्यावें. असा जनावराप्रमाणें होत असलेला प्रकार हल्लीं थोडथोडा उघडकीस येऊं लागला आहे." हें दुसऱ्या प्यारिग्राफांतील दुसरें म्हणजे शेवटील वाक्य. पूर्वीच्या वाक्यांत दुध खाणाऱ्या मांजराची व या वाक्यांत अंधळ्या घोड्यावर बसणाराची उपमा ब्राम्हणांस दिली आहे. ही उपमा देण्यापेक्षां निवारसी तट्टाची दिली असती तर निदान पुस्तकाच्या रचनेंत विशेष शोभली असती, अंधळ्या घोड्यावर बसून प्राण धोक्यांत घालतील इतके ब्राम्हण अज्ञान आहेत असें मला वाटत नाहीं. जे जाणून बुजून अज्ञान अथवा अशक्त अशा लोकांवर अधिकार गाजविणें हें ब्राम्हणवर्गास रुचलें नसावें व त्यामुळेंच मराठे जसे वागतील तसें त्यांना वागूं द्या; त्यांना चारी दिशा मोकळ्या आहेत, अशा प्रकारचे अंधळ्या तट्टांच्या लाभांतील उद्गार काढून ब्राम्हणांनीं आपलें समाधान करून घेतल्याविषयीं इतिहास साक्षी देत आहेत. तात्पर्य दाजी साहेबांनीं जी उपमा व उपमेय यांची सांगड घातली आहे, ती ब्राम्हणांस न शोभतां, त्यांच्याच अनुयायांस [ मराठ्यांस ] विशेष शोभते. कारण हल्लीं ते अंधळ्या तट्टाप्रमाणें पाहिजे तिकडे जातात व शेवटीं खाड्यांत पडतात. ही गोष्ट सत्यशोधकांच्या लक्षांत कां येऊं नये !

आमचे सत्यशोधक म्हणतात कीं, हा प्रकार थोडथोडा उघडकीस येऊं लागला आहे. कोणता प्रकार तर अंधळ्या घोड्यावर बसण्याचा. करतील काय बिचारे? सर्वत्र अंधळे

घोडे बोकाळू लागले आहेत. जिकडे तिकडे अज्ञानतिमिरमय झालेलें मराठ्यांस दिसूं लागलें आहे; याला ब्राम्हणांनीं तरी काय करावें? या अंधळ्या घोड्यांना अद्यापि डोळे येण्यांची आशा दिसत नाहीं. जाणून बुजून अज्ञानांधकारांत जन्मलेले त्यांना ज्ञाननेत्र ते कोठून असणार? अशा अंधळ्या घोड्यांनीं ही भरतभूमि कलुषित होण्यापेक्षां तिच्या उदरीं मनुष्यें न जन्मणें हेंच उत्तम. सारांश ह्या अंधळ्या तट्टांचा भयंकर परिणाम आमच्या ब्रम्हवर्गास पहाण्याचा प्रसंग न येवो. नाहीं तर हे आपण स्वतः तर अंध आहेतच; परंतु ते दुसऱ्यांना म्हणजे ब्राम्हणांना अंधळे न करोत. स्वतःचें नाक कापून अपशकुन करणें हेंच यांचें मूळ ब्रीद असल्यामुळें ब्रम्हवृंदानें यांच्या वाटेस न जाणें हें एके प्रकारचें भूषण आहे.

"अज्ञान मुलांस खाऊ देऊन त्याचे डागिने मागून घेण्याची ठकबाजी मूल वयांत येऊन कळूं लागेपर्यंत भामट्यास करितां येईल. भामट्यानें अशा वहिवाटीचा जरी हक्क सांगितला तरी पुढें तो जाणता मुलगा त्याचें ब्रह्मज्ञान न ऐकतां दागिन्या ऐवजीं यथेच्छ बक्षिस दिल्याशिवाय सोडणार नाहीं हीच भीति बाळगून श्रेष्ठपणाचा येथेच्छ उपभोग, घेणाऱ्या जातीचे लोक आपल्या लोकांस विद्या देण्याविषयीं नानू करीत असतात" हा प्रस्तुत पुस्तकाचा तिसरा प्यारिग्राफ. भामटे कोण?तर ब्राह्मण आणि खाऊ खाणारे कुकेबाळ आमच्या दाजीसाहेबांचे पूर्वज व त्यांचे अनुयायी. ब्राह्मणांनीं यांना खाऊ तो काय दिला व त्यांचे दागिने ते कोणते हिरावून घेतले ? या प्रश्नाचा खुलासा वरील लेखांत होत नाहीं. तुम्ही अगोदरच ज्ञानानें दरिद्री केवळ पशु बनला होता, असें असतां,

तुमच्या ज्ञानाचे दागिने भटांनीं कसे चोरून घेतले? जेथें मूळच नाहीं तेथें फळ कसें उत्पन्न होईल! तात्पर्य चौर्यकर्मासंबंधानें दाजीसाहेबांनीं जो आरोप आणिला आहे तो निव्वळ खोटा आहे यांत शंका नको.

ब्राम्हण तुमच्या येथें पाठीमागील चोरीचा दाखला दाखवून "आम्हास मान द्या, तुमचे आजे पणजे हे आमचें पादक्षालनजलपान करीत होते." इत्यादि गोष्टी मागण्यासंबंधानें जर आपल्या घरीं ब्रम्हवर्ग येत असतील तर नकळे! तुमच्याच विद्वान् पितृगणांनीं चांगल्या ताम्रपटावर सनदा व लेख करून दिले आहेत कीं, "तुम्ही आम्हांस संकटसमयीं अतिशय साहाय्य केलें; यास्तव आमच्या कुळांतील उपाध्यायपणा तुम्हांस आम्हीं स्वसंतोषानें दिला आहे हें वचन आम्ही वंशपरंपरेनें पाळूं" इत्यादि प्रकारचे जे लेख आढळतात ते खोटे असें जर आपलें म्हणणें असेल तर मात्र माझा निरुपाय आहे. ज्या सज्ज्ञानपूर्वजांनीं विचारपूर्वक वर्तन केलें त्यांना त्यांच्याच प्रपौत्रानें अज्ञान बाळांची उपमा देणें किती तरी अयोग्य व दोषार्ह आहे.

तुमच्याच पितृवर्गानें स्वसंतोषानें ( गुळखोबरें खाऊन नव्हे. ) ब्राम्हणांच्या अंगची कर्तुमकर्तुम् शक्ति पाहून जें लिहून दिलें तें या कलिमललेपानें व्याप्त झालेल्या लोकांस खोटें भासणें हें साहाजिक आहे. स्वतःची काया झिजवून केलेल्या उपकाराचे आभार दर्शविण्याकरितां, यथेच्छ बक्षिस ( दुःख ) देण्याचा दाजीसाहेबासारख्या सत्यशोधक मनुष्यानें प्रयत्न करणें हें किती तरी अश्लाघ्य!

पुस्तककर्ते त्या वाक्याच्या पुष्टीकरणार्थ, ब्राम्हण विद्या शिकविण्यास नाखूष करितात हें एक कारण दाखवित आहेत.

पुराव्यांत रुजू करावें लागणारें कारण कितपत बलवत्तर असावें लागतें; ह्या गोष्टीस प्रसिद्ध उपदेशक अनभिज्ञ असावेत असें वाटतें. दाजीसाहेबांच्या पूर्वजांस पूर्वी धर्मासंबंधानें अत्यंत ज्ञान होतें असें जर मी सिद्ध करून दिलें; तर मग त्यांचें म्हणणें निराकार ठरलेंना! धन्य आहे अशा जनांची कीं ज्यांना खरीं कारणें काय आहेत तीं अद्यापि दिसूं लागलीं नाहिंत! अहो, तुम्ही चांगले विद्या शिकलेले; मग तुमच्यांत असे असत्यप्रलाप कां बरे आढळावे? बरोबर आहे, ब्राह्मणीविद्याच कपटी तेथें तुमचा तरी काय वांक!

ब्राह्मण विद्या शिकविण्यास नानू करितात मग तुम्हाला ती कशी आली? जन्मतः तर मातेच्या उदरांतून नाहींना शिकून आला? तुम्हांस मूळ विद्या शिकविणारा कोणी तरी ब्राह्मणच असला पाहिजे. अशी खरी स्थिति असतां, तुमच्या त्या सत्यशोधक-चष्म्याला स्वगुरूचें विस्मरण कसें झालें? गुरुद्रोह ह्मणजे काय? हें तुह्मांस कां बरें समजूं नये?

“ ब्राम्हणांनीं ज्या वेद, स्मृतिशास्त्रांवरून श्रेष्ठपणा संपादिला आहे ते ग्रंथ अशाच लोकांनीं प्राचीन काळीं जसें ज्यास सुचले तसे त्यानें लिहून ठेवले आहेत. वैदिककाळीं आतांच्या लोकांप्रमाणेंच घरेंदारें बांधून व बायका मुलें मिळून संसार करीत असत. वैदिककाळच्या लोकांस आतांच्या लोकांप्रमाणें मरणाचें व शत्रूचें भय रात्रंदिवस बाळगावें लागत असे. त्यांना आतांच्या आपल्या भोळ्या लोकांप्रमाणें देवदेवतांस नवस करणें, देवास साहाय्य करण्यास बोलावणें, शत्रूवर चाल करून नाश करण्यास आर्जव करणें, देवतांच्या सांत्वनार्थ प्राण्यांची आहुति देणें

वगैरे करावें लागत असे. पाणी, वायु, पृथ्वी, सूर्य, चंद्र, अग्नि यांना परमेश्वरासारखे समजून त्यांची प्रार्थना करणें इत्यादि प्रकार ते करित असत. आतांच्या माणसांप्रमाणें त्यांना खाणें, पिणें, हसणें, रडणें, निजणें, बसणें करावें लागे. आतांप्रमाणेंच वैदिक काळचे लोक चोऱ्या, दरवडे, खून, मारामाऱ्या करीत असत. आतांच्या लबाड लोकांप्रमाणेंच तेव्हांच्या लोकांस देहांत शिक्षा, हद्पार करणें, प्रायश्चित्त देणें वगैरे शिक्षा भोगाव्या लागत असत. सारांश तेव्हांचीं माणसें देव माणसें होतीं ह्मणून ह्मणतात. हीं त्यांची लबाडी आहे. याबद्दल त्यांच्या प्राचीन काळच्या ग्रंथांचीच साक्ष देतां येते. वेदांचें व स्मृत्यांचें भाषांतर त्यांच्याच लोकांनीं केलें आहे त्यावरून हें स्पष्ट कळत आहे. आमच्या अज्ञान लोकांस हें समजण्याचें ज्ञान नाहीं. सबब असें प्रसिद्ध करणें भाग पडलें आहे. धूर्त लोकांच्या लबाड्या सोनार, सुतार, लोहार, पाथरवट, कांसार यांनीं केव्हांच उघडकीस आणून ते ह्या धूर्त लोकांच्या हातून कोणतेही धर्मविधि करून घेत नाहींत. ते स्वतःच करीत असतात. हीच पद्धत सत्यशोधकसमाजानें आपल्या लोकांत गुरू केल्यावरून पुणें, मुंबई, जुन्नर, ओतूर, बडोदें वगैरे प्रदेशांत आपले लोक भटास न बोलावितां स्वतः धर्मविधि करू लागले आहेत." हा चवथा प्यारिग्राफ. यांतील कित्येक गोष्टी इतक्या अज्ञानतेनें भरलेल्या आढळतात कीं, अशा या अज्ञानांधाला कोणतीं विशेषणें द्यावींत तें मात्र समजत नाहीं.

वेद व स्मृत्या यांची रचना ब्राह्मणांनीं जसें सूचेल तशी केली आहे. ज्यावेळीं जगांत मुळींच ग्रंथ नव्हते अशा प्रसंगीं गंभीर विचार सूचेल तरी कसे ? कारण ग्रंथ लिहावयाचा आणि तो

वेदासारखा, तेव्हां त्या लेखकांचें ज्ञानभांडार अति अलौकिक असलें पाहिजे, हें उघड आहे. त्या महात्म्यांचें ज्ञानसामर्थ्य अलौकिक नसतें तर ह्या हल्लींच्या अंधळ्या घोड्यांनीं त्यांचा कधींच हुर्यो केला असता. वेद ईशप्रणित आहेत या तत्वास हे लोक कसे अनभिज्ञ राहिले ते नकळे. असो. त्यांनीं या शंकेच्या निवारणार्थ आर्यसमाजांतील पंडितांस प्रश्न करावा ह्मणजे या अंध धृतराष्ट्रांचें समाधान होईल.

वैदिककाळचे लोक घरेंदारें बांधून राहत व त्यांना शत्रूचें, व मरणाचें भय होतें. वैदिककाळ केव्हांचा समजावयाचा; या विषयीं पुस्तककर्त्याजवळ कांहीं पुरावा आहे कां ? पूर्वीच्या लोकांस हल्लींप्रमाणें मरणाचें भय होतें हें कशावरून ? जो वाल्मिकी पूर्वी कोळी होता, त्यानें ब्रह्मचर्यव्रत पाळिल्यानें आयुष्य वाढतें असें कां म्हटलें आहे ? तसेंच पूर्वमीमांसेंत "पंचेचाळीस वर्षें ब्रह्मचर्यव्रत पाळिलें असतां आयुष्य चारशें वर्षें वाढतें." असें म्हटलेलें कां आढळतें. व जो दासीपुत्र अर्थात् शूद्र शंबुक, त्याच्या दुष्टाचरणामुळें रामराज्यांतील ब्राह्मणपुत्रावर कसा प्रसंग कोसळला होता ? शूद्र जर ब्रह्मकर्म करूं लागेल तर पवित्र लोकांस अकालीं यमलोकीं जावें लागतें; हें वसिष्ठांचें सांगणें, श्रीरामाचें त्याप्रमाणें आचरण व शंबुकाच्या अनुष्ठानाचा भंग ह्या गोष्टी लक्षांत आणिल्या असतां, हल्लींचें तुमचें आचरण नष्टचर्येचें द्योतक आहे हें सांगितलें पाहिजे असें नाहीं.

वरील म्हणणें सत्यशोधकांस आवडणार नाहीं; हें मी कबूल करितों; परंतु जो वाल्या कोळी; सत्यशोधकांचाच अनुयायी, हे आणि ते एका पंक्तीला बसून पूर्वी जेवित होते; त्याचें म्हणणें

जर वरप्रमाणें आहे; तर मग दाजीसाहेबांच्या म्हणण्यावर विश्वास कसा ठेवावा ? दाजीसाहेबापेक्षां त्या वाल्या कोळ्याची योग्यता विशेष होती. यांच्यानें त्याच्या नखाग्राचीही बरोबरी होणार नाहीं. असें असतां, मृत्यूचें भय होतें इत्यादि प्रकारचें म्हणणें किती तरी अज्ञानपणाचें आहे, त्याची खात्री होईल.

परमेश्वराचें नामस्मरण करून विजयार्थ घराच्या बाहेर पडणें यांत सत्यशोधकांस वाईट तें काय दिसलें ? ज्यानें मनुष्यादि प्राणीवर्गास जन्म दिला, जो सृष्टीचा उत्पादक, चंद्रसूर्यादि देवता ज्याच्या सामर्थ्यानें जगावर प्रकाशित होत आहेत, जो पापपुण्याचा नियंता, जो " कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुम् " असा, जो " ब्रह्मैकरूपं परमार्थतत्वम् " असा, आणि जो " अदृश्यं सर्वद्रष्टारं निर्गुणं परमं पदम् " इत्यादि लक्षणांनीं युक्त त्या परमेश्वराचें नामस्मरण व त्याचें आर्जव कां करू नयेत ? तें मात्र मला समजत नाहीं.

आप, तेज, वायु, इत्यादि पंचतत्वांस ईश्वरांशीं मानिलें पाहिजे. कारण ही सर्व काया त्यांच्या अंशिकमिश्रणानें उत्पन्न झाली आहे. असें नें व्यक्तिघटितद्रव्य त्याची मातब्बरी थोडी आहे का? हें तत्व-पृथक्करण ज्ञानकांडानुयायी लोकांस जितकें उत्तम रीतीनें व्यक्त करितां येईल, तितकें माझ्यासारख्या अप्रज्ञास करितां येणार नाहीं. असो. पूर्वीचे लोक खाणें, पिणें, निजणें, वगैरे गोष्टी करीत असत, तेव्हां ते आमच्या सारखेच अभागी होते कि काय? हा एक प्रश्न सहज उत्पन्न होतो. आमचे पूर्वज आमच्या सारखे शेंदाड शिपाई नव्हते. ते विशेष पराक्रमी असत. त्यांचे विचार अतिशय दूरवर पोंचलेले पोक्त होते.त्यांच्या अंगीं बोलल्याप्रमाणें करून दाखविण्याचें सा-

मध्ये असें. ते परमपवित्र होते. अपराध करणें हें महत्पाप असें ते समजत असत. इत्यादि ऐतिहासिक माहितीस सत्यशोधक कसे अनभिज्ञ राहिले? अनभिज्ञ तर नसावेत; हा जाणून बुजून प्रमाद केला असावा यांत संशय नाहीं.

वैदिककाळचे लोक देवमाणसें याचा अर्थ तरी काय? ज्यांच्या हृदयांत कपटाचा तिळप्राय अंश नाहीं अशीं जीं मनुष्यें तींच खरीं देवमनुष्यें होत.

आनीतं न्यायतो वित्तं व्यसितं धर्मकर्मसु ।
यशस्तु जगति स्तुत्यं केवलं तस्य तिष्ठति ॥*

कीर्तिकौमुदी.

हीं लक्षणें जेथें आढळतात त्यांना देवमनुष्यें न ह्मणावें तर काय ह्मणावें! जेथें सदाचाराचें ढळढळीत उदाहरण दिसून येतें; त्या लोकांना पवित्र मानून त्यांचा अनुग्रह घेणें हा आमचा मूळ धर्म. असो. वरील प्रकारानें वागणारे लोक जर प्राचीन काळीं हयात होते; तर त्यांना देवमनुष्यें ह्मणण्यांत ब्राह्मणांनीं लबाडी ती काय केली ?

पूर्वीचे लोक देवमनुष्यें नव्हते; याला साक्षी त्या त्या ग्रंथांचीं भाषांतरें असें ग्रंथकार ह्मणतात; परंतु तीं भाषांतरें तरी खरीं आहेत कां? भाषांतरावर जर सत्यशोधकांचा पूर्ण विश्वास असेल, तर भाषांतरकारांवर त्यांचे मोठे उपकार आले ह्मणावयाचे. कोणत्याही अन्यभाषेंतील ग्रंथाचें भाषांतर मूळ हेतु व अर्थास धरून जसेंच्या तसें करितां येतें कां? मूळांत जो हेतु व जी रचना असते ती भाषां-

* ज्यानें न्यायेंकरून द्रव्य संपादन केलें व धर्मकार्यांत उधळलें, त्याचें, जगतामध्यें केवल स्तुत्य यश राहतें.

तरांत साधत नाहीं. याच कारणानें गोपाळ्यांनीं भाषांतरांची साक्षी देण्यापेक्षां मूळ ग्रंथांची ती दिली असती तर बरें झालें असतें. मग त्यांनीं तसें कां बरें केलें नाहीं?

'अहिंसा परमो धर्मः' असा वैदिकधर्माचा सिद्धांत असतांहि यज्ञांत विशेष विधीनें हिंसा करणें अवश्यक आहे, ही गोष्ट खरी. परंतु याचें तत्व पाटीलबोवांस समजाविणें म्हणजे ज्यांस पुरतें धुळाक्षर येत नाहीं, त्यांस समीकरण समजाविण्य सारखें, निदान मला तर दुर्घट आहे. तथापि एक उदाहरण देतों, त्या वरून सत्यशोकांचें समाधान होईल. तें असें—डाक्तराचें कर्तव्य काय कीं, रोग्याचें दुःख निवारण करणें. परंतु एखाद्याचा मूतखडा काढतांना त्यास डाक्तर अति दुःख देतो, या कृत्याचें जें तत्व तेंच यज्ञाच्या हिंसेचें आहे.

सोनार, सुतार, लोहार वगैरे लोकांनीं ब्राह्मणांची लबाडी जाणून त्यांचा तिरस्कार केला व ते स्वतः धर्मकर्मे करूं लागले. सोनार सुतार वगैरे लोकांनीं लबाडी ती काय जाणिली? त्यांना वेदाचा खरा अर्थ समजला कां? ज्यांना संस्कृतभाषा कशाशीं खातात या गोष्टीचें ज्ञान नाहीं; त्यांना ब्राह्मणांची लबाडी ती कशी समजली? अगोदरच अज्ञान आणि त्यांत कपटीविद्येचा प्रभाव; तेव्हां हे ब्राह्मणेतर ज्यास्तच अंधारांत पडले पाहिजेत, हें निर्विवाद आहे. धर्मशास्त्र ह्मणजे काय? या प्रश्नाची ज्यांना मीमांसा माहीत नाहीं, त्यांनीं ह्मणे सुधारणा केली, आणि त्या कारणानें त्यांचा स्तुतिवाद गाणें कितपत प्रशस्त आहे?

धार्मिककार्य तच्छास्त्रांत पारंगत असलेल्या लोकांवांचून अन्यजनांनीं अज्ञानपणानें केलें असतां, तें दोषास्पद समजावें. कोणतें-

हीं कार्य मग तें धार्मिक अथवा अर्थशास्त्रीय कां असेना; त्यांत निपुण असणाऱ्या सच्छीलसंपन्न मनुष्यावांचून अन्यानें करूं नये. कारण त्या प्रमादातिशयानें भयंकर परिणाम घडण्याचें भय असतें. जो चार्वाकादि सुधारलेल्या मतांचा संस्थापक, सत्यशोधकांच्याच तोंडचे किंबहुना त्याहूनही विशेष ज्याचे विचार; असा जो बृहस्पति तो सुद्धां ब्राह्मणापासून धार्मिककर्म करवावें असें कबूल करीत आहेत.

ब्राह्मणा वेदसंपन्ना ब्रह्मकर्मसमन्विताः ।
उपोष्य रात्रिमेकान्तु कर्म कुर्युर्यथाविधि ॥ *

बृहस्पतिसारखा नास्तिक नाहीं अशी पूर्वी ख्याति होती. तो जर कबूल करीत आहे; मग सोनार, सुतार वगैरे अज्ञ लोकांस धर्माचें रहस्य तें काय समजलें ! व त्यांनीं सुधारणा ती काय केली? आणि त्यांत यांना टिऱ्या थोपटण्या इतका आनंद तो काय झाला?

"लेख लिहिण्याचें काम त्यांजकडे असल्यामुळें त्यांनीं स्वतःची थोरवी गाऊन इतिहासकर्त्यांस आजपर्यंत ज्या माहित्या दिल्या त्याही तशाच दिल्या आहेत. हल्लींच्या प्रत्येक ब्राह्मणानें तन,मन, धनेंकरून आहोकाळ आपल्या लोकाच्या कल्याणाकरितां झटलें पाहिजे. तेव्हां त्यांच्या पूर्वजांच्या अपराधाची खांच भरून घेऊन उभयपक्षांत एकोपा झाला तर होईल. इतके हे ह्या देशाच्या नासाडीस कारण झाले आहेत. हें छपविण्यासाठीं त्यांच्या हल्लींच्या ब्राह्मणबंधुंनीं विद्वत्तेच्या जोरावर लपम छपम करू नये व त्यांनीं आमच्या लोकांची निर्भत्सना करून त्यांचें पित्त खवळूं

* वेदसंपन्न ब्रह्मकर्म करणाऱ्या ब्राह्मणांनीं एकरात्र उपवास करून यथाविधि कर्म करावें.

नये यांतच हल्लींच्या ब्राह्मणांचा शहाणपणा आहे. झालेल्या अपराधाबद्दल त्यांनीं प्रत्येक प्रसंगीं क्षमा मागून पदर पसरण्यास तयार असलें पाहिजे,, हा पांचवा प्यारिग्राफ. येथें एक तर्फी लेखापासून धूर्तांच्या श्रेष्ठपणाचा बोज गेला, या मथाळ्याची परिसमाप्ती झाली.

इतिहासांचीं साधनें ब्राह्मणांनीं इतिहासकर्त्यास दिलीं; परंतु ती कापट्ययुक्त आहेत असें सत्यशोधकांचें म्हणणं आहे. ब्राह्मणांनीं कोणत्या प्रसंगीं खोटीं साधनें दिलीं त्याचा खुलासा सत्यशोधकानें केल्यास बरें पडेल. माझ्या वाचण्यांत तर हा वेळ पर्यंत असें कधींही आलें नाहीं कीं, इतिहासकर्त्यास एखाद्या भिक्षुकानें ऐतिहासिक माहिती दिली आहे. सत्यशोधकांच्या अलौकिक शोधप्रभावानें जर त्यांना तसें दिसलें असेल तर मात्र निरुपाय आहे.

ब्राह्मणांनीं शूद्रादिवर्णीचा अतिशय गुन्हा केला आहे. गुन्हा कोणता तर ग्रंथ लिहून स्वतःची थोरवी व्यक्त केली हा. ग्रंथ तरी खऱ्या ब्राह्मणांनींच लिहिले कां ? नाहीं. , ज्ञानसागरांत ज्यांनीं निमज्जन केलें आहे असे जे लोक त्यांनींच ग्रंथभांडार तयार केला. आतां भटांनीं अपराध कोणता केला ? असो. ब्राह्मणांनीं अपराध केला तेव्हां त्यांला प्रायश्चित पाहिजे म्हणून पुस्तककर्ते शूद्रादिवर्णांची सेवा तन, मन, धनेंकरून करा असें सांगतात. धन्य अशा प्रायश्चित्त देणारींची ! ग्रंथ लिहिण्याचा परिणाम काय घडला ? तर ज्ञान झालें. ज्ञान प्राप्त करून देणें यांत गुन्हा होतो. सद्बोध केला असतां त्याचा परिणाम नष्टचर्येचा द्योतक घडतो. हें विलक्षण नैतिकतत्व जर सत्यशोधक समाजां-

तील प्रसिद्ध उपदेशकांच्या अंतःकरणांत भिनून राहिलें असेल तर मात्र या आर्यावर्तांचें मोठें दुर्भाग्यच म्हणावयाचें !

ज्यांनीं कायावाचामनानें सत्यशोधकांच्या पूर्वजांच्या हितार्थ प्रयत्न केला; अशा लोकांवर " तुह्मी अहोकाळ आमच्या अंकित रहा. तूह्मी आमच्या देशाची नासाडी केलीत. यास्तव तुह्मी आमच्या जवळ नेहमीं क्षमा मागितली पाहिजे. " हे अप्रबुद्धवाग्बाण येऊन कोसळावेत कां! ज्यांनीं कोणत्याही प्रकारचा अपराध केला नाहीं, उलटे उपकारच केले; अशा लोकांस दोषी ठरविणें सत्यशोधकांस कसें आवडलें ?

नेहमीं अवस्तारोप घेणारे जे कृतघ्न त्यांनीं पवित्र व निष्कलंकित ब्रह्मवृंदांच्या चरणासरोजतीर्थाचें पान अहर्निश केलें पाहिजे; हें विसरतां उपयोगी नाहीं. केवळ अज्ञानपणानें बिचाऱ्या भिक्षुकवर्गावर यथेच्छ तोंड-सुख घेतलें या परता दुसरा अधमपणा तो कोणता ? असो.

" एक तरफी लेखापासून धूर्तांच्या श्रेष्ठपणाचा बोज गेला" हें जें जाडें वाक्य दिलें आहे त्याचें कारण काय ? या दळदळीत अक्षरांच्या अगदीं थोड्यापण संबंधाचा या विवेचनांत बोध होत नाहीं. नांवास अनुरूप विवेचन पाहिजे तें येथें तसें आढळत नाहीं. वरील मथाळें आणि विवेचन यांत भिन्नत्व आल्या कारणानें लेखकाचा तें जाडें मथाळें देण्याचा हेतु काय तो मात्र लक्षांत येत नाही. असो. धूर्तांच्या श्रेष्ठपणाचा बोज गेला ह्मणून ग्रंथकार ह्मणतात; परंतु तो तसा गेल्याचें व्यक्त होत नाहीं. धूर्त कोण ? अंधळ्या तट्टावर बसणारे भटच ना ! अंधळ्या घोड्यांचा हाच धर्म कीं दुसऱ्याला खाड्यांत

पाडणें हें त्या भटांच्या लक्षांत कां येऊं ये ? आमचे ब्रह्मवृंद इतके भोळे कीं त्यांनीं या अधळ्या घोड्यांवर विश्वास ठेविला! या घोड्यांच्या अंगचा विश्वासघातकीपणा जर आमचे भट्ट पूर्वी जाणते तर ते त्यांच्यावर कधींच आरुढ न होते.

आतां प्रस्तुतपुस्तकाचा दुसरा विषय जो "लोकांस विद्या नसावी ह्मणून धूर्त लोकांचें कपटाचें ह्मणणें व त्यांचें खंडन" मराठे लोकांनीं लिहिण्यावाचण्यास शिकूं नये असा कोणत्याहीं शास्त्रग्रंथांत आधार सांपडत नाहीं. तसेंच " तुह्मी विद्या [ लेखनकला ] शिकू नका " असें आमच्या धर्माध्यक्षांनीं तोंडीं अथवा लेखीं आज्ञा केली असावी, असेंही दिसत नाहीं. असें असतां हे धूर्तांच्या [ भट्टांच्या ] नांवानें खडे कां ह्मणून फोडितात ? आमचे पवित्र ब्रह्मवृंद कधींही असें ह्मणणार नाहींत कीं " तुह्मी विद्या ( लेखनकला ) शिकू नका. " परंतु तुमचे ते शिपाईबाणा दाखविणारे मराठे विद्या शिकण्यास तयार कां होत नाहींत ? या प्रश्नाचा विचार सत्यशोधकानें स्वतःच्या गृहस्थितीवरूनच केला असता, तर बरें झालें असतें. ज्याला सुधारणाच करावयाची असेल, त्यानें प्रथम आपलें घर सुधारावें आणि मग समाज सुधारण्याच्या भरीस पडावें. ह्या महत्वाच्या गोष्टीकडे दाजीसाहेबांचें लक्ष गेलें होतें कां ? सत्यशोधका संबंधानें मला जी एकीव माहिती मिळाली आहे; तिजवरून पहातां, त्यांच्यासमूहांत खरे सुधारलेले असे एका हाताच्या बोटां इतकेही नाहींत. खुद्द उपदेशकांच्या घरींही अशीच स्थिति आहे; असें समजतें. त्या गृहस्थितिसंबंधानें येथें लिहिणें अत्यंत अप्रशस्त आहे, हें मी समजतों; परंतु जी गोष्ट ओघानेंच सिद्ध होऊ लाग-

ली व जिचा सुधारणेशीं संबंध आहे, अशी गोष्ट सामाजिक समजून तिजमधील गुणदोष दाखवून देण्याचा मित्राचा धर्म होय; आणि त्याचकारणानें संक्षिप्त रीतीनें थोडेसें सूचविलें. असो तुमचे ते लोकच ह्मणतात कीं, " ही बंग्याळ कारकूनी कुणी करावी ? " ही इतकी अशुद्ध भाषा व अप्रबुद्ध गृहास्थिति तुमच्यांत अद्यापि विशेष जागृत आहे; तर मग भट्टांवर आरोप कां ? तुमच्याच लोकांत जर ह्या वेळपर्यंत विद्या शिकण्याविषयीं आस्था उत्पन्न झालेली आढळत नाहीं. तर मग धूर्तांच्या [ ब्राह्मणांच्या ] डोक्यावर आरोप ठेवून अपयशाचें खापर फोडणें अथवा त्यांच्या मताचें खंडन करण्याचा प्रयत्न करणें हा केवढा अधमपणा ? आणि असें करण्याचें प्रयोजन तें कोणतें ?

" धूर्त लोक व त्यांचें शिष्यमंडळ नेहमीं, विद्येविषयीं असें धैर्य खचवित असतात कीं, सर्वच लोक लिहिणारे झाले तर शेतकी व कारागिरी कोण करील ? " धूर्त लोकांचे शिष्य कोण ? जे त्यांच्या आज्ञा पाळितात ते हें उघड आहे. आमच्या दाजीसाहेबांचे पितामह पण, ब्राह्मणांच्या अंकित होते; मग तेही शिष्यमंडळांतील एक अवयव होते असें नाहीं कां सिद्ध होत ? सत्यशोधका, तुझी पण गणना त्या शिष्यमंडळांतच होते, आतां सांग पाहू धैर्य कोण खचवितात ते ? तुझा तूंच ना ? शेणवई, कायस्थ प्रभु, सोनार, इत्यादि लोकांची गणना जशी ब्राह्मणवर्गाच्या शिष्यसमूहांत होते तशी तुमच्या पितामहांची पण होत असे. वरील मंडळींस त्या समुदायांत मोठा मान मिळतो आणि तुमच्या त्या रुमाल नेसून कंबरेस आंकडी कोयता आडखविणाऱ्या लोकांस थोडा मान मीळतो. याचें कारण तुमची दुराचरणप्रवृत्ति, या शिवाय दुसरें

कांहीं कारण नाहीं. शौचास जाते वेळीं पाणी न नेतां जलाच्या अभावीं मृत्तिका अथवा पाषाण यांचा उपयोग करणें, ही केवढी स्वच्छता ! ! ! आणि अशा गलिच्छ मनुष्यास समोर उभें करणें हें सुद्धां अप्रशस्तच, परंतु उपाय नाहीं; तुम्हांस कोणी त्राता नाहीं; तेव्हां तुमच्यावर उपकार करून ते आपल्या सहवासांत थोडथोडे ठेवितात. बाकी, तुमच्या वर्गाची योग्यता इतकी मोठी आहे कीं, " आह्मी वाघाच्या तोंडांत हात घालूं परंतु गुदद्वाराच्या शुद्ध्यर्थ प्रयत्न करणार नाहींत " ही तुमच्या वर्गांतीलच कांहीं विवाक्षित संस्थेची प्रतिज्ञा आहे; तेव्हां अशा वर्गास आमच्या पवित्र लोकांनीं मान तो कसा द्यावा ? सत्कार कोणाचा करावा ? जेथें ज्ञानभाण्डार भरलें आहे अशा ठिकाणीं. तुमचा सत्कार ब्राह्मण करीत नाहींत, येवढ्यावरून तुह्मास वाईट वाटणें साहजिक आहे. परंतु तसें वाटण्या पूर्वीं आपण आपलें स्वतःचें आचरण सुधारावें हें फारच उत्तम; आणि तसें केलें असतां, आह्मी तुह्मांस देवांपेक्षांहि श्रेष्ठ मानूं.

असो. पूर्वोक्त द्विजवर्गानीं केलेल्या प्रश्नाच्या खंडनार्थ श्रीमंत होण्याच्या इच्छेविषयीं उदाहरण देऊन विद्या शिकावी असें ग्रंथकारानें सिद्ध केलें आहे. माझें असें मत नाहीं कीं, मराठ्यांनीं विद्या शिकू नये. खुशाल शिकावी. परंतु विद्या शिकल्यानें काय मिळतें ? ज्ञान. ज्ञानाचीं फळें कोणतीं ? स्वात्मानंद हीं. विद्येनें श्रीमंत होतां येत नाहीं. विद्येनें श्रीमंत होतां येतें असें जर सत्यशोधकांचें ह्मणणें असेल; तर मोठ मोठे शास्त्री लोक दरिद्री कां ? राजभाषा व त्यांचे शासनिकोपाय ( कायदे कानू ) शिकल्यानेंच मोठ मोठ्या सरकारी हुद्याच्या जागा मिळतात.

धर्मशास्त्र अथवा वेद शिकून नव्हे. व्यवहारज्ञान शिकून अंमलदारांच्या जागा मिळतात. येवढ्या मुद्याच्या मंडनार्थ जर रा० दाजीसाहेबांनीं सिद्धता केली असेल तर न कळे. राजभाषा ही कीर्तिफलका अथवा अधिकारांची प्रकाशिका आहे. खरें ज्ञान प्राप्त होण्याकारितां जी भाषा शिकावी लागते, तिच्या ज्ञानापासून पैसे तर मिळत नाहींतच, उलटें दारिद्र्य मात्र येतें. या गोष्टीचें प्रत्यक्ष उदाहरण पाहण्यास लांव जाण्यांची मुळींच जरूर नाहीं. जरा वर डोळे करून भट्ट, भिक्षुक, शास्त्री, पंडित वगैरे विद्वान् वर्गाकडे पहा म्हणजे आपली खात्री होईल.

शेतकी व कारागिरी करण्यास विद्या शिकल्यानें कितपत फायदा होतो याचा आतां विचार करूं. कृषिकर्म व कारागिरीसारख्या महत्वाच्या कामांत ज्ञानाची अत्यंत अवश्यकता आहे. ज्ञानांकुरावांचून त्या धंद्यांत प्राविण्यसंपादक होतां येणार नाहीं. कृषिकर्म व कारागिरी यानें देशाचा विशेष फायदा होण्याचा संभव आहे, आणि याच कारणानें हल्लीं जो नीचवर्ग विद्यामृतपानांत निमग्न आहे; त्यास त्यापासून बाहिष्कृत करणाचा ब्राह्मणवर्ग प्रयत्न करित नाहींत. स्वतःच्या धंद्यांत कुशल होण्याकरितां प्रयत्न करणें हें प्रत्येक कारागिराचें कर्तव्य आहे आणि त्यायोगानें देशास विशेष फायदा होईल यांत शंका नाहीं. शेतांतखत कसें घालावें व त्याची मरामत कशी करावी; ही विद्या शेतकऱ्यांना अगोदर आली पाहिजे . आमचे शेतकरी हल्लीं या गोष्टीकडे थोडथोडी दृष्टि देऊ लागले आहेत; हें पाहून आह्मांस अतिशय आंनद वाटतो. शेतकी करण्याकरितां

कारकून तयार होण्याची मात्र अपेक्षा नाहीं. त्या त्या धंद्यांत पारंगत होण्याची विद्या आली ह्मणजे बस्स आहे. लेखनकेलनें स्वानुभव लिहून ठेवितां येईल ही गोष्ट मी कबूल करितों. आणि तेवढ्या फायद्याकरितां शिकणें असेल तर खुशाल शिका. माळावरील शेणी गोळा करण्याकरितां, शेतांत नांगर धरण्याकरितां कबरेस आंकडी कोयता बांधण्यासाठीं, गुरें राखावयाकरितां अथवा लंगोटीच्या शेवटास तंबाखूची गांठ मारण्यासाठीं ग्रचाज्युएट होण्याची मुळींच अवश्यकता नाहीं. थोडेसें टफ करितां आलें तरी बस्स आहे.

तुह्मी विद्या शिकता, ब्राह्मण ती शिका ह्मणतात; मग लबाडी कोणाची? तुमच्या त्या अज्ञानहस्तानें निरपराधी ब्राह्मणांस अपराधी ठरवून, त्यांना पाजी ह्मणण्याचा विडाच उचलला आहे वाटतें ? परंतु तसें करण्यापूर्वी थोडासा विचार केला होता कां ? साप ह्मणून भुई धोपटणें हें जर सत्यशोधकाच्या जन्मदात्रीनें शिकविलें असेल तर मात्र माझा निरुपाय आहे.

" (........चोऱ्या, खून, घातपात, लबाड्या, चहाड्या चुगल्या, तोंड पुंजे पणावगैरे.) नाहीं नाहीं ते प्रकार एकसारखे करून राहिले आहेत. तरी हजारांत एक श्रीमंत झालेला दिसून येत नाहीं." चौर्याद्यनन्वितकर्म करून श्रीमंत कां होतां येतें ? प्रसिद्ध उपदेशकांच्या लक्षांत ही गोष्ट कां येऊ नये ? चहाड्या चुगल्या करून उन्नतावस्था प्राप्त होणें हें अप्रशस्त काम करण्यास प्रसिद्ध उपदेशकांचे अनुयायी तयार असतात; हे केवढें तरी अश्लिल कृत्य ! ज्या वर्गात

आमच्या गोपाळ्यांचा जन्म झाला आहे; त्यां कुळांतील भयंकर दुर्गुण नाहींसे होण्याकरितां प्रयत्न करणें व स्वबांधवांचें लक्ष कृषिकर्मादि देशोन्नतिकारक गोष्टींकडे वळविणें विशेष श्रेयस्कर आहे. ज्यांत आपणांस कोणत्याही प्रकारचें ज्ञान नाहीं अशाप्रकारच्या विषयांत पडून वाटाघाट करणें हें सत्यशोधकानें धारण केलेल्या नांवास काळिमा आणणारें कृत्य आहे. ज्याचे पूर्वज चौर्यकर्मादि अनन्वितकार्यांत प्रवीण अशा लोकांची वर्तमानस्थिति कशी असली पाहिजे यांचें अनुमान कोणीही करू शकेल. वरील सर्व दुर्गुण तामसी आहाराचा एक परिणाम आहे; हें तत्व सत्यशोधकसमाजानें नित्यशः मनांत बाळगावें.

स्वकीय पक्षाची उन्नति होत नाहीं. ह्मणून ग्रंथकर्ते हांका मारीत आहेत. अनन्वितकर्में करून कां उन्नति होत असते ? सात्विकीवृत्तीनें जितकें उन्नतकारक कार्य घडेल तितकें तामसीस्वभावानें अथवा तशाच प्रकारच्या गुणानें घडत नसतें. तामसा नरकाः स्मृताः " हे जें श्रीमद्भागवतांत ह्मटलें आहे त्याचा सत्यशोधकसमाजांतील पुढाऱ्यांनीं विचार करावा. नरक ह्मणजे काय ? हा प्रश्न केल्यावांचून सत्यशोधक राहाणार नाहींत. नरक ह्मणजे स्वर्गांतील शिक्षाविशेष मानण्याचा जो प्रघात आहे तो मात्र नव्हे. ज्या अवस्थेला अत्यंत नीच असें या लोकीं ह्मणतो तीच नरकावस्था होय. तुमच्या लोकांची हल्लीं फारच खराब स्थिती दिसून येते. भलतें सलतें खाणें. पशुतुल्य वर्तन करणें. पातिव्रत्य अथवा ब्रह्मचर्य यांच्या तिरस्कार करणें, अपेय कीं ज्यापासून कोणत्याही प्रकारचा

फायदा नाहीं. असें आर्द्रपदार्थ पिणें, हिंसा अथवा प्राण्यांचा आहार करणें इत्यादि कृत्यें नरकप्रद ह्मणजे नीचस्थितीची द्योतक होत. या गोष्टींकडे सत्यशोधकसमाज दृष्टि देईल तर फारच उत्तम होईल.

विद्येसंबंधानें प्रसिद्ध केलेले उदात्त विचार विशेष अनुकरणीय आहेत; परंतु सत्यशोधकांच्या लिहिण्याप्रमाणें वागणारे कितीसे निघतील; याची शंकाच वाटते. विद्या शिकल्यानें कारागिरी मोडते असांतला मुळींच प्रकार नाहीं; इतकेंच नव्हे तर त्यायोगें तिला विशेष उत्तेजन येतें. न्हावी वगैरे लोकांस शास्त्रीयज्ञान कितपत श्रेयस्कर होईल त्याची वानवाच आहे. विद्या शिकल्यानें त्यांना आपल्या घरांतील पै आणि पैचा हिशेब ठेवितां येईल; परंतु द्रव्योत्पादक असा जो त्यांचा हजामती करण्याचा धंदा, त्यांत ह्या लेखन अथवा वाचनकलेनें सुधारणा करितां येईल काय? असेच कित्येकवर्ग आहेत किं, त्यांच्या धंद्यांत शेकडा पंचवीस लोकांस लिहितां वाचतां आलें तरी बस्स आहे. एकदम मोठा अविर्भाव दाखवून मोठ मोठ्या सुधारण्या होत नाहींत; हें तत्व सत्यशोधकांस कां आठवू नये?

"........अंधळेपणा जाऊन दिसूं लागण्यासाठीं जे डोळस साहाय्य होत नाहींत, रुकार देत नाहींत, उलट आडथळे आणितात, त्या लोकांस नीचाहून नीच, दुष्ट, चांडाळ, पाजी, कपटी, घातकी समजून आमच्या अंधळ्यांनीं त्यांना × × जवळ उभे करूं नये." (पहा पृष्ठ ६) हे विचार किती तरी अज्ञानतेनें खरडले आहेत! जे लोक डोळस अर्थात् ज्ञानसंपन्न ते पाजी, लुच्चे कसे ठरतात तें मला समजत नाहींत. पुस्तककर्तें

ज्यांना डोळस आहेत असें म्हणतात ते खरोखर तसे आहेत कां? ते जर तसे असते तर त्यांनीं कधींच आपल्यावर पगडा बसविला असता, हें आपण पक्कें समजा. बिचारे सात्विकीवृत्तीच्या पालनार्थ कायावाचामनानें प्रयत्न करीत असतां, या लांब दाढीवाल्या लोकांनीं त्यांना दुष्ट, कपटी, पाजी वगैरे अश्लाघ्य विशेषणें द्यावींत कां? आमच्या मित्रास ब्राह्मण डोळस म्हणजे ज्ञानसंपादित आहेत असें वाटतें; तर त्यांनीं तुमची अर्थात् आडाणी लोकांची उन्नति करावी किं स्ववर्गाची? ज्यांनीं स्वकष्टानें ज्ञान निर्माण केलें; त्यांनीं त्याचा उपभोग कां घेऊ नये? स्वतःच्या मालकीच्या मालाचा उपभोग घेणें हें त्यांचें पहिले कर्तव्य; व परोपकार करणें हें दुसरें. स्वतःचें कर्तव्य बजाविण्याकरितां ते नेहमीं प्रयत्न करीत आहेत. तुम्हांस ज्ञानामृताचा घोट देणें हें त्यांचें जें दुसरें कर्तव्य तें ते बजावित असतां; तुमचे तुम्हीच मित्रांना पीळ देऊन " तुम्ही कपटी, लुच्चे, * * जवळसुद्धां उभे करण्यास अयोग्य " असें उद्गार काढितां! ह्या तुमच्या आरेरावी स्वभावाला काय म्हणावें? आणि अशानें तुमची उन्नति ती कशी होईल?

सात्विकीवृत्ति पाळण्यांत जें सौख्य, जें महत्व तें अशा तामसी स्वभावांत नाहीं. अशी आरेरावी केल्यामुळेंच तुम्हांस स्वतःच्या अधिकारास विन्मुख व्हावें लागलें. ही गोष्ट सत्यशोधक कसे विसरले? असो. जे सात्विकीमार्गानें जाणारे ते तामसीजनांच्या सहवासांत येतील तरी कसे? कारण त्यांच्या त्या तामसी वृत्तीनें बिचाऱ्या सच्छीलसंपन्न लोकांवर भयंकर परिणाम घडण्याचा विशेष संभव आहे. आणि याच कारणानें ते शूद्रांचा संपर्क न होईल एतदर्थ प्रयत्न करीत असतात. आमच्या मराठ्या

बंधूंनीं त्या पवित्र ब्रह्मवृंदास * * जवळ उभें न केलें तर त्यांत ब्राह्मणास फायदाच आहे. मग मिशांना पीळ देऊन घोड्यावर पश्चिमाभिमुख बसणाऱ्या लोकांप्रमाणें आह्मी त्यांना * * जवळ उभें करणार नाहींत अशी खोटी प्रतिज्ञा करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. नीच लोकांचा सहवास जितका तोडवेल तितकी सनातनवैदिकधर्मांत जी सात्विकी अवस्था सांगितली आहे, तिचा मूळस्तंभ भक्कम होतो. ही कल्पना प्रसिद्ध उपदेशकांना कां आठवूं नये ?

ब्राह्मण ज्ञानवान् आहेत तेव्हां ते कपटी कसे झाले ? ज्ञानाचीं फळें जर कपट हीं असतील तर मात्र हरकत नाहीं. विद्या शिकल्यानें पाजीपणा वाढतो असा जर सत्यशोधकांचा समज असेल; तर मग विद्या शिका अशी शिफारस करण्याचें कारण काय ? विद्येनें लबाडी वाढत नाहीं उलटी कमीच होते; हें तत्व जर सत्यशोधकांस अवगत असेल तर ब्राह्मणांस लबाड असें कशावरून ह्मणतां ? " ब्राह्मणवर्ग डोळस आहे आणि तो आह्माला [ मराठ्यांना ] विद्या देत नाहीं. " येवढ्या वाक्यावरून तो लबाड ठरला कां ? राजाच्या खजिन्यांत पुष्कळ पैसा आहे; परंतु राजा आह्मांस देत नाहीं, तेव्हां तो राजा लबाड असें एखाद्या दरिद्यानें ह्मटल्यास तें शोभेल कां ? आणि असेच जर आपले सिद्धांत असतील तर मग आपल्या अकलेची कमाल झाली असें ह्मटलें पाहिजे. तुमच्या अंगीं विद्या शिकण्यास जे गुण पाहिजे आहेत, ते जर तुमच्यांत अद्यापि आले नाहींत, तर तुह्मी कितीही त्रागा केला, अपशब्दांची लाखोली वाहिली तरी ब्राम्हण विद्या शिकविण्यास तयार होणार नाहींत. "विद्या शिकवितां कि नाहीं? नाहीं तर हीच समशेर पहा." असा जर एखाद

आरेरावी शिष्यानें स्वगुरूला दरारा दाखविला; तर तो विपत्तिग्रस्त झालेला गुरु खरी विद्या देईल कां ? कधींही देणार नाहीं. आणि असें झालें असतां तुम्ही त्या गुरूला कपटी असें म्हणाल, तर तें शोभेल कां ? तुमच्या लोकांस जें विद्याधन मिळालें आहे, ते अशाच प्रकारचें आहे हें मी खात्रीनें सांगतों. तुम्हांस जर उन्नतावस्था पाहिजे असेल, तर तामसीधर्म सोडून सात्विक बना आणि व्हा पुढें.

तसेंच ते पृष्ठ ६ व ७ वर म्हणतात कीं, ब्राह्मण आपल्या मुलांस म्लेंच्छ विद्या शिकवितात. हें एक मोठें लोखंडी प्रमाण ग्रंथकर्ते दाखवितात. म्लेंच्छ विद्या कोणती ? या प्रश्नाचा अर्थ काय तो अद्यापि ग्रंथकर्ते समजले नाहींत. तुमचेच गुरु जे श्रीसमर्थरामदासस्वामी त्यांनीं दासबोधांत एक संस्कृत श्लोक दिला आहे, तो सत्यशोधकांनीं पाहिला नसेल असें वाटतें.:—

भाषाभेदाश्च विविधा अर्थ एको न संशयः ।
पात्रद्वये यथा खाद्यं स्वादभेदो न विद्यते ॥ *

ज्ञान सर्वत्र सारखें आहे. मात्र भाषेंत व धर्मांत भिन्नत्व आहे. आंग्लभाषा पडली राजकीय, तेव्हां ती शिकल्यावांचून गत्यंतरच नाहीं. कारण सर्व कायदेकानू त्याच भाषेंत पडले. दुसरा मुद्दा धर्मवैपारीत्याचा; तो मात्र आदरणीय नाहीं. कारण भगवद्गीतेचें तत्व आमच्या हाडामांसाशीं खिळून राहिलें आहे. " स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः " या वाक्याप्रमाणें परधर्माचा स्वीकार न झाला म्हणजे पुरे आहे. अशी

* भाषेचे भेद अनेक आहत; परंतु त्या सर्वांचा अर्थ एकच आहे यांत संशय नाहीं. दोन पात्रांत एकच पदार्थ खाल्ला असतां, जसा त्यांच्या रुचींत भिन्नत्व असत नाहीं तीच गोष्ट भाषेची.

जर खरी स्थिति आहे तर पाटीलबोवांनीं इंग्लीश भाषा शि-कण्यांत दोष तो काय काढिला ? पाटीलकी करणाराला मात्र इंग्लीश–भाषेपासून कांहीं उपयोग होणार नाहीं; हें मी-कबूल करितों.

येथून प्रसुत पुस्तकाचें जें तिसरें मथाळें "आमच्या लोकांस धर्मशास्त्राच नाहीं काय?" यास सुरवात होते. ज्यांना धर्म ह्मणजे काय तो कशाशीं खातात; त्याची आपणास जरूर आहे किंवा नाहीं? या गोष्टी समजत नाहींत; तसेंच कोणी ब्राम्हण आपला अमूल्य वेळ खर्चून धर्मोपदेश करू लागला, तर तुम्ही "व्हय भटुर्ड्या, मोट ग्न्यान सांगतोया; तुझ ते वंग्याळ समद ग्न्यान त्या धावळींमंदीं गुंडाळून ठ्येव." असें म्हणण्याला तयारच; तेव्हां अशा तुमच्या स्वच्छंदी लोकांकरि-तां धर्मशास्त्राची आवश्यकता आहे कां?

धर्म कोणाला? जो नियमानें वागण्याचा संकल्प करील त्याला. तुमच्यांत नियमितपणा इतका चोख आहे कीं, आज सकाळीं तोंड धुतलें तर उद्यां सकाळीं पुन्हां त्याची पाळी येते. आज स्नान केलें तर पुढें दहा दिवसांनीं त्याची वारी आल्यास येत असते. पवित्रता तर ३६ व्या पृष्ठावर दाखविलीच आहे. मुख इतके अपवित्र कीं, अभद्रशद्ब त्यांच्या पाट्यावरच पुजिले होते; तसेंच आज कोंबडी मारिली तर उद्यां बकरें, परव्हां ससा; तेर-वां एखादें बदक; त्याच्यापुढें खबुतर असें होतां होतां त्या बिचाऱ्या कुत्र्यावर पाळी न येवो. तात्पर्य अशा घातकी लोकांस धर्मशास्त्राची कितपत आवश्यकता आहे?

तुह्मी जर खरे आर्य आहा, तर तुम्हांस खरें धर्म-शास्त्र हें असलेंच पाहिजे, परंतु स्वच्छंदानें वागून स्ववासना-

बंधांत बद्ध झाल्यामुळें तुमचें पूर्वींचें धर्मबंधन तटून तुम्ही-केवळ पोळ बनलात, याचें कारण काय तर तुमचा अज्ञानपणा व ओरराबी स्वभाव. तुमचा धर्म कोणता? याविषयीं आर्यग्रंथ-संग्रहांत अनेक ठिकाणीं सांगितलें आहे; परंतु तुमच्या त्या तामसीवृत्तीच्या अभ्रपटलामुळें तुम्हांस तीं सुवर्णाक्षरें दिसत नाहींत; या तुमच्या मुर्खपणास काय म्हणावें ?

प्रत्येक मनुष्यास धर्म हा आहेच. ज्याला धर्म नाहीं असा एक तरी मनुष्य आढळेल काय? मोक्षमूलर भट्ट म्हणतात " ज्यांच्या बुध्दीस चांगला संस्कार झाला आहे ज्यास शास्त्रदृष्टि आहेत ज्याचें मन ज्ञानानें उज्वल झालें आहे, असा पुरुष अनंतशक्तीचें मनन करितो तो धर्म. त्याचप्रमाण अत्यंत बुद्धिहीन दुबल असा रानटी मनुष्य ज्याची स्थिति वानरापेक्षां फारशी चांगली नाहीं; तो एखाद्या लांकडाची किंवा धोंड्याची पूजा करितो, त्यांचेंही नांव धर्म हेंच होय." हीं गौरकाय गुरुजींचीं अक्षरें तुम्हांस कशीं स्मरलीं नाहींत कोण जाणें?

"......ब्राम्हणांस वेद, खिस्ती लोकांस बायबल, मुसलमान लोकांस कुराण, पारशांस झेंदागोस्ता असे ज्या त्या धर्माच्या लोकांस आपापल्या धर्माचें एकेक धर्मपुस्तक असतें व तें त्या त्या धर्मातील प्रत्येक मनुष्यास चांगलें माहिती असून तें पहाण्याचा, वाचण्याचा, पाठ करण्याचा वगैरे प्रकारचा अधिकार सर्वांना असतो. इ० इ० इ० " ( पहा पृष्ठ ७ ) आपला सनातन धर्म जर वेदांवरून उत्पन्न झाला आहे, तर आर्यधर्माचें पुस्तक वेद हें मानणें विशेष उचित आहे. तसेंच महंमदी वगैरे धर्मांचें खरें रहस्य दाखविणारें जें पुस्तक तेंच त्यांचें धर्मपुस्तक. तुम्ही आमचे आर्य आहां; तेव्हां तुम्हाला-

हीं धर्मपुस्तक असलें पाहिजे हें निर्विवाद आहे. इतर लोकांची धर्मश्रद्धा पाहून तुह्मांस जर ही वासना उत्पन्न झाली असेल, तर मात्र नवल वाटेंत. तसें वाटण्याचें कारण इतकेंच कीं, इतके दिवस जे तुह्मी धर्मभ्रष्ट झाला होता; ते आतां स्वधर्मांत येऊं पहातां. तुह्मांस दिवसेंदिवस असेंच वाटो, व खरा धर्म काय आहे; त्याचा तुह्मांस शोध लागो. अस्तु. अन्यलोकांस धर्मपुस्तक एकेकच आहे; परंतु तुमचें तसें नाहीं. मोठमोठ्या पंडितांनीं वादविवाद करून ग्रंथ लिहिले असल्यामुळें वैदिक-धर्मवृक्षाच्या मुळ्या अतिशय खोल गेल्या आहेत. धार्मिकविषयावर हिंदुस्थानांत आर्यलोकांचे दहा हजार ग्रंथ आहेत असें मोक्षमूलरभट्ट ह्मणतात. तुह्मी आर्य आहां; तेव्हां तुमच्यांत सात्विकवृत्ति असली पाहिजे; ती असल्याचें तुमच्यांत आढळत नाहीं; त्यामुळें तुह्मी तामसी ह्मणजे शूद्र झाला. शूद्राचा धर्म कोणता तो मनुसंहितेंत सांगितला आहे. तुमचे एकट्यांचेच तींत धर्म आहेत अशांतला मुळींच प्रकार नाहीं, सर्व मनुष्यांचे तींत धर्म आहेत. तुमचीही हल्लींची निकृष्ट स्थिति घालवून देण्याचे उपायही तींत सूचविलेले आढळतात. इतक्या गोष्टी जेथें सूचविल्या आहेत तें तुमचे एकट्याचेंच नव्हे आमच्या ब्रह्मवृंदाचेंही धर्मपुस्तक होय. कारण संपूर्णवेदांच्या अर्थास अनुरूनच मनुसंहिता निर्माण झाली आहे.

तुह्मी स्वधर्मभ्रष्ट झाला, यामुळेंच तुमचे अधिकार-धर्माध्यक्षांनीं काढून घेतले होते. तुमच्या अपराधाबद्दल तुम्हांस इतके दिवस शासन झालें होतें, तुह्मी शिक्षा भोगित होता; हल्लीं तुह्मी पश्चात्ताप झाल्याचें चिन्ह दर्शवित आहांत यतअर्थीं तुमचें धर्मपुस्तक घेऊन ते तुह्मीं खुशाल पाठ क

गळ्यांत बांधा, कोळून प्या; किं जेणेंकरून तुह्मांस त्याचें रहस्य उत्तम रीतीनें समजेल. ज्ञानी व्हा, अज्ञानास हांकून लावा. विचार न करितां कुत्र्यासारखें ब्राह्मणावर तोंड काय टाकितां !

इतके दिवस तुह्मी अनार्य कसे राहिलात; त्याचें आश्चर्य वाटतें. सत्यशोधकांसारखे तुमच्या समाजाचे पुढारी असतां, मराठे अनार्य कां राहवेत? कृतकर्माचा पश्चात्ताप होऊन धर्मपुस्तक कोणतें तुह्मी शोधीत आहां? हें पाहून आमच्या ब्रह्मवर्गास आनंद होईल यांत शंका नाहीं.

प्रत्येक मनुष्यास धर्माची जरूर आहे. इंग्लंडांतील प्रसिद्ध पंडित कॉम्प्ट ह्मणतात:—" धर्म ह्मणजे नीति. जो मनुष्य आपलें वर्तन, आपला आचारविचार ईश्वरानुज्ञेप्रमाणें आहेत असें समजतो, किंवा ठेवण्याचा यत्न करितो तोच त्याचा धर्म " याप्रमाणें धर्माच्या तत्वांचा इंग्लीश लोकांनीं विचार केला आहे. वरील गोष्टी ज्या पुस्तकांत सांगितल्या आहेत तींच तुमचीं धर्मपुस्तकें. धर्मपुस्तकें नाहींत असें तुह्मी कशावरून ह्मणतां? शूद्रकमलाकर, गागाभट्टी, कित्येक पुराणें, संपूर्ण स्मृत्या हींच तुमचीं धर्मपुस्तकें. वेदांनीं सुद्धां तुमचा धर्म तुह्मांस विभागून दिला आहे. मग तुह्मी अशी खोटी ओरड कां करितां ?

दुसरा आक्षेप क्षत्रिय ह्मणविण्याचा. क्षत्रिय ह्मणजे काय? " यः क्षतात् त्रायते स क्षत्रियः " ह्मणजे जो दुसऱ्याचें दुःखापासून रक्षण करितो तोच क्षत्रिय. राजे म्हणजे क्षत्रिय असा अर्थ करणें केवळ मूढपणाचें द्योतक आहे. वर्णव्यवस्थेंत ज्यांना क्षत्रिय असें म्हटलें जातें, ते जरी राज्यच्युत असले तरी त्यांना क्षत्रियच ह्मटलें पाहिजे. राज्यकर्ते ते क्षत्रिय असा अर्थ केल्यास मुसलमान, पारशी, चिनी, राशियन, जर्मन, इंग्लीश वगैरे

लोकांससुद्धां क्षत्रिय असें म्हणावें लागेल. अर्थात् चातुर्वर्णाची व्यवस्था तेथें आहे असें मानणें प्राप्त होईल. क्षत्रिय शद्बाचा अर्थ दोन गोष्टीवर अवलंबून आहे. गुण आणि कर्म या दोनच गोष्टींचा त्यांत समावेश होतो. राज्य करणें हा धर्म कर्मवाचक होय, गुणवाचक नव्हे. गुणवाचक शौर्यादि सुगुणावर अवलंबून आहे. इतकेंच नव्हे तर सच्छील, उदारत्व, अतिथ्याभ्यागतांचा सन्मान करणें, ब्रम्हवृंदांची एकनिष्ठेनें सेवा करणें, शत्रूस हार न जाणें, राज्यसूत्रें न्यायानें चालविणें, प्रजेचें सामर्थ्य केवढें व त्यास आपण किती श्रेष्ठमान द्यावा; ह्या सर्व गोष्टींच्या आचरणाचा जेथें थोडा अथवा ज्यास्त बोध होतो तो जातिवाचक क्षात्रिय हें उघड आहे.

कदाचित् तुम्ही क्षत्रियवंशज असाल; परंतु तुमचें तें मूळतेज सोडून त्यापासून स्वधर्म बहिष्कृत झालात. जे क्षत्रियवीर ब्राह्मणांस पवित्र मानीत होते; त्यांचेच नातू असे दिग्विजयी निघावेत काय ? रसायनशास्त्रांत “ मूळ पदार्थांच्या धर्मात दुसऱ्या अनेक पदार्थांचें धार्मिकमिश्रण केलें; तथापि त्याचा जो मूळचा हेतु तो सर्वांशीं लयास जात नाहीं.” असा एक सिद्धांत आहे. त्यावरून पाहतां, हें जर क्षत्रियबीज म्हणावें तर दुसऱ्या तिसऱ्या गोष्टींचा कां वेरे आभास होतो ? नवनंदांचें वर्तन कोणत्या प्रकारचें होतें; आणि मुरेचा पुत्र जो चंद्रगुप्त, त्याचें आचरण कोठें ? मिश्रणांत किंचित् भिन्नत्व येतांच मूळ प्रकृतिधर्म कमी झाला. तशीच स्थिति या लोकांची असावी यांत शंका नको. असो.

तुमच्या वर्तमानिक आचरणा वरून पाहातां, तुमची गणना कोणत्या वर्गात करावी तें अद्यापि समजत नाहीं. तुम्ही ब्राह्मण आहांत असें म्हणावे तर तुमचे आचरण तितकें किंबहुना एक

लक्षांशही नाहीं. क्षत्रिय म्हणावें तर तुमच्या अंगीं तरवार धारण करण्याचें व क्षत्रियत्व पाळण्याचें सामर्थ्य नाहीं; इतकेंच नव्हे तर तुमच्या त्या दुराचरणप्रवृत्तीनें पवित्र लोकांवर मात्र कहर कोसळू लागले आहेत; इतके तर तुम्ही कुलदीपक. वैश्य म्हणावें तर व्यापाराचा अभाव. शूद्र म्हणावें तर ब्रम्हद्वेष. शूद्रांचा धर्म ब्रम्हवृंदांची सेवा चाकरी करून त्यांना खूष ठेवणें अर्थात् या चातुर्वर्ण्यव्यवस्थेंत तुमच्या लायक एखादी जागा अद्यापि आढळत नाहीं.

" ब्राम्हणांनीं आम्हांस फसविलें " असें म्हणणारा पूर्वी एकही पुरुष निर्माण झाला नव्हता. या कलियुगांत असुरीकृत्याचे प्रवर्तक जोतिराव फुले मात्र निर्माण होऊन त्यांनीं आपल्या शिष्यसमूहाकडून ब्राम्हणांची निर्भर्त्सना चालविली होती. त्यांच्या पाठीमागें त्यांची दीक्षा आमच्या मित्रांनें घेऊन दुराचाराचा प्रसंग साजरा करण्याचा प्रयत्न ते अद्यापि करीत आहेत. असो. तुमच्या वर्गांतील कित्येक पुरुष हल्लीं राज्यकर्ते आहेत; तेव्हां तुम्ही म्हणाल कीं, " आम्ही जर क्षत्रिय नसतों, तर आमच्या वर्गास राज्यसुख मिळालें असतें कां ! " याचें उत्तर अगदीं थोडें आहे. पूर्वी असुर राज्य करित होते; त्यांना कधीं क्षत्रिय असें म्हटलें होतें कां ? राज्य करण्याची सर्व लोकांस मोकळीक आहे. केवळ क्षत्रियांनीं अथवा ब्राम्हणांनींच राज्योपभोग घ्यावा असें शास्त्राज्ञेवरून मुळींच सिद्ध होत नाहीं. राज्यलक्ष्मीला नेहमी चंचला असें म्हटलेलें आढळतें. क्षत्रियांनीं तेवढा लक्ष्मीचा उपभोग घ्यावा अर्थात् हल्लींच्या कालमानाप्रमाणें श्रीमंत व्हावें, व दुसऱ्या लोकांनीं दारिद्र्यांत राहवें; असा नियम जसा कोणाच्यानेंही हो-

णार नाहीं, तीच अवस्था राज्यासंबंधाची. मराठ्यांनीं तेवढें राज्य करावें; ब्राह्मण, कायस्थप्रभु, सोनार, शिंपी इत्यादि लोकांस गादीचा अधिकार नाहीं हा समज केवळ मूर्खपणाचा आहे, यांत संशय नाहीं. अंत्यजसुद्धां गादीचा अधिकारी आहे असें मनूनें लिहिलें आहेः—

न शूद्रराज्ये निवसेन्नाधार्मिकजनावृते ।
न पाषंडिगणाक्रान्ते नोपसृष्टे ऽन्त्यजैर्नृभिः ॥

मनु. अ. ४ श्लो. ६१

**भावार्थः**—जेथें शूद्र हा राजा आहे, ज्या राजाचे शूद्रादि अधार्मिकलोक मंत्रि आहेत, जेथें पाषंडी लोकांचें महत्व विशेष आहे व जेथें अंत्यज हे राज्य करितात, तेथें पवित्र लोकांनीं राहू नये.

हीं मनूचीं अक्षरें. तूर्त आपणास यांतील एक गोष्ट घ्यावयाची आहे कीं, शूद्र व अतिशूद्र यांस राज्य करण्याचा अधिकार आहे, मग तो कसा कां असेना. राज्यकर्ते तेवढे क्षत्रिय असें म्हणणें केवळ चुकीचें आहे असें, मनूच्या लिहिण्यावरून दिसतें. अर्थात् " आम्ही क्षत्रिय " अशा प्रकारानें ओरड करून कंठशोष करणें अयोग्य. खरे क्षात्रिय तर बाजूवरच राहिले. बिचाऱ्यांच्या कुळावर आज केवढाले प्रसंग कोसळले आहेत. त्यांच्या हातांतील सर्व राज्यसूत्रें काळाच्या फेऱ्यामुळें नष्ट झालीं! जे दुसऱ्या लोकांचें तारण करीत असत; त्यांनाच हल्लीं दुसऱ्या लोकांच्या तोंडांकडे पहाण्याचा प्रसंग यावा कां ? सत्यशोधका, जे चंद्रसेनाच्या वंशांत निर्माण झाले; ज्यांचा वंशवृक्ष चंद्रसेनापासून हा वेळपर्यंत एकसारखा

मिळतो, तेच खरे क्षत्रिय. त्यांचें तें शौर्य; कारकुनी बाणा; राज्य-कर्तृत्व हें मनांत आणिलें असतां. हल्लींची त्यांची स्थिति किती तरी शोचनीय झालेली आहे, त्याची खात्री होईल. अस्तु.

ब्राम्हण; मुसलमान, पार्शी, ख्रिस्ती वगैरे लोक आपल्या धर्मातील स्तोत्रांचा नियमानें पाठ करितात आणि तुम्ही करीत नाहीं, याबद्दल जो खेद सत्यशोधकानें प्रदर्शित केलेला आढळतो तो बरोबर आहे; परंतु तुम्ही आपला पूर्वींचा स्तोत्रपाठकप्रघात कां सोडून दिलात? हा केवळ तुमचा मूर्खपणा होय, हें उघड आहे. म्लेंच्छ लोकांस धर्माचें एकच पुस्तक असतें, तसें तुम्हांस नाहीं. तुम्हाला अनेक ग्रंथ दिले आहेत. तुम्ही आपलें सगळें आयुष्य त्यांच्या वाचनांत घालविलें तरी ते धर्मग्रंथ संपणार नाहींत, असें असतां, धर्मग्रंथ नाहींत म्हणून उगेंच कां ओरडता?

" ........ तुम्ही धर्मशाळेंतील मुशाफरांच्या गोष्टी ऐकत बसणारे आहात." या गोष्टी ऐकिणें तुमच्या लोकांस प्रिय वाटत असतें. गुडगुडीची नळी तोंडांत धरून अचकट विचकट गप्पा ठोकणें हें यवनांचें अनुकरण तुम्ही केलेलें पाहून आमच्या पवित्र ब्रह्मवृंदांस त्यापासून विशेष दुःख होईल यात संशय नाहीं. तुमच्या लोकांतील हे असे समज जसे जसे सुधारत जातील, तस तशी तुम्हांस उन्नतावस्था प्राप्त होईल. धर्मशाळेंतील वायफळ गोष्टी ऐकिणें ज्यावेळीं तुमच्या लोकांस अप्रशस्त वाटेल तोच सुदिन.

" ........ तुम्ही ज्या घराच्या अंगणांत राहतां तें घर तुमचें वडिलार्जित असून तुम्ही अंगणांत आणि परके तुमच्या

दिवाणखान्यांतील पलंगावर बसून मौजा मारीत आहेत! !"
(पहा पृष्ठ ८) मराठ्यांच्या घरांतील पलंगावर मौजा मारणारे ब्राम्हण आणि अंगणांत राहणारे आमचे मराठे! बाबांनो, तुम्ही अंगणांत कां राहतां? तुमच्या दिवाणखान्यांत ब्राम्हण गेले तरी खरे का! दिवाणखान्यांत काय आहे? त्यांनीं तुमच्या दिवाणखान्यांत जाऊन मौजा त्या काय मारिल्या? इत्यादि प्रश्नांचा निर्णय सत्यशोधक करतील काय?

ब्राह्मण, मराठ्यांच्या घरांत राहत आहेत आणि मराठे अंगणांत राहतात. अशा कोणत्या गोष्टी कीं, मराठ्यांचें सौख्य ब्राम्हणांनीं हिरावून घेतलें! मराठ्यांच्या पूर्वजांनीं तयार केलेलीं धर्मशास्त्रें ब्राम्हण आपल्या जवळ ठेवितात व त्याप्रमाणें ते वागतात; असा जर सत्यशोधकांचा हेतु असेल तर नकळे. धर्मशास्त्रें व्यास, पराशरादि ऋषिवर्यांनीं केलीं, तीं मराठ्यांनीं अनीतीनें वागण्याकरितां किं ब्राम्हणांनीं सत्यव्रतानें चालण्यासाठीं? अनीतीनें वागण्यासाठीं नाहींत हें उघड आहे.

आमच्या मित्रानें इतकें भयंकर व अश्लील वाक्य उच्चारिलें नसतें तर बरें झालें असतें. त्यांना तसें लिहावयाचेंच होतें; तर तें अन्यप्रकारानें लिहितां आलें असतें. व्यवहारिकसंबंधांत भाषा कशा रीतीनें बोलतात; या अनुभवासही तुम्ही अनभिज्ञ कसे राहिलात? पलंग या शब्दाचा अर्थ इतका दोषास्पद आहे कीं, तो शब्द उच्चारिणें हें महत्पाप असेंच समजलें पाहिजे. हा तुमचा केवढा अज्ञानपणा! अभद्रशब्द तर त्या जिव्हेवर चिकटलेलेच आढळतात. तुमचीं हीं अभद्र वाक्यें वाचून हंसावें नाहीं तर काय करावें? वस्तुतः इतका अश्ला-

ध्य प्रकार घडलेला नसतां, कोणत्याही कार्याचा बाऊ दाखवून अथवा व्याजोक्ति करून लोकांच्या मनास उच्छृंखलता आणणें हें अत्यंत दोषास्पद आहे. आमच्या सत्यशोधकासारख्या प्रौढ मनुष्याकडून असा अश्लाघ्य प्रकार घडणें हें मोठेंच आश्चर्य!

नामांगल्यं वदेद्वाचं न च हास्याधिको भवेत् ।
वर्जयेत्कलहं लोके नाशुचिःस्यात्कदाचन ॥ *

मनु अ. ७

हें जें नैतिकतत्व त्यास आमचे सत्यशोधक कसे विसरले कोण जाणें? जेणेंकरून कलह न होईल, लोकांस वाईट वाटणार नाहीं, अभद्र शब्दांचा उच्चार होणार नाहीं, ह्या गोष्टींकडे सत्यशोधकांनें आपली सत्यदृष्टि देणें विशेष विहित होय.

" ........ कोणकोणते फरक. करून तुम्हांस अजिबात ढकलून दूर केलें आहे याचें कांहीं तरी तुह्मांस गुमाण [ ! ] आहे काय? आपलाच माल आपल्याच डोकीवर घेऊन चोराच्या पदरांत नेऊन घालू लागल्यास तुह्मी भिकारी झाला म्हणून रडू लागाल तर तुमच्या रडण्यास कोणबरें हंसणार नाहीं. तुम्ही म्हणाल कीं, याला पुरावा कोठें आहे? पुरावा राहू देणार कच्चे चोर नाहींत. "' पुराणें वगैरे ग्रंथांत ब्राह्मणांनीं फेरफार केला, हा मोठा संशय सत्यशोधकांच्या मस्तकांत भिनून राहिला आहे. असा एक तरी ग्रंथ दाखवा व त्यांत क्षेपकें आहेत असें सिद्ध करून द्या. जे लोक अज्ञान त्यांचे असे विचारपरिणतकल्पनातरंग बाहेर येणें हें साहजिक आहे. जेथें कांहीं प्रमाण नाहीं. तेथें क्षेपकें आहेत असें

* अमंगल बोलू नये तसेंच अधिक हंसूं नये. लोकांत कलह करणें वर्ज करावें व कधींही अशुद्ध राहू नये.

म्हटलें ह्मणजे झालें; परंतु क्षेपकें ह्मणजे काय? हीं कशीं सिद्ध करून द्यावींत, एतद्विषयीं रा. गोपाळ्यांनीं पुनः एकदां शोध करावा. आर्यसमाजांतील कित्येक लोक क्षेपकें काढण्यांत हल्लीं गढून गेले आहेत; इतकेंच नव्हे तर त्यांनीं असे कांहीं श्लोकही काढिले आहेत; परंतु तीं खरीं क्षेपकें नव्हत. त्यांच्या मतांच्या विरुद्ध जे जे श्लोक आढळले, तेवढे ते क्षेपकें म्हणून समजतात. या अज्ञानानें खऱ्या धर्मांत पुनः घोटाळा होण्याचा संभव आहे.

मराठे लोकांनीं आपल्या डोक्यावर ग्रंथांचा भारा घेऊन तो स्वतःचा माल चोरांच्या म्हणजे ब्राम्हणांच्या पदरांत कशा रीतीनें घातला? ब्राम्हणांना मराठ्यांनीं ग्रंथ नेऊन दिले; असें सत्यशोधकांच्या लिहिण्यावरून दिसतें. मराठ्यांनीं ब्राम्हणांना ज्ञान दिलें असा गोपाळ्यांचा हेतु आहे, ज्ञान आणि तें मराठ्यानीं शिकविलें हें कशावरून? स्वप्नांत तर ही गोष्ट नव्हतीना आली; जे अज्ञान; त्यांनीं ब्राह्मणांस ज्ञान दिलें? असें ह्मणणें ह्मणजे नातवानें आजास बोध करण्यासारखें नव्हे काय? सत्यशोधकांच्या विचारतरंगाची आतां तर शिकस्त झाली; असेंच म्हटलें पाहिजे.

धर्मशास्त्राचे ग्रंथ ब्राह्मणांच्या हातीं गेले व त्या योगानें मराठे भिकारी झाले. ग्रंथ गेल्यानें तुह्मांस दारिद्र्य तें कसें आलें? बरें मराठ्यांनीं ब्राह्मणांस ग्रंथ दिले ही गोष्ट तरी खरी कां? मग एका ठिकाणीं तुह्मीच असें ह्मणता कीं, ग्रंथ ब्राह्मणांनीं वळोवेळीं तयार केले; व येथें ग्रंथ ब्राम्हणांच्या हातीं गेले. सत्यशोधका, या दोहोंतून सत्य व असत्य कोणतें? तें तूं अगोदर कां बरें शोधून काढिलें नाहींस. जोपर्यंत तूं तशा

रीतीनें तें सिद्ध करून देणार नाहींस तोंपर्यंत तुमच्या विचारांत स्थायिकहेतूंचा अभाव आहे; येवढेंच बाहेर पडतें. तुम्ही सत्यशोधक म्हणवितां आणि असा असत्यप्रलाप कां बरें घडविता ! दारिद्य येणें अथवा न येणें हें स्वकर्तव्यावर अवलंबून आहे. स्वतःच्या चुकीनें दारिद्य आलें आणि त्याचें खापर भटाच्या माथ्यावर ! सत्यशोधका, तुझ्या ह्या काकतालीयन्यायाची धन्य आहे !

सत्यशोधकांजवळ त्यांचे मराठे बंधु पुरावा मागतील; परंतु येथें तर पुराव्याचा अभाव. तेव्हां तो प्रसंग टाकून नेण्याकरितां एक खोटीच गप्प झोडून सत्यशोधक वाचकांच्या आक्षेपांपासून घटकाभर मोकळे झाले. पुरावा लपवून ठेवणार म्हणजे ब्राम्हण ते कांहीं कच्चे नाहींत. याप्रमाणें असत्ययुक्त भाषण ठोकून आज आलेलें संकट उद्यांवर लोटून दिलें; परंतु येवढा विचार कां केला नाहीं कीं, मी सत्यशोधकांचा प्रसिद्ध उपदेशक आहें. ब्राम्हणांनीं पुरावा चोरून ठेविला याला कांहीं प्रमाण सत्यशोधकांजवळ आहे काय? पुरावा नसल्यास मनास वाटेल तशा बाता ठोकण्याचा त्यांचा नित्यक्रम आहे येवढें मात्र सिद्ध होईल. मित्रा, तूं असा शिळोप्याच्या वेळीं जो गप्पा ठोकीत बसतोस आणि समाजांत कोलाहल मातवितोस हा तुझा केवळ पोरकटपणा होय. तुझ्या या बाललीलेचा परिणाम राष्ट्राच्या विनाशास मात्र कारण न होवो; हीच परमेश्वराजवळ विनंति आहे

ब्राम्हण जर पुरावा चोरून ठेवणारे असते तर तुमच्याच गौरकाय गुरुजींनी खालील वाक्यें कां बरें काढिलीं असतीं ? मि० टाम्सन यांनीं भगवद्गीतेच्या इंग्लीश भाषांतराच्या प्रस्तावनेंत म्हटलें आहे कीं, " संस्कृत इतिहाससंबंधानें विरुद्धपक्षांनीं जे जे दोष पुढें आणिले आहेत. ते वादग्रस्त असून निव्वळ खोटे आहेत असें मी ठरवितों. " तसेंच युरोपांतील प्राच्य पंडित मि० बर्नेल्फ हे म्हणतातः—" एखादा संस्कृत ग्रंथ मन लावून वाचणें, अर्थ समजून घेणें व दुसऱ्या भाषेतील ग्रंथांशीं त्याची तुलना करणें इत्यादि गोष्टी बिनचूक झाल्यावर संस्कृत भाषेंत इतिहासांचीं साधनें अतिशय विपुल आहेत असें दिसून येतें. ऐतिहासिक माहिती इतकी सविस्तर लिहिलेली आढळते कीं, आर्य लोकांच्या कारकीर्दीच्या खड्यान् खड्याचा इतिहास लिहिण्यास त्या माहितीवरून उपयोग होईल. " सत्यशोधका, सांग आतां भटांनीं तुमचे ग्रंथ चोरून नेले कीं, त्यांची जोपासना केली ? मग बिचाऱ्यांच्या नांवानें खडे कां फोडितां ?

" जे लोक तुमच्या ज्ञान संपादण्यांत आड येत असतील, त्या धूर्तांस दारांत उभे करू नका; ह्मणजे तुमचे सर्वस्वीं कल्याण होईल. " ज्ञान संपादण्यास तुमचे तुम्हीच आड येत आहा. ब्राम्हण तर तुम्हांस अनुकूल आहेत; ते तुम्हांस नेहमीं सांगतात कीं, तुह्मी ज्ञानी व्हा आणि कृषिकर्मांत सुधारणा करा. तुह्मी विद्वान् झाल्यानें ब्रह्मवृंदांच्या पूर्वजांचें कांडी इतकेंही नुकसान होणार नाहीं. घ्या पुस्तकें आणि शिका. त्यांत त्यांची कांहीं हरकत नाहीं. तुमचे ते अविचारी बंधुच उमजत नाहींत; त्याला ब्राह्मणांनीं काय करावें?

विद्या शिकण्याला ब्राह्मण जर व्यत्यय आणित नाहींत; तर मग तुह्मी दाराशीं कोणाला उभे करणार नाहींत? तुमच्याच बंधूंना ना? आणि तसें केल्यावांचून ते ताळ्यावर येणार नाहींत. याकरितां त्यांना अगोदर अनुकूळ करून घ्या आणि मग सुधारणेच्या पाठीमागें लागा. " उचलली काठी आणि लागले लांडग्याच्या पाठी " याप्रमाणें करीत गेल्यास तुम्हांस खात्रीनें खाड्यांत पडावें लागेल.

आतां सत्यशोधक समाजाच्या प्रसिद्ध उपदेशकांच्या पुस्तकांतील चवथा विषय जो "ब्राह्मणांचा हक्क नाहीं; अशा बद्दल हायकोर्टाचा ठराव " या मुख्य विषयास सुरुवात करितों. मराठे लोकांवर ब्राह्मणांचा धर्माच्या बावतींत कोणत्याही प्रकारचा हक्क नाहीं अशाविषयीं कोर्टांतलि ठराव देण्याची अवश्यकता नव्हती. न्याय कोणी केला? ख्रिस्तीभक्तांनीं. राजभाषा आली म्हणजे संस्कृतभाषेंतील धर्मशास्त्राचें पूर्ण ज्ञान होतें अशांतला मुळींच प्रकार नाहीं. ज्यांना संस्कृत भाषेचें पूर्ण ज्ञान आहे, जे आमचें धर्मशास्त्र साग्र समजतात; अशा जर एखाद्या मनुष्यानें मग तो गौरकाय कां असेना; त्यानें जर न्याय केला असता, तर त्याला परमेश्वरापेक्षांही श्रेष्ठ मानिला असता.

तुम्ही धर्मबंध तोडून मोकळे झाला, तेव्हां तुमच्यावर धर्मानें प्रतिबंध तरी कसा करावा? आमचा धर्म ह्मणजे सात्विकवृत्तिचें पालन! हें मागें सिद्ध करून दाखविलेंच आहे. असो. तुमची तामसीवृत्ति तेव्हां तुमच्या संबंधाचा न्याय कोणत्या शास्त्रास अनुसरून करावा? अशा प्रकारचा प्रश्न जज्य साहेबांच्या मनांत कशावरून आला नसेल? आणि याच

कारणावरून जर तुह्मास निर्दोषी ठरविले असतील तर योग्य न्याय झाला असेंच मी समजतों. ब्राह्मणांचा अधिकार धर्मानें चालणारावर. परधर्मांत गेलेले, स्वधर्माचा त्याग केलेले, अशा लोकांवर त्यांचा अधिकार नसणें हें स्वाभाविक अहे.

" जिकडे तिकडे आपले लोक ब्राह्मणांची गरज न ठेवितां स्वतः धर्म संबंधीं सर्व विधि करू लागले. मुली मुलांचीं लग्नेंही स्वतः आपल्या जातीकडून करूं लागल्यावरून ब्राह्मण लोकांस मोठी चिंता प्राप्त झाली. " तुमच्या लोकांनीं धर्मबंध तोडिला ह्मणून ब्राह्मणांस वाईट वाटणें व तुमच्या लोकांस क्षणिक हर्ष होणें हें सहाजिक आहे. पृष्ठ ७ वर धर्मशास्त्राची अवश्यकता दर्शवितां आणि या नवव्या पानावर धर्मशास्त्राची परवा ठेविली नाहीं ह्मणून कृतार्थता मानितां, यांतील खरें कोणतें ? प्रत्येक मनुष्यास धर्माचीं जरूर आहे. त्या त्या धर्मांत धर्मोपदेशक व धार्मिककार्य करण्याऱ्या विद्वान् मनुष्याची गरज असतेच. जे पूर्वीपासून विद्वान्, ज्यांचें सगळें आयुष्य वेदाध्ययनांत खर्च झालें, जे धर्ममीमांसा जाणण्यांत तत्पर, असे लोक जसे धर्मकार्य न्यायानें व प्रमादविरहित करतील, तसें तुमच्यांत जेम तेम करून भागविल्यानें होणार नाहीं. कारण तुमची वृत्तितामसी, आचरण नीतिभ्रष्ट, व्यवहार गलिच्छ, ज्ञान अपूर्ते इत्यादि, गोष्टी जर तुह्मांस अनुकूळ आहेत; तर तुह्मी स्वतःच कर्मे चालवितों अशा प्रकारची जी अभिमानोक्ति काढितां त्यांत अर्थ काय ?

माझें असें ह्मणणें नाहीं कीं, तुह्मी आपला उपाध्येपणा ब्राम्हणांनाच द्या. जे अहिंसा धर्म पाळणारे, सत्यव्रतानें चाल-

णारे, यज्ञयागादिक्रियेंत प्रवीण, धर्मशास्त्राचें रहस्य जाणणारे, वेदविशारद, सात्विकवृत्तीचे परिपालक असे संपन्न लोक शोधून काढून त्यांना धर्मगुरु माना. मग तो जंगम, तुमचा स्वजातीय, अंत्यज [मेलेले ढोर खाणारा मात्र नसावा] कां असेना, त्याला तुह्मी खुशाल गुरु माना. त्याचें चरणसरोजतीर्थ प्राशन करा. ईश्वरापेक्षांही त्याला श्रेष्ठ माना. ह्मणजे धर्माचें खरें रहस्य काय आहे, तें तुमच्या लक्षांत येईल.

तुमच्याप्रमाणेंच मत्स्यगंधेपासून उत्पन्न झाला, ज्याला व्यास असे ह्मणतात, ज्याची ख्याती ब्राह्मणच नव्हे तुह्मी पण वेळोवेळीं गातां, तोच व्यास काय ह्मणतो हें नीट पाहिलें आहे कां ? व्याससंहितेच्या चवथ्या अध्यायांत कृष्णद्वैपायन ह्मणतातः—" ब्राह्मणात्परमं तीर्थं न भूतं न भविष्यति " या वाक्याचा जरा दूरवर विचार करा. ज्या व्यासाला तुह्मी शूद्र किंवा त्यापेक्षांही नीच असें मानितां, जे तुमच्या वर्गांतील आहेत असें समजतां, तेच व्यास ब्राम्हणांची स्तुति करितात. आतां व्यास खरे कीं, सत्यशोधकसमाजाचे प्रसिद्ध उपदेशक खरे ? ज्या व्यासानें अष्टादशपुराणांची रचना केली, भगवद्गीते-सारख्या निगूढग्रंथांस जन्म दिला; त्यांना त्यांच्याच बंधूनीं म्हणजे रा. दाजीसाहेबांनीं दोष देणें कितपत प्रशस्त आहे?

पाटीलबुवा सारखे अज्ञानांधशूद्रवर्गानें ब्राम्हणांचा त्याग केला ह्मणून त्यांचें कांहीं नुकसान झालें नाहीं. कारण शूद्राचा हा अनाचार पाहून त्यांचा संपर्क तोडणें त्यांना इष्टच होतें. यांत ब्राम्हणांना चिंता ती काय पडली ? तुम्ही धड हिंदु न मुसलमान असें बनला; यांत ब्राह्मणाचें काय गेलें ? तुम्ही मात्र नियमित-

पणा व स्वकर्तव्य यापासून बहिष्कृत झालात. आणि तसें होणें तुम्हांस जर प्रिय वाटत असेल तर तुम्ही पृष्ठ सातमध्यें धर्मशास्त्राविषयीं दुःख कां प्रदर्शित केलेंत?

हायकोर्टानें केलेल्या ठरावासंबंधानें पुस्तककर्त्यांनीं हकीकत देऊन ब्राम्हण जज्यानें खोटा न्याय केला, तेव्हां प्रतिवादी यानें मुंबई हायकोर्टांत अपिल केलें; तेथें ब्राम्हणांच्या विरुद्ध निकाल झाला व ब्राम्हण काळे ठिक्कर पडले; इत्यादि प्रकारची माहिती दिली आहे. इतकेंच नव्हे तर आतां ब्राम्हणांचा आमच्यावर कोणत्याही प्रकारचा हक्क नाहीं; असें म्हणून मि. दाजीसाहेब यांनीं टिऱ्या थोपटिल्या आहेत. प्रसिद्ध उपदेशका, तुझ्या उद्योगास हल्लीं या कोर्टांत यश आलें बुवा. तूं आणि परमेश्वर यांत कोणत्याही प्रकारचा भेद राहिला नाहीं. तूं जी पूर्वदिशा म्हणशील ती कायम ठरूं लागली; तेव्हां तुला ईश्वर न म्हणावें तर काय करावें ?

ब्राम्हणांस एक पैचाही दानधर्म करूं नये, नका करूं. तुम्ही आम्हांस कांहीं दक्षिणा द्या असें सांगण्याला ब्राम्हण तुमच्या घरीं कधीं आले होते कां ? खेकडी खाऊ लोक दानधर्म तो काय करणार ? हायकोर्ट झालें म्हणून तें कांहीं परमेश्वर प्रणीत नाहीं. मनुष्यांनीं केलेलें तेव्हां त्यांत प्रमादातिशय घडणें हें स्वाभाविक आहे, मग ह्या मत्स्यभक्षक दाजी साहेबांस त्याचा हर्षामर्ष कां वाटावा ? स्वतःच्या तीन टोकाच्या पागोटीचा अभिमान तर नव्हेना ? ब्राम्हण लोकांचा आज आम्ही हायकोर्टासमोर पराभव केला; ही गर्वोक्ति जर त्यांच्या अंतःकरणांत संचरली असेल तर वांडे म्हणविणाऱ्या लोकांत अद्यापि अज्ञानपणा जागृत आहे असेंच म्हटलें पाहिजे.

इंग्रजसरकारची राज्यपद्धति अशी आहे कीं, ते कोणत्याही धर्मांतील मनुष्यावर धर्मसंबंधानें राजसत्तेचा जोर चलवित नाहींत. एखाद्या आंग्लदेशीय गौरवर्णी ख्रिस्त्यानें स्वधर्म सोडून तो उघडपणें आपलें लग्न महंमदी धर्माच्या स्त्रियेशीं काजीच्या हातून जर लावील, तर त्या प्रसंगीं पूर्वाश्रमीं खीस्त्यास बाप्तिस्मा देणाऱ्या पाद्रीभटानें लग्नक्रियेचा विधि तूं माझ्या हातून कां केला नाहींस ? अशी हरकत त्या ख्रिस्तीभटानें केल्यास तो महमदी स्त्रियेशीं लग्न करणारा ख्रिस्ती त्यास हार जाणार नाहीं. हल्लींच्या कोर्टानें केलेला ठराव याच धोरणास अनुसरून आहे. पाद्री भटानें आपला हक्क दाखविण्या करितां कितीही खटपट केली. तथापि राज्यकर्त्याकडून त्याला मदत देण्यांत येत नाहीं. सत्यशोधका, त्यांत तूं फुशारकी ती काय मारितोस ! आणि तुला टिऱ्या थोपटण्या इतका आनंद तो काय झाला? भोळ्या लोकांस फसविण्याकरितांच हा फैसला तूं पुढें आणिला आहेस. याशिवाय यांत दुसरें कांहीं तत्व निर्माण होत नाहीं.

" हल्लींच्या ब्राम्हणांच्या हातून धर्मविधि करून घेतल्यास ते निष्फळ होतात. " हा पांचवा विषय. हें कशावरून ? मलिन जागेंत राहणाऱ्या भूतानें तर यांच्या कानांत येऊन सांगितलें नसेलना ? पुराव्यांत आ० विश्वनाथ नारायण मंडलीक यांचा बांचे रायल एशियाटिक सोसायटींतील निबंध दाखविला आहे. त्यांतील सर्व मुद्दे खरे आहेत कां ? " चितपावन ब्राम्हणांचे मूळ पुरुष नौकेंतून हिंदुस्थान देशाच्या दुसऱ्या भागांतून अथवा अफ्रिका खंडाच्या पूर्वप्रदेशांतून आले. " रावसाहेबांचें म्हणणें कांहीं खोटें नाहीं; परंतु त्याचा अर्थ सत्यशोधकांस समजेल तेव्हां

खरा. सत्यशोधकांनीं कित्येक ठिकाणीं सह्याद्रिखंडाचा पुरावा दिला आहे, तेव्हां त्यांतील प्रमाणें प्रसिद्ध उपदेशकांस ग्राह्य असलींच पाहिजेत. चित्तपावन ब्राह्मण याच देशांतून वायव्य बाजूनें म्हणजे सौराष्ट्रादि देशांतून आले. आफ्रिकेची पूर्व म्हणजे सौराष्ट्र देश. येवढ्या वरून ते इजिप्तमधून आले असें म्हणतां येत नाहीं. सह्याद्रिखंडाच्या उत्तरार्धांत अध्याय ६ पहा.

प्रददौ च विशेषेण वेदविद्भ्यो विचक्षणः ॥
वर्षाशनानि सर्वेषामग्रहाराणि भार्गवः ॥ ५७ ॥
आर्यावर्तोद्भवानां च वेदवेदांगपारगः ।
करहाटमहाराष्ट्रैतैलंगानां द्विजन्मनाम् ॥ ५८ ॥
गूर्जराणां कान्यकुब्जचित्तपूतात्मनां तदा ।

या वाक्यांवरून काय सिद्ध होतें ? ब्राम्हण आफ्रिकेंतून आले ? ते जर बाहेरच्या प्रदेशांतून आले असें असतें; तर " आर्यावर्तोद्भवानां " हें पद कां आढळावें ? आर्य देशांत उत्पन्न झालेले जे ब्राम्हण त्यांना परदेशांतून आले असें कशावरून म्हणतां ? रावसाहेब मंडलिकांनीं जें म्हटलें आहे तें संस्कृत ग्रंथांच्या आधारानेंच. आमच्या मराठे लोकांस त्याचा निगूढ अर्थ कळेल तेव्हां खरें. हरणई व मुरुड यांची उत्पत्ति असेल कदाचित् दोनचारशें वर्षांवरची. तेवढ्यावरून या देशांत ब्राम्हण दोनशें किंवा चारशें वर्षांपूर्वी आले असें म्हणतां येत नाहीं. कोंकणांत अगदीं प्रथम हरणई व मुरुड येथें वस्ती झाली या गोष्टीला कांहीं पुरावा आढळतो कां ? अगदीं प्रथम वस्ती रत्नागिरी जवळ परशुराम नांवाचें जें क्षेत्र आहे तेथें झाली; यास अनेक प्रमाणें आहेत. सह्याद्रिखंडाच्या उत्तरार्धांपैकीं पहिल्या अध्यायांतील ४० व्या

श्लोकांत "स्थापिताश्चातुरंगके" असें एक पद आहे. चातुरंग नांवाच्या सह्याद्रीच्या भागावर त्यांची स्थापना केली. आतां हरणई मुरुड अगोदर कीं तें सह्याद्रीचें शिखर पूर्वींचें ?

" सह्याद्रिखंड अ० ६ या मध्यें चित्तपावन ब्राह्मण ज्या देशांत पूर्वीपासून रहात आले आहेत त्यास "बार्बर" असें ह्मटलें आहे. हा बार्बरी देश आफ्रिकेच्या उत्तरेस आहे. त्या वरून चित्तपावन लोकांची उत्पत्ति मिस्री ( इजिप्त येथील ) लोकांपासून आहे. " हे ग्रंथकर्त्यांचे शोध. त्यांनीं मोठ मोठ्या, ग्रंथांचीं नांवें अनुमानानें ठोकून दिलीं आहेत, यांत संशय नको. सह्याद्रिखंडाचे पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन भाग आहेत. पूर्वार्धाचा सहावा अध्याय पहातां, शिवरहस्यासंबंधाचा आहे. हा अथपासून इति पावेतों चार पांच वेळां वाचून पाहिला; परंतु सत्यशोधकांच्या खऱ्या शोधाचा पत्ता लागला नाहीं! कदाचित् तो शोध उत्तरार्धांत असेल, ह्मणून तेथें शोधूं लागलों; तों तेथेंही पूर्वीप्रमाणेंच चित्तपावनब्राह्मण बार्बरांतून आले असें मुळींच आढळलें नाहीं. मात्र कोंकणाचे सात भाग आहेत त्यांत बर्बर [ मलबार ] हा एक भाग आहे असें दर्शविलें आहे

केरलाश्च तुलंगाश्च तथा सौराष्ट्रवासिनः ॥ ४७ ॥
कोंकणाः करहाटाश्च करणाटाश्च बर्बराः ।
इत्येते सप्त देशा वै कोंकणे परिकीर्तिताः ॥ ४८ ॥

सह्याद्रिखंड उत्तरार्ध अ० ६

येवढ्या " बर्बर " शद्बावरून कोंकणस्थ बार्बरी देशांतून आले ही कोटी मराठे लढवित असतील तर न कळे? जें कांहीं लिहिणें तें विचारपूर्वक व सत्यास स्मरून लिहिल्यानें त्याचें

वजन विशेष पडतें. सत्यशोधका, तुझ्यांत असत्यप्रलापाचा सुकाळ असल्यामुळें पुढें याविषयीं लिहून लेखणीला श्रम देण्याची-ही शरम वाटते. खोटींनाटीं प्रमाणें ग्रुसडून दिल्यानें स्वपक्ष प्रबळ करून दाखवितां येत नाहीं. असत्यप्रलापानें अपकीर्ति मात्र होते; इकडे आमच्या मित्रानें लक्ष द्यावें असें मी सूचवितों.

संस्कृतग्रंथभांडारांतील जेव्हां पुरावा संपला, तेव्हां ग्रांटडफ साहेबांच्या बखरीवर हवाला ठेविला. ही बखर तरी खरी आहे कां? ती खरी असती तर त्यांनीं इतिहास लिहिल्या नंतर मिळालेलीं साधनें कां जाळून टाकिलीं? तीं साधनें चिरस्थायी करण्यांत त्यांचें कांहीं नुकसान होतें कां? तुमच्याच बंधूनीं खोटीं साधनें त्यांच्याकडे पाठवून दिलीं व त्यांच्या कडून इतिहास लिहविला. यांत त्या बिचाऱ्याचा तरी काय दोष? तो जाणून बुजून परदेशस्थ व परधर्मी. यास्तव पूर्वापार त्याला काय माहिती ?

" पेशवे हे चित्तपावन जातीचे होते. या जातीची उत्पत्ति चौदा प्रेतापासून सांगितली आहे. या चौदा जीवंत झालेल्या प्रेतांपासून या जातीचीं प्रथम चौदा कुळें उत्पन्न झालीं आणि त्या कुळापासून साठ कुळें झालीं; तीं सांप्रत प्रसिद्ध आहेत. " हें ग्रांटडफ साहेबांचें ह्मणणें. हें कोणत्या प्रमाणावरून निर्माण झालें तें मात्र समजत नाहीं. बहुधा हें चवाठ्यावरील लोकांच्या मुखांतून भांगेच्या अथवा गांज्याच्या तारींत निघालेलें असावें. चित्तपावन ब्राह्मणांच्या उत्पत्ति विषयीं सह्याद्रिखंडांत विशेष सांगितलें आहे. आणि तें सत्यशोधकांस मान्यही

असावें, कारण त्यांनीं कित्येक ठिकाणीं याच ग्रंथावर हवाला ठेविला आहे. सह्याद्रिखंडाच्या उत्तरार्धांतील पहिल्या अध्यायांत ह्मटलें आहे.:—

एवं क्षेत्रं महादेवि भार्गवेण विनिर्मितम् ।
तन्मध्ये तु कृतो वासः पर्वते चातुरंगके ॥ ३० ॥
श्राद्धार्थं चैव यज्ञार्थं मंत्रिताः सर्व ब्राह्मणाः ।
नागता ऋषयः सर्वे क्रुद्धोभूद्भार्गवो मुनिः ॥ ३१ ॥
मया नूतनकर्त्रा वै क्षेत्रं नूतननिर्मितम् ।
नागता ब्राह्मणाः सर्वे कारणं किं प्रयोजनम् ? ॥ ३२
ब्राह्मणा नूतनाः कार्या एवं चित्तेऽप्यनुग्रहम् ।
सूर्योदये तु स्नानार्थं गतः सागरदर्शने ॥ ३३ ॥
चितास्थाने तु सहसा ह्यागतांश्च ददर्श सः ।
का जातिः कश्च धर्मश्च क्व स्थाने चैव वासनम् ॥ ३४ ॥
कथयध्वं च संस्थाप्यं कारणं तस्य विद्यते ।
कैवर्तका ऊचुः। ज्ञातिंपृच्छसि हे राम ज्ञातिःकैवर्तकीति च ॥३५॥
सिंधुतीरे कृतो वासो व्याधधर्मविशारदाः ।
तेषां षष्टि कुलं श्रुत्वा पवित्रमकरोत्तदा ॥३६॥
ब्राह्मण्यं च ततो दत्वा सर्वं विद्यासुलक्षणम् ।
चितास्थाने पवित्रत्वाच्चित्तपावनसंज्ञकाः ॥ ३७ ॥ *

---

* हे पार्वती, याप्रमाणें परशुरामानें नवीन क्षेत्र निर्माण केलें. त्या क्षेत्रांतील चातुरंग नावांच्या पर्वतावर परशुराम जाऊन राहिला. तेथें त्यानें श्राद्धयज्ञ-करण्याकरितां सर्व ठिकाणच्या ब्राम्हणांना आमंत्रणें केलीं; परंतु ते ऋषी आले नाहींत; त्यामुळें भार्गवरामास अतिशय राग आला. म्यां निर्माण केलेल्या या नूतन क्षेत्रांत ब्राह्मण कां आले नाहींत? ब्राम्हण कांहीं तरी दुसऱ्या नव्या कार्यांत गुंतले असतील असें त्यानें स्वतःचें समाधान करून घेतलें. सूर्योदय

( पुढें चालू. )

9

येवढ्यावरून काय सिद्ध होतें कीं, स्मशानभूमींत पारध करण्यांत कुशल असे कैवर्तकलोक आलेले पाहून परशुरामानें त्यांना पवित्र करून ब्राम्हण्य दिलें. आतां ब्राम्हण प्रेतांपासून निर्माण झाले कां? फक्त चितेच्या स्थानीं पवित्रत्वाला म्हणजे ब्राह्मण्यास प्राप्त झाले, तेवढ्यावरून जर आमचे इतिहासकार चौदा प्रेतांपासून उत्पन्न झाले असे ह्मणतील तर ती त्यांची मोठी चुकी आहे. चतुर्दश प्रेतें एकदम सजीव कशी हो झालीं? कदाचित् परशुरामाच्या अलौकिक प्रतापानें तीं जीवंत झालीं असतील असें घटकाभर मानिलें तर "चितास्थाने तु सहसा ह्यागतांश्च ददर्श सः" असें वाक्य कां आढळावें? चितेच्या ठिकाणीं ह्मणजे स्मशानांत आलेले पाहिले येवढ्यावरून प्रेतें सजीव झालीं असें सिद्ध होत नाहीं, बरें प्रेतें सजीव झालीं असें घटकाभर मानिलें तरी पण चौदा प्रेतें जाळिल्यावांचून तेथें कोणी ठेवून गेले होते कां? ज्या वेळीं प्रेतदहनक्रिया विशेष बलवत्तर देशांत होती, अशा प्रसंगीं स्मशानांत प्रेतें ठेवून कोणी जाईल कां? तात्पर्य लोकांनीं

---

होतांच समुद्रावर स्नान करण्याकरितां परशुराम गेला, तेथें स्मशानांत कोणी लोक आले आहेत असें त्यानें पाहिलें. तुमची जाति कोणती? धर्म कोणता? राहाता कोठें तें सर्व सांगा; कारण त्या गोष्टी ऐकण्याची मला जरूर आहे असें परशुरामानें त्या लोकांस विचारिलें. ह्या प्रश्नाचें उत्तर त्या आलेल्या लोकांनीं दिलें कीं "हे रामा, आमची जाति कोणती तें तूं विचारित आहेस ? आमची जाति कैवर्तकी. समुद्राच्या कांठीं आम्ही राहत असतां, पारध करण्यांत आह्मी मोठे कुशल आहों" परशुरामानें त्यांचीं साठकुळें ऐकून त्यांना तो पवित्र करिता झाला. त्यांना ब्राह्मण्य देऊन चतुर्दश विद्या व चांगलीं लक्षणें परशुरामानें दिलीं. चितेच्या स्थानीं या लोकांस पावन केलें ह्मणून त्यांना चित्तपावन ही संज्ञा प्राप्त झाली आहे.

जो हा अश्लीलप्रकार पुढें आणिला आहे तो निव्वळ खोटा आहे.

आतां दुसरा एक आक्षेप येथें सहज उत्पन्न होतो कीं कैवर्तक म्हणजे कोण? या प्रश्नाचा निर्णय दानचंद्रिका नांवाच्या ग्रंथांत केला आहे:—

रजकश्चर्मकारश्च नटो बुरुड एव च ।
कैवर्तको मेदभिल्लाः सप्तैते अन्त्यजाःस्मृताः ॥

कैवर्तक ही अंत्यजापैकीं एक जाति होती असें वरील प्रमाणावरून दिसतें. व्यास, पराशर, गर्ग, कौडिण्य, टंक इत्यादि ऋिषिवर्यांची उत्पत्ति पुस्तककर्त्यानें १४ व्या पृष्ठावर दिली आहे; त्याप्रमाणेंच या चित्तपावन लोकांचें समजावें. मात्र ते आपल्या स्वपराक्रमानें उदयास आले आणि चित्तपावन श्रीभार्गवरामाच्या वरप्रसादानें पवित्र होऊन ते परशुरामाच्या येथेंश्राद्धीं बसण्यास योग्य झाले. श्रीपरशुरामाच्या वरप्रसादाप्रमाणें त्यांनीं वागून पूर्वींचा हिंसाधर्म सोडून ते अहिंसक व वेद विशारद बनले. अशा गुणवान व परमपूज्य ब्राह्मणांस श्रेष्ठ मानणें आमचें कर्तव्य समजलें पाहिजे, असें असतां सत्यशोधक हा जागून बुजून प्रमाद कां वडवितात?

ज्याचें वर्तमानिक आचरण शुद्ध तो पवित्र; मग पूर्वी तो महा अत्यंज कां असेना. हल्लीं जो अश्लाद्य व दोषार्ह वर्तन करितो तो पूर्वी उच्चवर्णात जन्मलेला कां असेना तो अपवित्रच. जे ब्राह्मण परशुरामाच्या येथें श्राद्धीं जेवले त्यांना अपवित्र आहेत असें कसें ह्मणावें? परशुरामासारखा कडकडीत ब्रह्मतेज दाखविणारा एकही ब्राह्मण निर्माण झाला नाहीं. ज्यानें समुद्रास स्वस्थानभ्रष्ट करून कोंकण निर्माण केलें त्या महात्म्याचे गुणानुवाद गावे तितके थोडचे आहेत. असो.

" सह्याद्रिखंडांत आपली उत्पत्ति लिहिली आहे, त्याची लाज त्यास वाटून तो ग्रंथ जेथें आढळेल तेथून आणूनत्याचा नाश करून टाकित. एके प्रसंगीं वाई संस्थानच्या मोठ्याप्रतिष्ठित ब्राह्मणा,-च्या घरीं सह्याद्रिखंड आहे, असें समजल्यावरून बाजीरावानें त्यास बोलावून आणून त्याची फजिती केली. " हें एक अनुसंधान रा. गोवाळ्यांनीं दिलें आहे. सह्याद्रिखंडांत जी उत्पत्ति दिली आहे असें पुस्तककर्ते लिहितात, ती वर दिलीच आहे. तींत शरम वाटण्यासारखा प्रकार कोणता हें मात्र समजत नाहीं. सृष्टी-वर अगदीं प्रथम जे लोक उत्पन्न झाले ते सर्व पूर्वी अज्ञानाव-स्थेंत असणें हें स्वाभाविक आहे. पुढें त्यांतील कित्येक सुधारले व कांहीं तसेच राहिले. त्यांतीलच कैवर्तक हे होत. हे पण परशु-रामाच्या उपदेशावरून सुधारून " सर्वविद्यानुकूलाश्च भार्ग-वस्य प्रसादतः " या श्रेष्ठपदास प्राप्त झाले; त्यांना त्या उत्पत्ति पासून कधींही वाईट वाटणार नाहीं. कोंकणांस्थानीं सह्याद्रिखंडाचा नाश केल्याचें कोठेंच आढळत नाहीं; सह्याद्रिखंड हें स्कंदपुराणांत-र्गत आहे; स्कंदपुराणाचा जेव्हां नाश होईल तेव्हां सह्याद्रिखंड जाईल; परंतु आमच्या ब्राह्मणवर्गानीं तसें केल्याविषयीं इतिहास कोठेंही साक्षी देत नाहींत. बाजीराव पेशव्यावर मि० दांजीसाहेबां-नीं जो आरोप आणिला आहे तो केवळ खोटा होय. सत्यशोधक समजाच्या उपदेशका, ही गोष्ट कोठें लिहिली आहे? व तेथील त्या वाक्याच्या सत्यतेकरितां कांहीं दळदळीत प्रमाणें देशील अशी मी आशा ठेवतों. मात्र तीं निरपेक्षबुद्धि ठेवून लिहिलेलीं असलीं पाहिजेत.

चित्तपावन ब्राह्मण हरकारू वगैरे नोकऱ्या शिवाजीच्या कारकीर्दींत करीत असत. असें पुस्तककर्त्याचें ह्मणणें आहे. नोकरी कोणतिही केली ह्मणून जाती नीच असते अशांतला मुळींच प्रकार नाहीं. कालमानाप्रमाणें मनुष्यास वागावें लागतें.मुसलमान लोकांच्या त्या भयंकर लुटीनें विचारे ब्राह्मणवर्ग अतिशय घाबरून गेले होते. त्यांचें सर्व संगृहीत वित्त यवनांच्या जामदारखान्यांत जाऊन पडलें होतें. विचारे दरिद्रानें व्यास झाले, अशा भयंकर प्रसंगीं जी नोकरी मिळेल तिचा स्वीकार करणें हें त्यांना उचित होतें. मि० गोपाळ्यांनीं नोकरी संबंधाच्या हल्लींच्या निकृष्ट स्थितीचें थोडेसें अवलोकन करावें, ह्मणजे त्यांची खात्री होईल.

तिसरा आरोप लोकहितवादीचा. लोकहितवादीचें सर्वच ह्मणणें खोटें असेल असें माझ्यानें ह्मणवत नाहीं. चित्तपावन लोक पूर्वी कदाचित् अडाणी असतील, ह्मणून ते ब्राह्मण्य पाळण्यांत न्यूनता आणणारे होते असें ह्मणतां येत नाहीं. राजकीय कामांत मत देण्या इतकें त्यांच्या अंगीं त्यावेळीं सामर्थ्य नसेल. परंतु ते अविद्वान् होते असें मानून तत्संबंधाच्या ऐतिहासिक माहितींत खोटी भर घालणें केवळ अयोग्य. कै० विष्णु शास्त्री चिपळूणकर यांनीं लोकहितवादीच्या ह्मणण्यास काय उत्तर दिलें आहे, त्यांच्या त्या व्याजोक्ति लेखावर कशी खमंग टीका केली आहे ती मि० गोपाळ्यांनीं पहावी असें माझें मत आहे.

कोंकणस्थ ब्राह्मणांची नीचोत्पत्ति आहे ह्मणून त्यांना शरम वाटली व त्यांनीं बृहत्पाराशर स्मृतींत तीन श्लोक नवे घालून ती छापविली. अशा आशयाचें दाजी साहेबांचें ह्मणणें आहे

बृहत्पाराशर स्मृतींत चित्तपावनांच्या विरुद्ध श्लोक कोठें आहेत ते महेरबानीनें दाखवावें. मी बृहत्पाराशर स्मृति बंगाल्यांत छापिलेली समग्र वाचून पाहिली. त्यांत चित्तपावनांच्या विरुद्ध एकही श्लोक आढळला नाहीं. क्षेपकें घालण्याला अथवा विरुद्ध असलेले श्लोक काढून टाकण्यास आमचे ब्राह्मण कलकत्यांत नाहींना गेले? सत्यशोधका, कांहीं तरी विचार करावयाचा होतास? फुकटची शाई आणि कागद मिळाले ह्मणून पाहिजे तसें लिहूं नये.

"…..पूर्वी तर त्यांच्याच पूर्वजांनीं ग्रंथ लिहिले आहेत त्यांत खोट्या गोष्टी, खोटे चमत्कार, खोटे दृष्टांत, खोटें वर्णन, खोटी शक्ति, खोटी भक्ति, खोटा मोठेपणा किती घुसडला असेल याचें अनुमान ग्रंथ वाचिले ह्मणजे स्पष्ट करतां येते" ( पहा पृष्ठ १२ ) जें कांहीं खोटें केलें तें ब्राह्मणांनीं असें सत्यशोधकांचें ठाम मत ठरलें आहे. सत्यशोधक हे जर खरोखर सत्यशोधक असतील तर त्यांनीं एकदा निरपेक्ष बुद्धीनें संस्कृत ग्रंथ वाचावेच. आणि मग कागद लेखणी घेऊन लिहिण्यास बसावें. तत्पूर्वी काढलेले उगाद्र निव्वळ अयोग्य व अज्ञानभरित आहेत. सत्यशोधकांच्या डोळ्यावर झांपड येऊन सर्वत्र असत्य आहे असा त्यांना भास नाहींना होत? खोटे दृष्टांत, खोटीं वर्णनें, खोटी भक्ति, खोटी शक्ति इत्यादि गोष्टींचा अर्थ काय? खोटा दृष्टांत व खरा दृष्टांत कसे ओळखावेत, याविषयीं ग्रंथकर्त्यांजवळ कांहीं माहिती असल्यास ती पुढें आणावी. खोटें वर्णन आणि खरें वर्णन कोणतें तें पण मला समजत नाहीं. सत्यशोधकांनीं अलंकार शास्त्राचा थोडासा अभ्यास केला असतां तर असे भलतेच उद्गार त्यांच्या त्या पवित्र लेखणींतून कधींच बाहेर न येते.

" यतिचा ब्राह्मण वाहे अभिमान " हा अभंग पुस्तककर्त्यांनीं दिला आहे. अभंग कांहीं खोटा नव्हे. ज्ञानकांडांतील वेदान्त विषयावर हा अभंग होय. मानवीक व्यवहाराचे कर्मकाण्ड, उपासनाकांड व ज्ञानकाण्ड असे तीनभाग मीमांसकांनीं पाडिले आहेत. कुमारिलभट्ट अथवा भट्टपाद, मंडनमिश्र इत्यादि मंडळी कर्मकाण्डाचे आणि शंकराचार्य व त्यांचे हस्तमलकादि शिष्य हे ज्ञानकांडाचे वादी होते. शंकराचार्य जरी ज्ञानकांडाचे अभिमानी होते; तथापि त्यानीं कर्मकांडानें वागावें असें स्पष्ट ह्मटलें आहे. ज्ञानीमताचा संस्थापक जो विष्णुशर्मा त्याच्या मताचें खंडन करिते वेळीं आचार्य ह्मणाले.—

" अरहः संध्यामुपासीत। सर्वैराश्रमिभिर्वेदोक्तकर्म कर्तव्यम्" इत्यादि वाक्यांवरून ते कर्मकांडाचे द्वेषी होते असें म्हणतां येत नाहीं. मंडनमिश्र जो सन्यासधर्म खोटा मानीत असे तेवढ्याच्या विरुद्ध आचार्य होते. बाकीचीं सर्व मतें श्रीमच्छंकराचार्यांच्या मताशीं मिळतीं होतीं.

कर्म, उपासना व ज्ञानकांड हीं अगदीं भिन्न आहेत. कर्मकांडाच्या सिध्यर्थ एखादें ज्ञानकांडांतील प्रमाण घेतलें तर तें अप्रशस्त व मीमांसा करण्यांत त्या कारणानें व्यत्यय येतो. वेदान्त हा विषय अगदीं शेवटच्या अवस्थेचा द्योतक आहे. ब्रह्मचर्य व गृहस्थ हे दोन आश्रम कर्म व उपासना कांडांतील आणि वानप्रस्थ आणि सन्यास हे दोन ज्ञानकांडांतील होत. सांप्रत आपण सर्व गृहस्थाश्रमी आहों, तेव्हां कर्मकांडांतील वचनें प्रमाण मानिलीं पाहिजेत; आणि वृध्दापकाळीं ज्ञानकांडांतील वचनांप्रमाणें चालणें विशेष प्रशस्त आहे.

यावरून वेदान्तवचनांस ब्रह्मचर्य व गृहस्थ या दोन अवस्थेंत प्रमाण मानू नये असें माझें मुळींच ह्मणणें नाहीं. वचनें खुशाल श्रेष्ठ मानावींत; परंतु त्याप्रमाणें वागतां येणें व्यावहारिक मनुष्यास विशेष कठीण आहे. लोक लज्जा, हव्यकव्य इत्यादिकारणांनीं जातिबंधन तोडून वेदान्तांत निमग्न होतां येणें विशेष कठीण आहे. अशी कल्पना करा कीं तुकाराम बुवांच्या ह्मणण्याप्रमाणें वागण्यास कितीसे तयार होतील? तुम्ही तरी व्हाल कां? वेदान्तविषयांत प्रवीण म्हणजे ब्रम्हतेजास प्राप्त होणें; हें तेज इतकें श्रेष्ठ आहे कीं, तत्संबंधाचें विवरण केल्यास एक मोठा ग्रंथ होईल.

जेथें ब्रम्ह म्हणजे " वेद " हे आहेत तो ब्राम्हण असा कर्मकांडाचा सिद्धांत आहे. जे वेद शिकणारे, जे पवित्राचरणानें वागणारे, त्रिकाळसंध्या करणारे, सच्छिलानें वागणारे अशांच्या उदरीं जन्मून ज्यांनीं पूर्वोक्त अग्निहोत्रादि कर्मे व पठनपाठन हे नियम पाळिले आहेत आणि जे—

यजनं याजनं चैव स्वाध्यायाध्यापनं तथा ।
दानं प्रतिग्रहश्चैव षट्कर्माणि दिने दिने ॥

या षट्कर्मांचे अधिकारी तेच ब्राह्मण होत. साधारणतः अशा प्रकारचा ब्राह्मण पवित्रत्वांत मोडतो. ज्या लोकांनीं ब्रह्म ह्मणजे वेदांचें अध्ययन केलें आहे अथवा करण्याचा ज्यांना अधिकार ते ब्राह्मणत्वांत गणले जातात, इतकेंही असून जो ब्राह्मण वेदान्तांत प्रवीण तो विशेषपूज्य मानावा असें व्यासांचें मत आहे.

ब्राह्मणः स भवेच्चैव देवानामपि दैवतम् ।
प्रत्यक्षञ्चैव लोकस्य ब्रह्मतेजो हि कारणम् ॥
व्यास सं. अ० ४

साधारण ब्राह्मण जर विशेष पूज्य तर वेदान्तप्रवीण अथवा जीवात्म्यांचीं लक्षणें जाणणारा तो विशेष पूज्य मानिला पाहिजे यांत संशय नको. एखादा अंत्यज जर वेदांतप्रवीण भेटेल तर त्याला आह्मी पवित्र मानूं आणि ह्याच सिद्धांतामुळें तुकाराम साधु जरी शूद्र होते तरी त्यांना आमचे ब्रह्मवृंद श्रेष्ठ मानीत आहेत. असे वेदांती म्हणजे परमहंस कि ज्यांना जीवात्म्यांचीं सर्व लक्षणें माहिती आहेत, असे सत्पुरुष या भारतजननीच्या उदरीं केव्हां निपजतील कोण जाणें!

आत्म्याच्या ठिकाणीं कांहीं भेदाभेद नाहीं. अशा अर्थाचा जो साधुराज तुकाराम बुवा यांचा अभंग दिला आहे, तोही योग्य होय. ज्ञानकांडांतील हे अभंग प्रमुख होत. मनुष्यास वेदान्त केव्हां समजतो, तर त्याचा स्वाभिमान व शरीर हें कांहीं नाहीं असें तो जेव्हां मानील तेव्हां. कर्मकांडांत मनुष्य गढून गेला असतां, त्याला ज्ञानकांड काय समजणार? वेदान्ता सारखा पवित्र विषय नाहीं. वेदान्तांत भिन्न भिन्न जाती न मानणें हेंच मूळ तत्व आहे. कारण जेथें अपपर नाहीं तोच वेदांती. षड्रिपूंचा ज्यांनीं त्याग केला आहे, ज्यांच्या शरीरांत कोणतेही मानसिक विकार राहिले नाहींत अशा लोकांच्या अभ्युत्कर्षाकरितांच संतराज तुकाराम बुवा यांचा हा अभंग आहे. घरांत राहून मुलें खेळविण्याकरितां, नोकरी करण्यासाठीं व यथेच्छ बकरी मारून खाण्यासाठीं हा अभंग नव्हे. गृहस्थाश्रमांत या अभंगापासून कांहीं फायदा होणार नाहीं. गोपाळ्यांनीं या अभंगाची योग्यता मनांत आणिली नाहीं असें वाटतें. पुस्तककर्त्याचें असें मत दिसतें कीं, हल्लीं ज्या जाती आहेत त्या सर्व मोडून एक जाति करावी. आणि त्यास प्रमाणें कोणतीं? तर तुका-

रामबुवांचे वेदान्तपर अभंग. सत्यशोधका, कर्मकांड आणि ज्ञानकां-ड म्हणजे काय? हें तुला कसें समजलें नाहीं! अरे, तूं जें विविध जातींच्या ध्वंसनार्थ महासाधूंचें वचन दिलेंस त्याप्रमाणें तूं एखा-द्या अंत्यजाच्या मुलीशीं लग्न करून मृतगोमांसाची मेजवानी झोडशील कां? बाबा, हा वेदान्त फुकटचा नव्हे. त्यांचे खरें ज्ञानी-त काय आहे, तें मोठ मोठ्या महात्म्यांनाही समजलें नव्हतें; [illegible] तुझी ती काय कथा ?

"ब्राम्हणांच्या पोटीं मूर्ख जन्मला तरी तो ब्राम्हणच म्हणवू लागला." असे उद्गार गोपाळ्यांनीं काढिले आहेत. तुम-च्या उदरीं एखादा षंढ जन्मला तर त्याला तुम्हीं काय म्हाणाल? पशूच्या पोटीं एखादा सतेजबालक जन्मल्यास त्याला काय म्हणतील? सशाच्या पोटीं एखादा व्याघ्रतुल्यप्राणी जन्मला तरी त्याला काय म्हणतील? या प्रश्नांचा निर्णय केला आहे कां? ते जरी मूर्ख असतील तरी तें ब्रम्हबीज आहे इकडे लक्ष द्या. आतां तो स्वाचरणानें बहि-ष्कृत झाला तेवढ्यावरून त्याला ब्रम्हवर्गांत मोठा मान देतां येणा-र नाहीं. तशीच वरील सर्व गोष्टींची स्थिति आहे.

ग्रंथकारांनीं **ज्ञानसागर** नांवाच्या ग्रंथांतील खालील श्लोक दिला आहे:—

" न चर्मणो न रक्तस्य न मांसस्य न चास्थिनः ।
प्राणस्यनात्मनो जातिर्व्यवहारे विकल्पिता ॥ "

हा श्लोक कांहीं खोटा नव्हे. आत्म्याला जाती नाहीं हें मी कबूल करितों. परंतु जाती नाहीं असें केव्हां मानावयाचें ? जेव्हां वेदान्ताचें पूर्ण ज्ञान होईल तेव्हां. दाजीबास वेदान्त व ज्ञानकांड ह्मणजे काय ? या प्रश्नाचें उत्तर माहीत असेल

कां ? हा श्लोक कर्मविषयक नव्हे, ज्ञानविषयक आहे, आणि जाती ह्या गुणकर्माच्या विभागानें पाडिल्या आहेत. भगवद्गीतेंत " चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः" हें जें वचन आहे तें काय सूचवितें?

तात्पर्य—सर्व लोक ज्यावेळीं पूर्ण वेदान्ती बनतील त्याच वेळीं भेदाभेद राहणार नाहीं. नुसतें वायफळ वहकल्यानें अथवा अहंकारादि गोष्टींचें भांडार हृदयांत वागविल्यानें किंवा " अजापुत्रं बलिं दद्यात् " असें वर्तन करून आत्म्यास जाति नाहीं ह्मणून ह्मणणें हा केवळ वेडेपणा आहे.

त्याच श्लोकाखालीं ओवीबद्ध टीका दिली आहे. ही कोणी केली तें मात्र समजत नाहीं. वरील श्लोकांत ब्राम्हण ह्या अर्थाचें कोणतेंही पद नसतां तें टीकेंत कां आलें? असो. ही टीका ज्ञानकाडांविषयीं द्योतक आहे; हें सत्यशोधकांच्या दृष्टीस कसें पडलें नाहीं ? कर्मकांड व ज्ञानकांड यांतील भेदाभेद या अज्ञान लोकांस जोंपर्यंत समजणार नाहीं, तोंपावेतों त्यांच्या मस्तकांत हें जातिवैपरीत्य असेंच भिनून राहणार यांत संशय नाहीं. सत्यशोधकांना मी अशी एक शिफारस करितों कीं, त्यांनीं एखाद्या चांगल्या गुरूचे पाय धरावेत आणि या दोन गोष्टींचा उपदेश घ्यावा; म्हणजे त्यांना कांहीं समजलें तर समजेल. ज्ञान नसतां, उगेंच आम्ही विद्वान्, आम्हाला सर्व गोष्टी माहीत आहेत असा अभिमान बाळगून त्या परावलंबित मिशांना पीळ देणें केवळ अयोग्य आहे.

सत्यशोधका, हीं प्रमाणें देते वेळीं थोडा तरी विचार केला होतास कां ? अरे, जर तूं ज्ञानवान् म्हणवीत असशील तर

वरील वचन तुझ्या या गार्हस्थिक अवस्थेंत तूं पूज्य मानितो-स कां ? जोंपर्यंत तुझें वर्तन तसें होणार नाहीं, तोंपावेतों तुझ्या बहकण्यावर कोणताही सत्पुरुष विश्वास ठेवणार नाहीं. हें तूं रात्रंदिवस लक्षांत बाळग. तूं सिद्ध करितोस कर्मकांड आणि पुष्टीकरणार्थ प्रमाणें देतोस ज्ञानकांडाचीं; तेव्हां तुझी ती सिद्धता कशी होईल ? अरे, तुझें तें करणें वडाची साल पिंपळास ला-विल्याप्रमाणें होतें इकडे लक्ष दे.

" हल्लींच्या ब्राह्मणांच्या हातून धर्मविधि करून घेतल्या-स ते निष्फळ होतात. " हें वाक्य कोणत्या आधारानें बाहेर पडलें ? या स्वकपोलकल्पित वचनाच्या पुष्टीकरणार्थ जीं प्रमाणें दिलीं आहेत तीं केवळ असमंजसपणाचीं द्योतक होत. सत्यशो-धका, असा खोडसाळपणा करण्याचें कारण तें काय ? तुझ्या त्या असत्यप्रलापयुक्त लेखणीचा दुसरे शास्त्रीयविषय लिहिण्या-कडे व्यय कां केला नाहींस? अरे, अशा अज्ञानकल्पनेनें तुज-वर लोकांचा अविश्वास मात्र उत्पन्न होईल. असो.

आतां "ब्राह्मणाची उत्पत्ति " या जाड्या विषयास येथून सुरुवात झाली. पृष्ठ १४ वें असून त्यांत सतरा ऋषींची उत्पत्ति दिली आहे. ती खोटी आहे असें माझें म्हणणें नाहीं; परंतु मनुष्य वाईट कुळांत जन्मला म्हणून तो अपवित्र असें मानितां येत नाहीं. जो नीच कुळांत उत्पन्न होऊन स्वतःच्या सामर्थ्यानें पवित्र व श्रेष्ठ स्थिति संपादन करील तोच सज्जन. तोच ऋषि, पर-मेश्वर, सर्वज्ञ सर्व कांहीं तोच असें आमच्या मूळ नीतीचें तत्व आहे. मात्र त्याचें आचरण शुद्ध, सत्यवादी, जितेंद्रिय इत्यादि प्रकारचा तो असला पाहिजे. मग त्याचा जन्म तुमच्या मंडळींतील

कां असेना तो आम्हांस पूज्य आहे. त्याचप्रमाणें पराशर, व्यास, कविलर, सांख्य, टंक, कौंडिण्य, गर्ग, गौतम, मांडव्य, आगस्ति, कौशिक, वसिष्ठ, वाल्मिकी इत्यादि ऋषि मंडळांचा जन्म जरी नीच योनींत असला तरी हरकत नाहीं. ते केवळ स्वसामर्थ्यानें उंचवर्णांत शिरून ब्रह्मर्षि ह्मणजे ब्रह्मवृंदांत अग्रगण्य बनले; त्यांच्या सारखे पवित्र पुरुष आमच्या ह्या भरतखंडांत निपजत गेल्यास हल्लींच्या शूद्रांनीं हें मातविलेलें ढोंग कितीसें टिकेल? पराशरादि ऋषिवर्य जसे स्वपराक्रमानें ब्राम्हण्यांत आले, तसें तुह्मी तपश्चर्या, अहिंसा इत्यादि सात्विकधर्माचें पालन करून श्रेष्ठपदास कां प्राप्त होत नाहीं? सत्यशोधका, तुझ्या याच पुराव्यावरून तूं जी ब्राह्मणवर्णाबद्दल वल्गना केलीस ती निव्वळ खोटी ठरते; कारण भिन्न जातीपासून ऋषिवर्ग उत्पन्न होऊन ते ब्राह्मण्यांत आले; असें तूंच जर म्हणतोस तर तूं व तुझे अनुयायी हे अंगणांत राहून ब्राह्मण पलंगावर मौजा मारितात असें जें तूं म्हटलें आहेस तें खोटें नाहीं कां ठरत? दुसरें तुझ्या याच पुराव्यावरून ब्राह्मणेतर वर्ण आचरणेंकरून संपन्न झाल्यानें ते उत्तम वर्णस्थितींत पोहोंचले हें तुझा तूंच कबूल करितोसना? तुझ्या ह्या लिहिण्यावरून ब्राह्मणाविषयीं केलेली ओरड असत्य आहे असें नाहीं कां ठरत? असो. ब्राह्मणाशीं भांडून मोठेपणा मिळत नाहीं हें पक्कें लक्षांत ठेव. पराशर जसें श्रेष्ठत्वाला पावले तसे व्यास हेही. ज्या व्यासांना ब्रह्मवृंदांतील मोठ मोठे विद्वान् कीं ज्यांनीं आपलें सर्व आयुष्य अध्ययनांत खर्च केलें; असे विपाश्चिज्जन सुद्धां श्रेष्ठ मानितात मग तुझी व माझी ती कथा काय!

वाल्मिकीऋषींनीं प्राणिहत्या केली होती अशा आशयाचे पुस्तककर्त्यानें उद्‌गार काढिले आहेत. वाल्मिकीस ज्या वेळीं नारदानें खऱ्या तत्वांचा बोध केला, तेव्हांपासून त्याची वृत्ति कोणत्या प्रकारची होती ? ही गोष्ट सत्यशोधकानें लक्षांत आणिली असती तर त्याचे हे अपूर्ते विचार बाहेरच न पडते. तुम्ही व्यास, वाल्मिकी इत्यादि महात्म्याप्रमाणें वर्तनक्रम ठेवा, आणि या ब्रह्मवृंदांत; तुम्हांस त्या ऋषिवर्यांसारखा मान मिळतो किं नाहीं तें पहा: सत्यशोधका, वरील सर्व ऋषि ब्राह्मण्यांत आले त्याचें कारण सात्विकीवृत्ति; तामसीवृत्ति नव्हे. सात्विकीस अनुसरून जे चालतात, त्यांस नेहमीं श्रेष्ठ फळें मिळतात. असो. तुम्ही जें म्हणतां कीं, ब्राह्मणांनीं पूर्वींपासून आमची पायमल्ली चालविली आहे; तर मग पराशरादिऋषींस ब्राह्मण्यांत कसें येतां आलें ? जो तो आपल्या स्वतःच्या वर्तनानें श्रेष्ठ फळें मिळवितो ही गोष्ट तुम्ही विसरू नका.

जॉन उइल्सनचा पुरावा रुजू करून देशस्थ ब्राह्मणांची उत्पत्ति शुद्रस्त्रियांपासून झाली असें त्यानें लिहिलें आहे. सत्यशोधका, तूं चांगलें शोधून काढिलेंस ? हे तर तुझे भाऊबंदच ठरतात; मग त्यांच्यांत आणि तुझ्यांत जातिभेद रे कसा झाला ? तूं त्यांना ब्राह्मण्यांत कसें जाऊं दिलेंस ? तुझे वडील पण ब्राह्मण कां झाले नाहींत ? सत्यशोधका, तुझ्या याच शोधावरून ही गोष्ट तुला संमत असली पाहिजे कीं, देशस्थ ब्राह्मण उत्पन्न होण्यापूर्वीं शूद्र व अंत्यज यांच्या जाती होत्या. असो. मी असें म्हणतों कीं, ते जरी पूर्वीं अंत्यज असले तथापि हल्लीं त्यांच्या जातींतील एका मनुष्याच्या तरी अंगीं तसेल दुर्गुण

आढळतात कां ? तसे नीच गुण जोंपर्यंत आढळणार नाहींत तों-पर्यंत ते आम्हांस पूज्यच आहेत. कांहीं तरी ढोंग दाखवून कुचेष्टा करणें हा सुज्ञांचा धर्म नव्हे. ही गोष्ट सत्यशोधकांनीं, आपल्या हृदयपटावर कोरून ठेवावी; असें माझें मत आहे.

तसेंच कऱ्हाडे ब्राह्मणासंबंधानें सत्यशोधकानें लिहिलें आहे. ते पूर्वी जरी नीचकुलांत उत्पन्न झालेले असले, तथापि हल्लीं ते तुमच्याप्रमाणें आचारभ्रष्ट होऊन हाडें फोडायला ना-हींना लागले ? मग पूर्वीची उखाळीपाखाळीं काढण्यांत काय अर्थ? मी असें म्हणतों कीं, हल्लीं जे मराठे आहेत ते पूर्वी अंत्यज होते. या गोष्टीला प्रतिबंधक असें एखादें प्रमाण आढळेल कां ? मुळींच आढळणार नाहीं. आणि म्हणूनच सज्जन लोकांनीं एक म्हण करून ठेविली आहे कीं, " ऋषींचें कुळ आणि नदीचें मूळ शोधूं नये. " तें कांहीं खोटें नव्हे. नदीचें मूळ शोधतां शोधतां ती एखाद्या खेडेगांवांतील लेंडोळीपासून ( गलिच्छ पाण्यापासून ) उत्पन्न झाली आहे असें आढळेल. आतां नदीचें पाणी प्यावें कां ? कारण तिजमध्यें सर्व ठि-काणच्या मलमूत्राचा संचय झालेला आहे. तसेंच नवसागराचें. नव-सागर कल्हई लावते वेळीं उपयोगांत आणणें म्हणजे भोजनपात्रांत विष्ठा भरणें हें होय. असें असतां तें नदीचें दोषयुक्त जल व नवसागर मुकाट्यानें उपयोगांत आणावा लागतो, तीच गोष्ट ऋषि कुळांची-अथवा ब्राह्मणांची. नदीच्या पाण्याला हवेच्या संसर्गानें जशी पवि-त्रता येते, तशी नीच लोकांस सज्जन संगतीनें व त्यांच्या सात्वि-की आचरणानें पवित्रता येते. नुसती निंदा केल्यानें येत नाहीं.

नदीचें मूळ कितीही अपवित्र असलें तरी आपण त्याचा जसा विधिनिषेध मानीत नाहीं तीच गोष्ट ऋषिकुलाची. कारण " संसर्गजा दोषगुणा भवन्ति " हें महाजनांचें वाक्य आपणांस विशेष श्रेष्ठ मानिलें पाहिजे. कारण सर्व धर्म सहवासावर अवलंबून आहेत.

मोहजालस्य योनिर्हि मूढैरेव समागमः ।
अहन्यहनि धर्मस्य योनिः साधुसमागमः ॥
तस्मात्प्राज्ञैश्च वृद्धैश्च सुस्वभावैस्तपास्विभिः ।
सद्भिश्च सह संसर्गः कार्यः शमपरायणैः ॥

महाभारत वनपर्व अ. १

तात्पर्य या मानवी अवस्थेंत सहवास व मनाचा मोठपणा हा श्रेष्ठावस्था देण्यास कारण होतो. दुसऱ्याची निंदा अथवा उपहास करून किंवा उंच वर्णावर कुऱ्यासारखें तोंड टाकून सत्फलें कधींही मिळणार नाहींत.

" चितपावन ब्राह्मणांस कोंकणस्थ ब्राह्मणही म्हणतात. या ब्राह्मणांच्या उत्पत्तिविषयीं सह्याद्रिखंडाच्या ८१ व्या अध्यायीं अशी कथा आहे कीं, परशुरामानें असा शाप दिला कीं, तुम्ही अविश्वसनीय व कृत्रिमी आहां म्हणून तुम्ही दरिद्री, सर्वांची सेवा करणारे, व नीच कर्म आचरणारे असे शेवटीं व्हाल आणि तुमच्या हस्तेंकरून कोणीं श्राद्धादिकर्में करविलीं असतां तीं पावन होणार नाहींत. आणि प्रहर दिवस येई तोंपर्यंत तुमचें तोंड कोणीं पाहूं नये. असें म्हणून परशुराम त्या ठिकाणीं गुप्त झाला. "( पहा पृष्ठ १५ ) सत्यशोधकसमाजाच्या प्रसिद्ध उपदेशकांनीं सह्याद्रिखंडाच्या ८१ व्या अध्यायावर हवाला ठेवि-

ला आहे. सह्याद्रिखंडाचे पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन भाग आहेत, हें मागें सांगिलेंच आहे. पूर्वार्धांचे ६७ व उत्तरार्धांचे २१ या प्रमाणें अध्याय आहेत. आतां ८१ वा अध्याय कोणता ? उत्तरार्धाचा १४ वा तर नव्हेना ? चवदावा अध्याय तर पातित्यग्रामनिर्णय याविषयीं आहे. त्यांत तर चित्तपावनांचें नांव सुद्धां नाहीं; मग सत्यशोधकांस तें कोठून दिसलें कोण जाणें !

सह्याद्रिखंडाच्या उत्तरार्धांतील पहिल्या अध्यायांत सत्यशोधक म्हणतात तशी जरी नाहीं तरी तशाच अर्थाचीं कांहीं वचनें आहेतः—

आगतस्तत्क्षणादेव पूर्वोक्तस्य च कारणात् ।
तत्रैव दृश्यते कृत्यं कोपितः स जगद्गुरुः ॥ ४३ ॥
शापितास्तेन ये विप्रा निंद्याश्चैव कुत्सिकाः ।
शापं च प्राप्यते तस्य कुत्सिताश्च दरिद्रिणः ॥ ४४ ॥
सेवां सर्वत्र कर्तार इदं निश्चयभाषणम् ।
इतिहासकथा देवि तवाग्रे कथिता मया ॥ ४५ ॥
चित्पावनस्य चोत्पत्तिरिदं चैव तु कारणम् ।
सह्याद्रेश्च तले ग्रामश्चित्तपोलननामतः *॥ ४६ ॥
तत्रैव स्थापिता विप्रा यावचंद्रदिवाकरौ ।

येवढ्यावरून प्रहर दिवसपर्यंत ब्राह्मणांचें तोंड पाहूं नये, त्यांना श्राद्धीं भोजनास बसवूं नये इत्यादि गोष्टी सिद्ध होतात कां ? तुम्ही दरिद्री, कुत्सित व सेवा करणारे असे व्हाल, येवढ्या शापावरून सत्यशोधकांनीं नऊ हात लांब अशी बात ठोकून

*चित्तपोलन— चिपळूण. आतां चिपळूण अगोदर कि तें हरणई मुरुड अगोदरचें! चातुरंग व चिपळूण येथें प्रथम वस्ती झाली हें निर्विवाद आहे.

दिली. सत्यशोधका, हाच कां तुझा सत्यशोध? असाच जर तुझा शोध असेल तर उद्यां तूं अंत्यजवर्गास ते ब्राह्मण होते, असें कशावरून ह्मणणार नाहींस? तुझ्या सारखा दुसरा एखादा सत्यशोधक निपजला तर बहुधा आर्यावर्ताचें खरें नांव राहणें नको. कारण तुझे शोध "मनःपुतं समाचरेत्" असेच आहेत.

सत्यशोधका, तूं अशीं अनन्वित कर्मे करूं नकोस. अरे, खरें काय आहे याचा तर विचार कर. मनास वाटेल तें बहकत सुटतोस याला काय ह्मणावें? ग्रंथ नीट वाचून तर पहा; तुला न समजल्यास एखाद्या शास्त्र्याचे पाय धर; पण खोटें लिहू नको. या तुझ्या खोडसाळपणाच्या लिहिण्यानें आर्य लोकांत दुहि मातण्या च संभव आहे. सारांश तूं कुत्सितस्वभाव सोडून देशील तर बरें होईल.

येथून "जाहीर सूचना" या सदरास सुरुवात झाली. ह्या वेळपर्यंत जे विषयप्रातिपादन झालें तें जगजाहीर नव्हतें; यासूचनेपासून मात्र जाहीर झालें. ह्या पुस्तकाचा हेतु गुप्त ठेवावा आणि ही जाहीरसूचना मात्र प्रकाशित करावी असा तर पुस्तककर्त्यांचा हेतु नसेलना? परंतु नाहीं; सर्व पुस्तक ज्या अर्थी प्रकाशित झालें आहे, त्याअर्थी त्यांतील हेतु गुप्त ठेवावे असा बोध होत नाहीं. पुस्तकें मराठे लोकांस वाटलीं आहेत; तेव्हां पृष्ठ १५ पर्यंत जें सूचाविलें तें प्रत्येक मराठ्यानें मनांत ठेवावें आणि ही जाहीर सूचना मात्र जितकी प्रसिद्ध होईल, तितकी करावी असा जर सत्यशोधकांचा उद्देश असेल तर तो पार पडला नाहीं. त्यांच्या मराठ्याबंधूंनीं ती सूचना येथें कोठें तरी प्रसिद्ध केल्याचें निदान आमच्या लोकांच्या तरी कानावर घातल्याचें आढळून आलें नाहीं; ही मनांत ठेविण्याकरितां जर काढिली असेल तर तशा अर्थाचें

कांहीं तरी नांव दिलें असतें तर तें शोभतें. ग्रंथकर्त्यास ही "जाहीर सूचना" च करावयाची होती तर एखाद्या मोठ्या पत्रांत ती कां छापविली नाहीं? तसें केलें असतें तर ती ब्राह्मण, शेणवई इत्यादि लोकांच्या वाचण्यांत आली असती! "ब्राह्मणांच्या कृत्रिम ब्राह्मण्याविषयीं जे जागोजाग ह्मटलें आहे त्याबद्दल आमच्या देशबांधवांस हे नामधारी ब्राह्मण उलटसुलट भासवून घोटाळ्यांत घालतील." हें जाहीरसूचनेचें पहिलें कारण. "आमच्या देशबांधवांस" ह्मणजे कोणास? "देशबांधव" यांत ब्राह्मणांचा समावेश होतो किं नाहीं? ब्राह्मण परदेशांतून आले तेव्हां त्यांचा समावेश होणार नाहीं; असें पुस्तककर्त्याचें मत दिसतें. परंतु मराठे लोक जर बाहेरून आले असें सिद्ध झालें तर मग ही जाहीरसूचना कोणास? त्यांच्या म्लेंच्छबंधूस हें उघड आहे. पूर्वेकडून जे लोक उत्तर हिंदुस्थानांत आले, ते राज्यकर्ते होते. त्यांनीं आपला सर्व छापा आर्यप्रजेवर बसवून आपण या देशांतील राजे बनले व बिचाऱ्या ब्राह्मणांच्या कांखेंत झोळी दिली. अशी जर खरी गोष्ट आहे तर मग घोटाळ्यांत घालणारे कोण? बिचाऱ्यांच्या हातून राज्यसूत्रें हिरावून घेतलीं व "आह्मी तुह्मांस मोठा मान देऊं, तुह्मी भूदेव आहां, तुमची आह्मी पूजा करूं" अशा प्रकारानें पूर्वींच्या ब्राह्मणांचें समाधान करून त्यांना दरिद्री बनविले आणि सांगितलें काय कीं, "तुह्मी विद्या शिका ह्मणजे तुमची आह्मी संभावना करूं" हा वर दिला. झालें, ब्राह्मणांना या कपटी लोकांनीं केवळ ताटाखालील मांजरें बनविली ! मराठे लोकांनीं केवढ्या गोड गोड थापा दिल्या आणि शेवटीं ब्राह्मणांस निःशस्त्री बनविलें. असें जर इतिहासावरून सिद्ध होतें; तर मग पाटीलबुवांचें ह्मणणें कोंबड्या हांकण्याच्याच योग्यतेचें ठरलें ना?

ब्राह्मण नामधारी ह्मणजे काय? त्यांना ब्राह्मण हें नांव आहे किंवा कसें? ब्राह्मण स्वधर्मानें वागत नाहींत तेव्हां ते नामधारी झाले किं काय? आतां ते स्वधर्माप्रमाणें चालतात किंवा नाहीं हें तुह्माला कशावरून समजलें? ज्यांना धर्माचें खरें रहस्य कोणतें? हें ठाऊक नाहीं त्यांना ह्मणे धर्म समजतो. "ज्या धर्मात एकट्या धर्मशास्त्रावर दहा हजार उत्तम ग्रंथ आहेत." असें जे मक्समूलर ह्मणतात त्याचा कांहीं विचार केला आहे कां? हे दहा हजार ग्रंथ वाचण्यास किती तरी दिवस पाहिजेत. या पैकीं एक तरी गोपाळ्यांनीं वाचला आहे कां? असो, ब्राह्मणांना कांहीं जरी ज्ञान नसलें, तरी हरकत नाहीं; आपणांस तर ते पवित्रच आहेत. ते वाईट आहेत ह्मणून आपणास चालतां येणार नाहीं. ज्यांच्या कर्माचीं फळें तें भोगतील. ज्याला ज्ञान नाहीं त्यानें या गोष्टीची वाटाघाट करण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

नामधारी ब्राह्मण मराठ्यांना उलटसुलट भासवून घोटाळ्यांत घालतील, याबद्दल सत्यशोकांस भीति पडली आहे. ब्राह्मणांनीं आजपर्यंत मराठ्यांना घोटाळ्यांतच घातलें असेल. चंद्रगुप्तास राज्य मिळावें, एतदर्थ ज्या चाणाक्यानें अकटोविकट प्रयत्न केले, ज्यानें आपलें सर्व शरीर चंद्रगुप्ताच्या हितार्थ खर्चिलें, जो नेहमीं वेशधारी वनत असे, त्याच चाणाक्याच्या वंशास चंगुद्रप्ताच्या वंशानें हल्लीं नांवें ठेवावींत कां? हे मराठ्यांनो! तुह्मास राज्य मिळावें या करितां आपले शीर हातावर घेऊन जे तुमची इमानानें नोकरी करणारे, इतकेंच नव्हें तर तुह्मांस संकटसमयीं तारणारे, त्याच ब्रह्मवृंदांवर तुह्मी हे असत्यारोप आणीत अहांना?

सोळाव्या पानावर गोपाळे म्हणतात– " विधवांचा मुहूर्त लावणें, म्लेंच्छभाषा शिकणें, लोखंड, कांतडीं, शिंगरें, सिसें यांचे पदार्थ विकणें, पोलीसखात्यांत, सफाईखात्यांत म्लेंच्छांच्या नोकऱ्या करणें, अतिशूद्र व वेश्या यांपासून धर्म घेणें, ....... बटलरांच्या हातचा चहा, बिस्किटें, सोडावाटर, लेमनेड, अंडीं, मांस, मद्य भक्षण करून आपल्या एकंदर ब्राम्हण जातींत पुनः व्यवहार करणारे भ्रष्टब्राह्मण शुद्ध झालेले बरेच दाखवितां येतील." या उताऱ्यामध्यें ग्रंथकर्त्यानें आपल्याकडून होईल तेवढे आरोप ब्राम्हणांवर आणिले आहेत. पहिला मुद्दा विधवांचा पुनर्विवाह. कोण लावितो? तर ब्राम्हण. ब्राम्हणवर्गांत जर पुनर्विवाहाचा प्रघात असता, तर आज कित्येक सुधारणाभक्तांला अपंक्त कां टाकिलें असतें? एखाद्या मनुष्यानें अविचाराची गोष्ट घडविल्यास सर्व समाजावर ती ढकलून देणें उचित नाहीं. ज्यांना जाति असण्याची अवश्यकता नाहीं असें वाटत असेल, ते तुमच्याच वर्गांतील होत. ते वडील बंधु व तुम्ही धाकटे येवढाच फरक. असो. म्लेंच्छभाषा न शिकण्याविषयीं सत्यशोधकांनीं सूचविलें आहे. ज्या भाषेंत ज्ञानभाण्डार भरपूर आहे व जी राजभाषा ती कां शिकूं नये? भाषा शिकण्याविषयीं मागें सिद्धकरून दाखविलें आहे; तिकडे सत्यशोधकांनीं आपली सत्यदृष्टि पोंचवावी असें मी सुचवितों.

दुसरा आक्षेप व्यापारीय वस्तूंचा. लोह, दूध वगैरे विक्रयासंबंधानें सत्यशोधकानें म्हटलें आहे. सत्यशोधका, तो पूर्वीचा काळ गेला. ब्राम्हणांचे वडील पूर्वी अरण्यांत राहून तपश्चर्या करीत होते व तुमचे पितामह, प्रपितामह वगैरे मंडळी दासकर्म म्हणजे

यजमानांच्या लहान मुलांची विष्ठा काढणें, त्यांची जोपासना करणें व यजमानाचे पादसंवाहन करणें हीं त्यांचीं मुख्य कामें होतीं. तीं कामें करण्यास तुम्ही तयार व्हाल कां? स्त्रियांचीं परिधातीं नवस्त्रें धुण्याविषयीं तुम्हांस तुमच्या यजमानपत्नीनें आज्ञा केल्यास तीं तुम्ही शीरसावंद्य मानाल कां ? कां मानणार नाहीं? तुमचे आजे ते काम करीत होते मग तुम्ही तें करानां? मागें कां सरता ? सत्यशोधका, तीच अवस्था ब्राम्हणांची आहे. दिवसेंदिवस तुमची चढती व बिचाऱ्या ब्राम्हणांची पडती आहे. तेंव्हां जसा काळ येईल तशी त्यांना पाठ केली पाहिजे. हल्लींचा काळ सत्यधर्माचा नव्हे. अधर्म हाच धर्म होऊ पाहत आहे, अर्थात् सात्विकी वृत्तीनें चालणारास या काळांत यश येणें हें दुर्धरच. आणि याच कारणानें त्यांना सांप्रत लोकांची सेवा करावी लागत आहे, तुमच्या सारखे अरेराव बनून चालल्यास त्यांचे हाल कुत्रासुद्धां खाणार नाहीं. त्यांनीं आपल्या अंगीं सहिष्णुताच ठेविली पाहिजे. सहिष्णुता हेंच ब्रम्हतेज हें तुम्ही खात्रीनें समजा. त्यांचें आचरण पाहिजे तसें नीच असलें तरी कांहीं हरकत नाहीं, त्यांनीं आपला नित्यविधि व तत्संबंधाचे नियम पाळिले म्हणजे बस्स आहे.

ब्राह्मण मद्य, मांस, व बटलरांच्या हातील पदार्थ भक्षण करितात हा तिसरा आक्षेप. सत्यशोधका, तूं ही जी गोष्ट स्पष्ट लिहून दाखविली आहेस ती सर्वव्यापक ह्मणजे सर्वांस लागू आहे कां? अरे जे आंग्लविद्यासुधारसाच्या आस्वादांत निमग्न असतील अशा लोकांत कदाचित् तुझ्या ह्मणण्याप्रमाणें असेल; परंतु त्या लोकांना ब्राह्मण्यांत मोठा मान मिळतो कां? कधींही मिळणार नाहीं. असे जे नराधम ते खात्रीनें शूद्र होत. सत्यशोधका, हे तुर

इयाच पंक्तीस बसून सुधारणा करणारे. मी तर त्यांची व तुझी योग्यता सारखीच मानितों. ज्याचें आचरण भ्रष्ट तो शूद्र हें निर्विवाद आहे; पण ब्रह्म ह्मणून जें कांहीं आहे तें जोंपर्यंत त्यांजवळ आहे तोपर्यंत आपण त्यांला मान दिला पाहिजे. आपण ब्राह्मणांचा जो सन्मान करितों, तो त्या मूर्तीचा नव्हे, तर ब्रह्माचें तें ठिकाण म्हणून. साक्षात् वेदोनारायण जेथें वास्तव्य करित आहे असे ब्राम्हण जरी दुराचारी झाले तरी आपणांस त्यांना मान दिलाच पाहिजे. त्यांच्या आचरणाबद्दल त्यांना सृष्टिकर्ता शासन करील. आपणांस त्यांचें व्यंग बाहेर काढण्याचा कोणत्याही प्रकारचा अधिकार नाहीं.

" यो यावत्कुरुते कर्म तावत्तस्य तु वेतनम् " हा सिद्धांत नेहमीं लक्षांत ठेवून चाललें पाहिजे. ब्राम्हण पाहिजे तसे का वागत ना. आपणास ते पूज्यच आहेत. आपण त्यांना पवित्र मानून जर त्यांजकडून धर्मक्रिया करवीत आहोंत तर आपणांस परमेश्वर सत्फळेंच देईल. कारण आपला तसा कांहीं कुत्सित हेतु नाहीं. ब्राम्हण हे भूदेव आहेत असें समजून मान देणें हें आपलें कर्तव्य.

यस्यां यस्यामवस्थायां यत्करोति शुभाशुभम् ।
तस्यां तस्यामवस्थायां फलमग्रेशुभाशुभम् ॥

हें जें वेदान्तीजनांचें म्हणणें त्याची विस्मृति होतां उपयोगीं नाहीं.

ब्राम्हण मद्य प्याले म्हणून आपण तसें केलेंच पाहिजे असा नियम नाहीं. ते आपली जर सात्विकीवृत्ति सोडून देतील व राजसी अथवा तामसीचा स्वीकार करतील तर ते खुशाल करोत. आपण मात्र नीच स्थिति जाऊन उच्चपद मिळेल असा प्रयत्न करावा.

कांहीं कांही ब्राह्मण नीच कर्म करितात म्हणूनआपणही तसेंच करावें; असें म्हणून चालतां उपयोगाचें नाहीं. ब्राम्हणांनीं पाहिजे तसें वर्तन केलें तरी ते पवित्र आहेत. कारण त्यांना परमेश्वरानें ब्रम्हयोनींत जन्म दिला आहे. तेव्हां त्यांना पूज्य मानून चालणें हें एक अर्थी आपणांस भूषणच आहे.

ब्राम्हणांना आईची उपमा लोक देतात म्हणून सत्यशोधकास बराच राग आला आहे असें दिसतें.( पहा पान १६ ) ब्राम्हण ही धर्ममाता होय. आपण ज्या धर्मांत जन्मास आलों त्या धर्माची माता ब्राम्हण हीच आहे. धर्माचें सर्व श्रेय ब्राम्हणसांच दिलें पाहिजे. कारण आनादि काळापासून त्यांनीं ईश्वरप्रणीत वेदांचें संगोपन करून धर्मास सतेज केले. धर्मावर कितीही संकटें आलीं तरी त्यांनीं वेद सोडिले नाहींत. याप्रमाणें जे धर्मरक्षक ती आमची माता होय. परमेश्वराला सुद्धां धर्माच्या रक्षणार्थ अनेक अवतार धारण करून ब्राम्हणांचें संरक्षण करावें लागलें.

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥

ज्या परमेश्वराला धर्माच्या अभ्युत्कर्षार्थ निरनिराळे अवतार धारण करावे लागले, त्या धर्माचीं मूलतत्वें लहान असतील कां?

ब्राह्मण हे धर्माची माता नाहींत, यासंबंधानें सत्यशोधकानें खोटे नाटे दाखले देऊन कृतार्थता मानिली आहे. आई जशी पुत्राचें संरक्षण करते तसे ब्राह्मण धर्माचें संरक्षण करितात. आतां कित्येकांकडून कदाचित् तें यथान्याय होत नसेल, येवढ्यावरून ते धर्मविध्वंसक अथवा कट्टे ठक असें ह्मणता येत नाहीं. सर्वच आया पुत्रकन्यांचें यथान्याय पालन करितात कां? आपत्यधर्म कोणता? या प्रश्नाचें उत्तर

अथवा त्याच्या ज्ञानाचें ज्यांना सामर्थ्य नाहीं अशा आया शेंकडा किती निघतील? आई ह्मणजे मुलाचें कल्याण व त्याचें संरक्षण करणारी ईश्वरतुल्य स्त्री होय. ही ज्यारूया सत्यशोधकास कितपत आवडेल तें मात्र सांगतां येत नाहीं. पुष्कळ आयांना आपलें स्वकर्तव्य बजावितां येत नाहीं अशीं मी शेंकडों उदाहरणें दाखवीन.

आतां आईनें मुलाचें संगोपन कोठपर्यंत करावें? हा एक प्रश्न सत्यशोधकांच्या लेखावर उत्पन्न होत आहे. जोंपर्यंत संतति आईची आज्ञा पाळण्यांत तत्पर आहे तोंपावेतों आईचा उपदेश करण्याचा अधिकार व सांगितल्याचें चीज. ही गोष्ट सत्यशोधक कसे विसरले? मुलेंच जर दुर्वर्तनीय निघालीं तर त्याला आईनें काय करावें? कित्येक लोक आईबापांचा अपराध काढतात; परंतु तसें नव्हे, मुलास त्याच्या खेळगड्यांचा व संगतीचा गुण लागतो, आणि त्या गुणाचा परिणाम शेवटीं मातृनाशास कारण होतो. मग त्या मुलास ताळ्यावर आणण्याकरितां कितीही प्रयास केले तरी ते निरर्थक होतात. तीच गोष्ट धर्माच्या बाबतींत लागू आहे. अधर्मी लोकाशीं तुमचा सहवास घडल्यानें तुम्ही मात्राज्ञाघातक बनलात; याला तुमच्या आईनें काय करावें? तुम्ही व्यभिचारानें ( आचारभ्रष्टतेनें ) वागतां, त्यांत तुमच्या धर्ममातेचा काय दोष? तुम्ही सच्छीलानें वागू लागा, मग धर्ममाता तुम्हांस नेहमीं बोध, स्ववर्गाचे उन्नतोपाय इत्यादि गोष्टी तुम्हांस शिकविते कि नाहीं तें पहा आणि मग बिचाऱ्या धर्ममातेला नांव ठेवा. जे लोक आपल्या मातेचा उपमर्द करितात त्या अज्ञजनांना काय म्हणावें! ते दुष्ट या भारतजननीच्या उदरीं जन्मून "मातुःकेवलमेव यौवनवनच्छेदे कुठारा इव" एवढेंच कार्य करणारे; असे पुत्र न उत्पन्न झाले तरी बरें! पण ही अपेक्षा नको असें

मातेला वाटणें हें साहजिक आहे. मग आईची माया कितीही अलौकिक असली तरी तिच्या त्या मानभंगाच्या पातकानें जळून खाक होते. हें सत्यशोधकानें नेहमीं लक्षांत बाळगावें. तात्पर्य जो मनुष्य स्वमातेवर शस्त्र धरितो तो केवळ कृतघ्न होय. जगांत राहून काय केलें पाहिजे या विचारास तो अतर्क्य आहे यांत संशय नको.

"....असा ईश्वरदत्त ग्रंथ असता तर आज जगांत धर्मसंबंधीं वादच राहिला नसतां." [पहा पृष्ठ १७] हा केवढा अज्ञानपणा? ईश्वरदत्त नाहीं हें कशावरून सिद्ध झालें? त्या वैदिकधर्मांत अनेक पंथ उत्पन्न झाले त्यामुळें. अनेक पंथ कां उत्पन्न झाले? याची चिकित्सा दार्जीसाहेबांनीं केली आहे कां? वेदाच्या भाषेचें नानाविधार्थगांभीर्य हेंच अनेक पंथ उत्पन्न होण्याचें कारण. वेद जर मनुष्यप्रणीत आहेत तर गोपाळ्यांनीं तशाच गहनविचाराचा ग्रंथ लिहून दाखवावा. तसें जर झालें नाहीं तर मी मनुष्य नाहीं असें तरी ठरवून घ्यावें; अथवा वेद अमानुषीं आहेत असें कबूल करावें. सत्यशोधका, मक्समूलरभट्ट काय ह्मणतात पाहिलें आहेस कां? "आज जगांत जेवढे ग्रंथ विद्यमान आहेत त्या सर्वांत वेद हे अतिशय जुने आहेत. यांतील विचार इतके गहन आहेत कीं, असा ग्रंथ मनुष्याकडून लिहिला गेला असें मानणें अगदीं चुकीचें आहे. यांतील विचाराचें नीट अवलोकन केलें असतां, असा अमृतमय ग्रंथ लिहिणें हें मानवीशक्तिबाहेरचें आहे असें वाटतें. आणि तें आमच्या मतें यथार्थही आहे." सत्यशोधका, ऋग्वेदासंबंधानें हें ह्मणणें आहे. तें नीट लक्ष लावून वाच. उगेंच लटपट करून वेळ मारून नेऊ नको.

"वीतभर देशांत मुठभर लोकांत जन्मून शंभर वर्षेंही पुरीं ज्यानें पाहिलीं नाहींत त्या मनुष्याचे नियम हजारो वर्षें चालणा-

ऱ्या पृथ्वीवरील कोट्यवधि नानाविध लोकांनीं कसे वाळगावेत? "
(पृष्ठ १७पहा)सत्यशोधका, वीतभर देश हिंदुस्थान आणि मुठभर ह्मणजे ब्राह्मण हाच तुझा लिहिण्याचा उद्देशना? शंभर वर्षे कोण वांचले नाहींत? ब्राह्मण. पराशरादि ऋषि किती वर्षे जीवंत राहिले होते,त्याचा इतिहास तुला आठवतो कां? तसेंच वेदांत चुक्या आहेत असा एक गर्भितार्थ तूं दाखवीत आहेस. तुझ्यांत जर वेदांत चुक्या काढण्याचें सामर्थ्य असेल तर काढ आणि ये पुढें. सनातन-वेदांचे नियम कसे पाळावे? असा एक प्रश्न सत्यशोधकानें पुढें आणिला आहे. मूळ धर्माचे नियम जर तुमच्यानें पाळवत नाहींत तर तुम्ही काय करणार? आणि मग तुम्हाला धर्म तो हवा कशाला? ते नियम कठीण आहेत अशी जर तुला भीति वाटत असेल तर तसा नको वागू; आणि धर्माची अवश्यकता पण दर्शवूं नको. कारण तुझ्या अंगीं धर्मबंध पाळण्याचें सामर्थ्य नाहीं असेंच आम्ही समजूं. तुमच्या या भित्रेपणामुळें तुम्ही बहिष्कृत होऊन अहिंदु बनलांत. तुमच्यासारखा धर्मोच्छेद करणारा पुरुष आमचा आर्य आहे असें ह्मणणें हे धर्ममातेस मोठेंच लांछन होय. सत्यशोधका, तुझी ती चुलीजवळील आरेरावी बाजूवर ठेवून जरा धैर्य धर व ये पुढें, आणि कर वाद.

सत्यशोधक आपल्या बंधुवर्गास ह्मणजे त्यांच्या होस हो ठोकणाऱ्या लोकांस उपदेश करितात कीं, " बांधवहो, हीं धर्माचीं बोचकीं धुंडीत बसण्यास तुम्ही आपला वेळ धूर्त लोकांच्या नादानें दवडूं नका. " ( पृष्ठ १७ पहा ) हा सत्यशोकांचा सत्योपदेश. धर्मांत कांहीं कां असेना तुम्ही तें शोधूं नका. शाबास! सत्यशोधक हे "असे तुम्ही शोध करूं नका" हें सांगत आहेत; ते

ऱ्हां वाचकांनीं या गोष्टीकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे. बहिष्कृत लोकांस धर्म शोधण्याची अवश्यकता नसणें हें स्वाभाविक आहे. धर्म म्हणजे काय हें बाऱ्यांना काय ठाऊक ? आपल्यामध्यें एक म्हण आहे कीं, " ×× वाला गुळाची चव काय? " ती या स्थळीं यथार्थ शोभते. सत्यशोधका, बंधुवर्गाची उन्नति होण्याकरितां तूं अवतार धारण केलास आणि तूंच त्यांना अधर्माच्या खाड्यांत लोटितोसना ?

धूर्तलोक मराठ्यांना फसवून धर्म काय आहे तें दाखवितील आणि शोधण्यास लावतील; म्हणून सत्यशोधकांस भीति पडली आहे. सदुपदेशाचा असाच प्रभाव असतो कीं, तो प्रथम लोकांच्या मनांत पूर्ण ठसत नाहीं व ठसल्यावर मनुष्याचा ग्रह फिरत नाहीं. सत्यशोधक ह्या नामधारकांनीं स्वोपदेश कायम राहवा म्हणून प्रयत्न केला आहे. सत्यशोधका, तुझ्या त्या अप्रौढ उपदेशाची शिकस्त झाली. तुझ्यासारखा अरण्यपंडित या भारतजननीच्या उदरीं पुनः निर्माण होईल किंवा नाहीं याची शंकाच वाटते. अरे, सत्यासत्याचा कांहीं तरी विचार केला आहेस कां ? आपल्याच हातानें आपल्या समाजाचें नुकसान करूं नको. आणि तसें करणें तुला जर इष्ट असेल तर तूं तें खुशाल कर; पण पवित्र ब्रम्हवर्गावर तोंड टाकून पातकांत मात्र पडूं नकोस.

शेवटीं ब्राह्मण तुह्मांस वाईट रीतीनें वागवितील ह्मणून सत्यशोधकानें भीति दाखविली आहे. जे सात्विकाचरणानें वागणारे ते अशी नीचावस्था प्राप्त करून चालतील कां? मग बिचाऱ्यांच्या सच्छीलावर पांघरूण घा न लोकांच्या नुकसानास प्रवृत्त होणें या परत दुसरा नराधमपणा तो कोणता ? जोंपर्यंत तुमचा वर्ग स

च्छीलानें वागत होता, तोंपर्यंत तुमच्या वर्गास ब्राह्मणांनीं कांहीं अपकार केला होता कां? जेव्हां तुह्मी अनाचारी बनला, त्यावेळीं तुह्मांस शासन होण्याकरितां प्रयत्न केले, त्यांत तुमच्या मराठ्यांचें ब्राह्मणांनीं वाईट तें काय केलें? उपकार करीत असतां, ते जर अपकार होतील; तर मग तेथें निरुपाय मानून स्वस्थ बसणें हा सच्छीलांचा धर्म होय.

येथपर्यंत जाहीरसूचना पुरी झाली. या सूचनेनें इतका कोलाहल सुरू केला होता कीं, आमचे ब्रह्मवृंद ह्मणजे केवळ दोषांचें माहेरघर असा असत्यभास सत्यशोधकांनीं केला होता. तुह्मी जर खरे मराठे व हिंदु आहांत, तर मुसलमानांच्या मोहरममध्यें फकिरी घेण्यास व बिभत्स बोलण्यास .कां तयार होतां? सत्यशोधका, तुझेच बंधु इतके भ्रष्ट झाले आहेत कीं, त्यांना मनुष्य ही संज्ञा देणें केवळ अप्रशस्त आहे. असो.

"आपले लोकांकरितां सार्वजनिक फंड" हा अठराव्या पानावरील विषय आहे.सत्यशोधकांनीं फंडाची जी सूचना केलेली आढळते ती विशेष स्तुत्य आहे यांत संशय नाहीं. विद्येच्या प्रसारार्थ सत्यशोधकांना एखादा फंड असण्याची आवश्यकता आहे. लोकांना विद्यादान जेणेंकरून होईल त्याकरितां प्रयत्न करणें हें सत्यशोधकांचें मुख्यकर्तव्य होय; आणि त्यांनीं तें बजाविण्याविषयीं केलेली सूचना पाहून मला फारच आनंद वाटतो.

फंडाच्या संबधानें सूचना करितेवेळीं ब्राह्मणांच्या नांवानें खडे कां फोडितां? ब्राम्हणानें सत्यशोधकांच्या पूर्वजांचें कांहीं नुकसान केलें असेल तर न कळे. हा वेळपर्यंत सत्यशोधकांनीं जें लिहिलें आहे, तीं सर्व कारणें खोटीं असून केवळ द्वेषभाव साधण्या-

करितांच लिहिलीं असावींत असें अनुमान होतें. दाखविलेल्या कारणांवरून ते ब्राम्हणांची पवित्रता व सत्यशोधकांचा खोडसाळपणा मात्र प्रसिद्ध करीत आहेत,

आतां विसाव्या पृष्ठावरील मुख्य " वडिलांची चाल " या विषयास सुरुवात करितों. हल्लींच्या सुधारलेल्या ह्मणजे ज्यांना श्रम नको असें वाटतें, अशा लोकांच्या मठ्ठ व ऐतकब्रू डोक्यांत वडिलांच्या चालीसंबधानें विशेष वेड भरलें आहे. आपले बाप, आजे, पणजे वगैरे मूर्ख होते, व आम्ही म्हणजे आधुनिक काय ते शहाणे. सरस्वतीमंदिरांत विलास करून याथातथ्य जाणणारे काय ते आम्ही; असा हल्लींच्या लोकांस अभिमान झाला आहे. याच मतांतील प्रस्तुत पुस्तकाचे कर्ते जे दाजीसाहेब ते होत. यांच्या पूर्वजांनीं केलेल्या सर्व गोष्टी यांना अप्रिय वाटतात; अशी तर यांची नीति. तेव्हां वडिलांच्या चालीसंबधानें हे जो विषयप्रतिपादन करतील तो अविचारांचा द्योतक असलाच पाहिजे, हें मी सप्रमाण सिद्ध करून देईन.

" आमच्या लोकांच्या मस्तकांत वडलाच्या चालीचें जें वेड भरलें आहे तें ब्राम्हणांच्या हिताचें आहे. त्यामुळें ते आमच्या लोकांस त्याबद्दल उत्तेजन देतात. ते सांगत असतात कीं, वडलांची चाल सोडली असतां, पाप होतें. व त्याबद्दल स्वर्गांत वडलासही फार दुःख होतें." हें पहिलें संविधानक. एखादा गुरु मुलास सदुपदेश करीत असतां, त्याचा अज्ञान अथवा असमजू पालक खरा हेतू न समजतां म्हणेल कीं, "गुरूनें माझ्या नाशाविषयींच यास सांगितलेंअसावें" अशा प्रकाराचे कल्पनातरंग लढवून जर तो त्या निरपराधी गुरूस दोषी ठरविल, तर त्यांत गुरूचा काय दोष? "सच्छीलानें वागावें" एवढा

ब्राम्हणानीं उपदेश केलेला ऐकून सत्यशोधकासारखाच दुसरा एखादा दीर्घ-शहाणा पुढें होऊन म्हणेल कीं, ब्राम्हणानें सच्छीलानें वागा असें सांगितलें; यांत त्याचा काय बरें हेतु असावा? तें सांगण्यास कांहीं तरी कारण असलें पाहिजे. ब्राम्हण अपमतलबी तेव्हां आपणांस मराठ्यांनीं नेहमीं दानधर्म करावा, आपल्या आज्ञेत रहावें, त्यांची सेवा करावी; इतकेंच नव्हे तर त्यांचे गुलाम बनावें, एवढ्या हेतूनें तर हा उपदेश केला नसेलना? होय हाच हेतु खरा. असें जर त्यानें कुतर्क लढविले तर त्याला त्या उपदेशकानें काय करावें? सत्यशोधका, तुझी तरी हीच स्थिति.

सदुपदेश केला ह्मणजे मराठ्यांना दुराचरणाकडे वळविले असा जर अर्थ निष्पन्न होत असेल तर तो निव्वळ चुकीचा आहे, असे समजलें पाहिजे. उपदेश काय तर वडिलांनीं केलेल्या गोष्टीस मान द्या हा. वडिलांस श्रेष्ठपणा कां द्यावा ? त्यांची सेवा कां करावी ? इत्यादि प्रश्नांचा विचार सत्यशोधकानें शांत प्रसंगीं करावा. वडिलांनीं पाळिलेल्या रीति अथवा अंतःसमयीं केलेल्या आज्ञा न पाळणें ह्मणजे पित्राज्ञाभंग नाहीं का होत ? पित्राज्ञाभंग म्हणजे लहान सहान दोष आहे असें नाहीं. ज्यानें आपणांस जन्म दिला त्याचा अवमान करणें सत्यशोधकास जर रुचत असेल, तर त्यांनीं खुशाल तसें करावें. इतकेंच नव्हे तर पितृपूजा चांगली संभावित रीतीनें जरी त्यांनीं केली, तरी आम्ही त्यांस नांव ठेवणार नाहीं. कारण सत्यशोधकांचें बीज म्हणजे पित्याचा उपमर्द करणें हें होय.

पुन्नाम्नो नरकाद्यस्मात् पितरं त्रायते सुतः ।
तस्मात्पुत्र इति प्रोक्तः स्वयमेव स्वयंभुवा ॥

आश्वलायन अ० २ कं० ६ सू० १

पितरांना संकटांतून मुक्त करणारा तो पुत्र. तेव्हां सत्यशोधकांच्या मतें ठरलेला पित्राज्ञाभंग करणारा पुत्र खरा किं वरील वचनांत सुचविलेला खरा? याबद्दल वाचकवर्गास संशय उत्पन्न होणें साहजिक आहे. जे वेदाच्या निगूढ अर्थांत निमज्जन करणारे, त्यांच्या वाक्यास हरताळ लावण्याकरितां सत्यशोधक निर्माण झाले आहेत. आश्वलायनांना त्यावेळीं " कलियुगीं एक मराठ्यांत अग्रगण्य व सत्यशोधकसमाजाचे प्रसिद्ध उपदेशक दाजीसाहेब हे उत्पन्न होऊन पित्राज्ञाभंग करावा असें सिद्ध करतील" असें जर त्यांना सूचतें तर सत्यशोधकांच्या त्या पीळदार मिशांस कांदे बांधून त्यांना सक्षौरप्रायश्चित्त घेण्याचा प्रसंग आला असता, हें त्यांनीं पक्कें लक्षांत ठेवावें. पितृभक्तीची मातब्बरी ज्या मनुष्यास कळत नाहीं, त्याला मनुष्य तरी कसें म्हणावें?

असो. " मुसलमान इंग्रज यांची भाषा कंठीं प्राण आला तरी शिकूं नये असें शास्त्र म्हणतें.. " इंग्लिश भाषा शिकावी किंवा नाहीं या विषयीं मी पूर्वीं बरेंच लिहिलें आहे. परंतु येथील मुद्दा विशेष मार्मिक असल्यामुळें तत्संबंधानें थोडेसें लिहितों.

" न वदेद्यावनीं भाषां प्राणैः कंठगतैरपि " या संस्कृत वाक्याचें प्रस्तुत वाक्य हें भाषांतर होय. यांत यावनीभाषा बोलूं नये असाच शास्त्राधार आहे. हें सत्यशोधकांच्या लक्षांत आलें आहे कां? यावनीभाषेंत अधर्माचरण विशेष आढळतें व तिचा प्रभाव इतका जागृत आहे कीं, तिचें अध्ययन करणाराची स्वधर्मावर श्रद्धा बहुतकरून राहत नाहीं. तेव्हां अशा दुर्वर्तनप्रवर्तक भाषेचें अध्ययन कोणी करावें? परंतु सांप्रत तीच राजभाषा व राष्ट्रोन्नतीचें साधन झाल्यामुळें शिकणें प्राप्त आहे. सर्व

कायदे व त्यांचे अम्मल करणारे लोक तद्भाषाप्रवीण असल्या कारणानें ज्यांना ती येत नसेल त्यांच्या अर्थाचें विशेष नुकसान होण्याचा संभव आहे; तसेंच त्या भाषेंत शिल्पादिशास्त्रीयविज्ञानावर बरेच ग्रंथ झालेले आढळतात, त्यांची आपल्या लोकांस सांप्रत अत्यंत आवश्यकता आहे. कारण आपले लोक इतके दारिद्र्यानें पीडित झाले आहेत कीं, जर आपण उद्योग धंद्यांत सुधारणा न केली, तर आपल्या भावीप्रजेस अन्न मिळण्याची मारामार पडेल; अर्थात् सांप्रत आपणांस ज्या ज्ञानाची विशेष जरूर आहे, असें विविधविषयांचें ज्ञान संपादून देशास सधन करणें हें आपलें एक कर्तव्यकर्मच होय.

ब्राम्हण, यूरोप, अमेरिका इत्यादि स्थळीं जाऊन वकील, ब्यारिष्टर वगैरे बनून येतात; तरी त्यास ब्राम्हण असेंच म्हणतात ही गोष्ट सत्यशोधकांस आवडली नाहीं. प्रतिपक्षास उन्नतावस्था प्राप्त झालेली पाहून शत्रूच्या तळपायाची आग मस्तकांस जाणें हें स्वाभाविक आहे. केवळ स्वोदरभरणार्थ ब्राम्हण तिकडे जरी जाऊन येतात, तरी त्यांना येथें आल्यावर त्या दोषांचा झाडा द्यावा लागतो. त्यांना मोठा खर्च करून प्रायश्चित घेणें भाग पडतें. यांत त्यांच्या द्रव्याचा व मानसिकश्रमाचा बराच व्यय होतो; इतकेंच नव्हें तर ते अगदीं कंटाळून जातात; हें विलायतेस जाणें नको असें त्यांला वाटल्यावांचून राहत नाहीं. आणि प्रायश्चित्त देण्याचा मूळ उद्देश हाच आहे कीं, कृतापराधाबद्दल त्याला पश्चात्ताप होऊन तो सन्मार्गावर यावा.

प्रायो नाम तपः प्रोक्तं चित्तं निश्चय उच्यते ।
तपो निश्चयसंयुक्तं प्रायश्चित्तं तदुच्यते ॥

मनु०

तात्पर्य प्रायश्चित्त दिल्यानें त्या मनुष्याच्या हातून घडलेल्या दोषांचा प्रतिकार होऊन पुढें त्यानें तें करूं नयेत, येवढ्याच गोष्टीचा बोध होतो. परदेशांत गेल्यानें तेथें अनाचार होण्याचा विशेष संभव आहे; म्हणूच प्रायश्चित्त या शासनिक उपायाची योजना केली आहे; हे निराळें सांगितलें पाहिजे असें नाहीं. तेथें जर सदाचरणानें वागण्याचें साधन सुगम होईल जर तिकडे जाऊन येणाऱ्या लोकांस प्रायश्चित्त देण्याची मुळींच जरूर नाहीं हें शास्त्रसिद्ध आहे.

ब्राह्मण लोक मोठे ज्ञानी आहेत; तेव्हां ते आम्हा मराठ्यांना खाड्यांत टाकितील; याप्रमाणें सत्यशोधक आपल्या बंधुवर्गास सूचवित आहेत. ज्ञानवान् मनुष्य कधीं तरी कपट करील कां ? सत्यशोधका, सात्विकीवृत्ति या शद्धाचा अर्थ काय ? हें तूं एखाद्या मराठीभाषेच्या कोषांत तरी पहा. उगेंच वायफळ वहकू नको. ब्राह्मणांनीं सोंवळें कांखेंत गुंडाळून ठेविलें म्हणून जें तूं म्हणतोस त्याला प्रमाण काय ? आम्ही सोंवळ्यानें वागतों, म्हणून सोंवळें नेसून तुझ्या घरीं कुक्कुटपक्षांच्या विष्ठेवर पाय देण्यास ब्राह्मणांनीं यावें कां? नाहीं, सत्यशोधका, नाहीं. तूं अजून अनभिज्ञ आहेस, तेव्हां तुला त्या गोष्टी कशा सांगाव्या? सत्यशोधका, तूं जाणून बुजून शूद्र, तेव्हां तुला ब्राह्मणांच्या घरांतील गोष्टी कोठून कळणार ?

सत्यशोधक, वडिलांच्या चाली सोडून द्या ह्मणून जाडा व शहाणपणाचा उपदेश करित आहेत. त्या चाली वाईट ह्मणजे बाप जर गांज्या ओढीत असला तर मुलानें तसें केलेंच पाहिजे असें माझें ह्मणणें नाहीं; जेणें करून सूनीति वृद्धी पावेल इकडे प्रत्येक मनुष्यानें दृष्टि देऊन स्वहित संपादावें ही गोष्ट मी पण कबूल करितों. परंतु

स्वहित म्हणजे ब्राम्हणांचीं निंदा करून कोलाहल मातविणें हें मात्र नव्हे. सन्मार्गानें राहून जगांत कीर्ति मिळवून यशस्वी होणें हेंच स्वहित. उगेंच वायफळ वहकून स्वहित साधत नसतें. कांहीं थोडा विचार करून शरीरास श्रम द्यावे तेव्हांच स्वहित साधतें. असें ** सारखें तोंड टाकून स्वाधिकार मिळत नाहींत.

"तुम्ही शहाणे झाला म्हणजे धूर्तांचें खचित नुकसान होणार हें मात्र चांगलें ध्यानांत ठेवा." चांगलें वट्ट ध्यान्यांत ठेविलें तरी त्यांत ब्राम्हणांचें काय नुकसान होणार? तुम्ही शहाणे झाला तर तुमच्या कुटुंबाचें पोट भराल, त्यांत ब्राम्हणाचें काय गेलें? सत्य-शोधका, तुझा हा किती तरी खोडसाळपणा? शहाणे होणार तुम्ही आणि नुकसान होणार ब्राम्हणांचें. शाबास; तुझा न्याय तर विलक्षण आहे. मनोराज्याप्रमाणें तर उपदेशकांचा हेतु नाहींना. अगोदर शहाणे होण्याचा अभाव. ते विद्या शिकतील व आपलीं कर्तव्यें म्हणजे सत्यशोधकानें सुचविली असतील तीं कोणतीं? तें त्यांना समजेल ते-व्हां ते भांडायला उठणार. सत्यशोधका, तुझें हें मनोराज्य कोठ-पर्यंत टिकणार!

बाविसाव्या पानावरील "आमच्या लोकांनीं मनांत गांठ बां-धून ठेविण्यासारखी शेवटची विनंती" ह्या मोठ्या अक्षरांच्या वि-षयासंबंधानें येथें थोडेंसें लिहितों. मनांत गांठ बांधण्याकरितां जीं कांहीं साधनें दाखविलीं आहेत, त्यांत वेद हे ईश्वरप्रणीत नाहींत हें एक कारण होय. सर्व पृथ्वीवर अनेक धर्म व त्यांचे अनेक पंथ आहेत. ही गोष्ट सत्यशोधकांनीं कबूल केली आहे. परंतु अनेक धर्म कोणत्या कारणानें निर्माण झाले? याचें कारण सत्यशोधकांनीं शोधिलें आहे कां? सत्यशोधका, सर्व धर्मांचें मुख्य मूळ वेद होय. "वेदोऽखिलो धर्ममूलम्" हें खरें आहे. परंतु ठिकाठिकाणीं त्या-

ठ्या अर्थाचा विपर्यास करून धार्मिकाचरण वडत असतें. एका वेदाचे भाषाज्ञानवैपरीत्यानें इतके अर्थ होतात कीं, तत्संबंधाचा ऊहापोह करणें मनांत आणिलें असतां, वेदव्यासांच्या महाभारतासारखे आठ दहा जाडे ग्रंथ तयार होतील. सर्व धर्मांचीं मूलतत्वें कांहीं अशीं एकच आहेत; तेव्हां वेद हे ईश्वरप्रणीत मानणें विशेष प्रशस्त समजलें पाहिजे.

ज्याअर्थीं सर्व धर्मांचें वेद हें कांहीं अंशानें मूळ आहे; त्याअर्थीं वेद हे ईश्वरप्रणीत आहेत यांत शंका नको. सत्यशोधक पृष्ठ २३ मध्यें ह्मणतातः—"एकाच कारखान्यांतील कागदांवर सर्व धर्मांचे पवित्र ग्रंथ लिहून ते निराळे बांधून त्यांचीं पुडकीं अग्नींत टाकिलीं आणि ह्मटलें कीं, परमेश्वरा, खुद्द तुझ्या प्रसादाचा जो ग्रंथ असेल तो जळणार नाहीं, बाकीचे सर्व जळतील असें ह्या त्या धर्मांच्या पूर्णाभिमान्यांनीं ह्मणून हात जोडून, डोळे झांकून, एकाग्र एक पायावर उभे राहून ह्मटलें, तरी त्यांतून एकही धर्मग्रंथ जळाल्याशिवाय राहणार नाहीं इ०इ०इ० " सत्यशोधकांनीं कोटी तर खूब लढविली आहे. सत्यशोधका, ज्या कारखान्यांतील कागदांवर ग्रंथ लिहावे असें ह्मणतोस; ते कारखाने ईश्वरप्रणीत जर असतील तर ग्रंथ जळणार नाहींत, कारण सत्यासत्याचा निर्णय करणारा परमेश्वर आहे. परमेश्वरानें अगदीं प्रथम ज्या वस्तूंवर वेद लिहिले असतील ती वस्तु आणून जर वरील प्रयोग केला तर मात्र त्यांचे खरे शोध असेच मी ह्मणेन.

अग्नीचा मुख्य हा धर्म आहे कीं, दृश्य व अदृश्य या पैकीं ज्या विनाशी या शद्बांत मोडल्या जातात, त्यांस दुसरें रूपांतर देणें आणि त्या धर्माप्रमाणें त्यानें आपलें कार्य बजाविलें तर त्यात सत्यशोधकांच्या प्रतिज्ञेपासून काय निष्पन्न होणार? सत्यशोधका, प्र

रमेश्वर उत्पन्नकर्ता व लयकर्ता आहे; तेव्हां वस्तुंचा लय अथवा उद्भव हा होणारच. कदाचित् ते सर्व ग्रंथ जळाले, तरी त्यांचे ते निगूढ हेतु हे खात्रीनें जळणार नाहींत. जोंपर्यंत सृष्टींत मनुष्यें आहेत तोंपावेंतों तें अलौकिक हेतु चिरस्थायी राहणार यांत शंका नको.

मनुष्यें जर ईश्वरप्रणीत आहेत तर तीं जोंपर्यंत जीवंत असतील, तोंपोवतों त्यांना अग्नीपासून भय वाळगण्याचें कारण नाहीं, असें सत्यशोधक सिद्ध करून देतील काय? अग्नीचा जो दाहकधर्म तो सर्व पदार्थांवर घडणारच. मग ते दृश्य अथवा अदृश्य कां असेनात. सत्यशोधकांस जर स्वतःचें मत खरें आहे असें वाटत असेल, तर त्यांनीं "हे परमेश्वरा, मी जें मत निर्माण केलें व धर्मढोंगपरिस्फोटन हें पुस्तक लिहिलें आहे, त्यांतील मतें सत्यास स्मरून असतील तर मी न जळतां पूर्वरूपाप्रमाणें राहिलों पाहिजे आणि तीं जर खोटीं असतील तर माझें भस्म व्हावें." अशी प्रतिज्ञा करून परमेश्वराची अनन्यभावानें प्रार्थना करावी व प्रदीप्त अशा अग्निकुंडांत उडी टाकावी. असें केलें असतां, जर ते जीवन्त राहिले तर त्यांचें ह्मणणें खरें असें आह्मी समजून ब्राह्मण खोटे, ते ढोंगी असें आह्मी कबूल करूं. सत्यशोधका, कदाचित मी ह्मणतों त्याप्रमाणें अग्निकुंडांत उडी टाकून जनककन्या जी सीता, ती जशी शुद्ध ठरून बाहेर आली; तसें तुझेंहीं येणें होईल अशी तुझी जर खात्री असेल, व तसें करण्यास तूं जर कंबर बांधून तयार असशील, तर मला मात्र अगोदर खबर दे; ह्मणजे सर्व कामें सोडून मित्रमंडळीसह तुझा तो अपूर्व समारंभ पहाण्यास मोठ्या आनंदानें येईन. सत्यशोधका, नुसत्या कोट्या लढवून विषयाची सिद्धता होत नाहीं. कांहीं तरी त्यांत सत्यांश पाहिजे. तसेंच शास्त्र ह्मणजे काय? या प्र-

श्नाचा निर्णय पण त्यांत व्हावा लागतो. भलत्या सलत्या कोट्या लढविणें हा सज्जनांचा धर्म नव्हे.

अज्ञान लोकांचीं मतें हीं नेहमीं दोषांनें ओतप्रोत भरलेलीं असणारच. ज्यांना विचार व सदाचार माहित नाहीं त्यांनीं कितीही कंठशोष केला तरी त्यांचें तें ह्मणणें समाजास कितपत रुचेल त्याची शंकाच आहे. सत्यशोधका, तूं हें तत्व कां बरें विसरतोस?

येथून " धर्मविधि " या विषयास सुरुवात झाली. दाजीसाहेबांचीं मतें अद्यापि ठरून गेलीं नाहींत असें दिसतें. एके ठिकाणीं ह्मणतात, आह्मांस ब्राम्हणांप्रमाणें अधिकार पाहिजे व दुसऱ्या स्थळीं धर्मविधीची कांहीं जरूर नाहीं. तीं व्रतोपोषणें हवींत कशाला? तीं ब्राम्हणांनाच लखलाभ होवोत. तेव्हां यांचें खरें म्हणणें कोणतें? हा एक प्रश्न माझ्या हृदयांत उत्पन्न झाला आहे.

जेथें स्थायिक मत नाहीं तेथें विचारांची तारांबळ कशा प्रकारानें उडतें तें या " धर्मढोंगप्रारिस्फोटण " पुस्तकावरून चांगलें लक्षांत येईल. असो. प्रस्तुत पुस्तककर्त्यानें म्हटलें आहे कीं, "आपल्या लोकांत जेवढा धर्म भोळेपणा आहे तेवढा शहाण्या जातींत नाहीं." शहाणी जात म्हणजे ब्राम्हण. तेव्हां तिजमध्यें मराठ्या सारखा अनाचार न आढळणें हें साभाविक आहे; मग पुस्तककर्त्यानें यांत सूचविलें तें काय?

मराठ्यांनीं दिवसेंदिवस सुधारून ब्राह्मणांचा द्वेष करावा; अशा आशयाचे पुस्तककर्त्यानें उद्गार काढिले आहेत; परंतु ते कां? ब्राह्मणानें यांच्या पितामहाचें कांहीं नुकसान केलें असेल तर न कळे. सत्यशोधकांच्याच लिहिण्यावरून नुकसान केलें असें सिद्ध होत नाहीं. सत्यशोधकांचा असा आरेरावी बाणा कोठपर्यंत टिकेल?

ब्राह्मण जशीं व्रतोपोषणें करितात. तशीं मराठ्यांनीं करूं नयेत अशी ग्रंथकर्त्यानें एक सूचना केली आहे. नका करूं. ब्राह्मण कोठें आडवायाला आले आहेत? तुमचें कर्म तुह्मी करा. त्यांतील पुण्यपापांश ब्राह्मणांच्या माथीं मुळींच नाहीं. तसेंच ब्राह्मणांनीं मराठ्यांच्या डोक्यावर एक मोठा पाषाण देऊन त्यांना अंगणांत उभेंही केलें नाहीं, मग असा कुत्सितपणा कां आढळावा?

"........ज्यांना रात्रंदिवस युक्त्यावर युक्त्या लढवून लोकांच्या तर्कास व सरकारच्या कायद्यास फसवून रकमाच्या रकमा मिळवाव्या लागतात तसेंच ज्याना अज्ञान व गरीब लोकांच्या निढळच्या थेंबावर तळें साचवावें लागतें त्यांना लोकांचे श्राप[?शाप] वं पाप हेंही सांचवावें लागतें." लोकांच्या तर्कास व सरकारचे कायद्यास फसविणारे आणि पैसे उपटणारे काय ते ब्राम्हण. असा या सत्यशोधकाचा ठाम ग्रह झालेला दिसतो. वस्तुतः तशा प्रकारचा दोष ब्राम्हणावर न्यायानें येईल असें खात्रीनें सांगतां येणें केवळ अशक्य आहे. सरकारच्या कायद्यास प्रसिद्धपणें फसविणारे ब्राम्हण आहेत तर मग सरकार त्यांना शिक्षा कां देत नाहीं? जर शिक्षा देत नाहींत तर मग फसावित नाहींत हें उघड आहे. मग तुझी ती सूचना काय उपयोगाची? असो. सरकारच्या कायद्याला फसाविणारे असे लोक तुम्हांस किती आढळले होते? एक करितो आणि हजारांस बोल लागतो. तशांतली स्थिती तर सत्यशोधकांनीं मनांत आणिली नसेलना? सत्यशोधका, तूं जें विधान आज समाजापुढें आणिलें आहेस त्याला प्रमाण काय? उगेंच खोटेनाटे आरोप शाबीत करण्याकरितां अर्थवाद करणें यांत अर्थ तो काय?

गरीब लोकांवर ब्राम्हण जुलूम करितात अशा आशयाचें वरील वेंच्यांत एक विधान कल्पिलें आहे. जे अनाथ, अशा लोकां-

वर सात्विकीवृत्तीचे पालक कधींही जुलूम करणार नाहींत. सत्यशोधकांचा हा केवढा तरी प्रमाद? किं ज्याच्या धुंदींत त्यांनीं सत्यास स्मरणाऱ्या लोकांवर आरोप आणिला! सत्यशोधकांनीं त्या प्रसंगीं कांहीं कैफी वस्तूंचें सेवन तर केलें नव्हतें ना ?

आतां शाप लागणार कोणाला ? सत्यशोधकांला किं ब्राह्मणांना ? ज्याअर्थी सत्यशोधकांकडून ज्ञानातिक्रम घडला आहे त्या अर्थी तो शाप अथवा समाजाचरित पातक हें सत्यशोधकांच्या शिरीं लादणें हें न्यायी मनुष्यास योग्य दिसतें. स्वतः चोरी करून त्याचा परिणाम शेंपटीवर घडविणें व त्या चुकीच्या नाशार्थ समाजास लंडे करण्याचा प्रयत्न करणें हा केवढा मूर्खपणा ?

मराठे लोक न्यायानें धन मिळवितात व ब्राह्मण अन्यायानें. असेंही पुस्तककर्त्यानें म्हटलें आहे. सत्यशोधकाची दृष्टीच अशी आहे कीं, त्याला स्वतःचे अपराध अथवा दोष काय आहेत तें समजत नाहीं. तूं जर समाजाचीं सूत्रें कराग्रीं धारण केलीं आहेस तर तुझ्याकडून असे दृष्टिदोष होणें हें मोठें भयंकर पातक आहे असेंच समजलें पाहिजे. जे लोक चोरी करण्यांत प्रवीण त्यांना न्यायानें संपत्ति मिळविणें इतकेंच नव्हे तर निढळच्या घामानें प्राप्त केली असें म्हणणें हा केवढा मूर्खपणा ?

" ईश्वराची भक्ति म्हणजे जनांची भक्ति. " असें एक स्वकपोलकल्पित विधान केलें आहे. सत्यशोधका, तुला हा अर्थ कोणत्या शब्दकोषांत आढळला ? त्या कोषाचें नांव दिलें असतेस तर बरें झालें असतें. सत्यशोधका, तुझे हे असत्यप्रलाप कोठपर्यंत जाऊन पोंचतील त्याचा नियम करितां येत नाहीं.

ईश्वराची भक्ति केली असतां ती फुकट जाते असें सत्यशोधक म्हणतात; याला आधार काय? प्रत्यक्ष ईश्वरानें यांच्या कानांत

तर येऊन सांगितलें नसेलना ? पण नाहीं. सत्यशोधकांच्या अकलेचे हे विलक्षण तरंग आहेत. अरे, परमेश्वर म्हणजे काय ? याचा अर्थ तरी तुला समजतो कां? मग तूं अशी विनास्वार्थ टवाळकी कां करितोस?

मराठ्यांनीं धर्मविधि व संस्कार कोणत्या शास्त्रास अनुसरून करावे; यविषयीं सत्यशोधकांच्या माथ्यांत पूर्ण वेड भरलें आहे. अरे, तुम्ही जर ब्रम्हधर्माचरण करीत नाहीं तर मग वेदोक्तकर्म करून तें काय करणार? ज्यांना "श्री" कशी असते हें माहिती नाहीं, तें आतां वेदांवर भाष्यें तयार करणार; तेव्हां या कुक्कुटांडभक्षकांचें सामर्थ्य कांहीं विलक्षण आहे हें निराळें सांगण्याची आवश्यकता नाहीं.

धर्मगुरुवर जेवढे आरोप आणवतील तेवढे आणण्यास या गुरुभक्तिपरायण सत्यशोधकशिष्यानें कांहीं कसूर केली नाहीं. असाच शिष्य पाहिजे कि जो गुरूची उचलबांगडी करून त्याला निजधामास पोंचवितो. सत्यशोधका, तुझी ती धर्मगुरुप्रीति पाहून आम्हांस अतिशय हंसूं येतें. अरे, तूं जरा तरी शुद्धीवर ये; उगंच बहकत सुटतोस याला काय म्हणावें?

सत्यशोधक हे पुढें निव्वळ वेदांतांत शिरले. वेदांतावर तुकारामबुवांचे जे अभंग आहेत त्यापैकीं चार दिले आहेत; त्यांत "ब्राम्हण तो एक चोखामेळा महार " इत्यादि भक्ति व वैराग्यपर अभंग दृष्टिगोचर होतात. या अभंगांची योग्यता किती आणि ते येथें कसे येऊन पडले? अरे, चोखामेळ्याला ( त्याच्या जातीला ) तुकारामबुवाच्या अभंगांत ब्राह्मण असें ह्मटलें आहे; परंतु तेच तुकाराम बुवा शूद्र असतां त्यांनीं अंत्यजाबरोबर ( चोखामेळ्याच्या जाती बरोबर ) खानापानादि व्यवहार केल्याच्या संबंधांत एक तरी उ-

दाहरण तूं दाखविशील कां? तसेंच तुकारामबुवा आपल्या गळ्यांत यज्ञोपवित धारण करून वेदोक्तकर्म करीत असत असा दाखला तूं दाखवितोस कां? सत्यशोधका, कर्मकांड आणि ज्ञानकांड हीं दोन कांडें अगदीं भिन्न आहेत. तूं असा असमजानें "सर्व शास्त्रांचा एक गोळा करीन" असें म्हणशील तर तुझ्या सारखें कोट्यावधि नास्तिक निर्माण झाले तथापि त्यांच्यानें तें काम होणार नाहीं. अरे, अभंगांत जी स्थिती सांगितली आहे ती परमहंसांची; गृहस्थांची नव्हे.येथें ब्राम्हण हें जें पद आहे तें जातिवाचक नव्हे गुणवाचक आहे. हें तुझ्या लक्षांत कसें आलें नाहीं? अरे, तू धूर्तशिरोमणि आणि तुझ्या हातून असे अश्लाध्य प्रकार घडावेत कां?

सोंवळ्याओंवळ्यासंबंधानें " देह विटाळचा गोळा, कैसा होतोसी सोंवळा" हा अभंग दिला आहे. कोणी वृध्दमनुष्य जर गृहस्थाश्रमीं मोहित होऊन राहिल, तर त्याला ताळ्यावर आणण्याकरितां हा अभग आहे. ह्मणजे हाही वेदापन्तर आहे. कर्मकांडांतील नव्हे. सोंवळ्यापासून काय फायदा आहे; हे अशौचतुल्य मराठ्यांना काय माहिती? ज्यांचें पवित्राचरण आहे अशा लोकांस सोंवळें हें एक साहाय्यकर्ते आहे हें त्यांनीं पक्कें लक्षांत ठेवावें.

महासाधु तुकाराम यांचा साकारभक्तीकडे विशेष कल असे; आणि त्याप्रमाणें त्यांनीं वेदांतादि विषयावर अभंगांची रचना केली. परंतु आमच्या मराठमंडळास त्याचा खरा इंगितार्थ काय हें मर्म न समजून ते वडाची साल पिंपळाला लावू पहात आहेत. सत्यशोधका, अशानें कांहीं तत्व निर्माण होत नसतें. तूं केलेल्या विचाराप्रमाणें कोट्यावधि वर्षं लेख लिहिले तरी त्यांपासून कांहीं निष्पन्न होणार नाहीं.

"सांख्य मुनी शुद्रीं पोटीं॥ कौंडिण्यांचा जन्म विधवे गाठीं॥
टंकऋषि चांभारणीच्या उदरीं ॥ जन्मुनी ब्रह्मीं पावले ॥ "

इत्यादि प्रकारच्या ओव्या गाऊन धान्य दळीत बसण्यांत अर्थ नाहीं; खरें काय आहे त्याचा याथातथ्य विचार केला पाहिजे; मोठा स्वर काढून गीत म्हणणें हा केवळ अज्ञानपणा होय.

येथपर्यंत सत्यशोधकसमाजाचे प्रसिद्ध उपदेशक जे रा० दाजीसाहेब त्यांनीं लिहिलेल्या लेखासंबंधानें संक्षेपतः विवेचन केलें. त्यांनीं आपल्या पुस्तकांत एकतर्फी विषयप्रतिपादन करून सव्वीस पृष्ठें व्यापिलीं आहेत. परंतु तितकीं पृष्ठें लिहिण्यासारखा हा विषय महत्वाचा होता असें म्हणतां येत नाहीं.

सत्यशोधकांनीं ब्राह्मणांवर जेवढे आरोप आणवतील तितके त्यांनीं आणण्याचा प्रयत्न केला आहे. कोणत्याही गोष्टीस सबळ कारण न दाखवितां, विनास्वार्थ कोलाहल मातविणें अथवा द्वैतभाव जागृत करणें, हा केवळ मूर्खपणा होय. सत्यशोधकासारख्या मनुष्याच्या हृदयांत ही गोष्ट आली नाहीं हें मोठेंच नवल वाटतें.

सत्यशोधका, हा द्वैतभाव मातविण्याचा समय नव्हे. यांत सर्व आर्यलोकांनीं एकमत करून संभूयसमुत्थानादिसंस्था जेणेंकरून वाढतील अशी तजवीज केली पाहिजे. उखाळ्या पाखाळ्या काढून वितंडवाद करण्याचें वेश्याजनांचें जें कृत्य, त्याचा स्वीकार सत्यशोधक कां म्हणून करितात? तें मात्र समजत नाहीं.

धर्मतत्व इतकें गूढ आहे कीं, तें साधारण मनुष्यास थोड्याशा विचारानें कधींही समजावयाचें नाहीं. सत्यशोधकासारख्या समंजस मनुष्यानें तर पूर्ण विचार करून सत्यासत्याचा निर्णय केला पाहिजे होता; तो त्यांच्या कडून घडला नाहीं;

ही मोठ्या दुःखाची गोष्ट होय. ज्याला सत्य शोधणें असेल त्यानें सारासार विचार करून सत्याची मूलतत्वें काय याचा विचार केला पाहिजे.

वेदो ऽ खिलो धर्ममूलं स्मृतिशीलं च तद्विदाम्,
आचारं चैव साधूनामात्मानंस्तुष्टिरेव च ॥

मनुः

तेव्हां ज्यांचें आचरण शुद्ध त्यांना मान देणें हा आपला सर्वांचा मूळ धर्म; त्यास आपण परांमुख होऊन केवळ धर्मभ्रष्ट झालों, इकडे सत्यशोधक जरा दृष्टी देतील तर बरें होईल. जे सात्विकीवृत्तींचें मूलस्थान तेच आमचे परमेश्वर. ब्राह्मणांसारखें या भूलोकीं पवित्र दैवत नाहीं; हें पक्कें लक्षांत ठेवावें. जीं केवळ साधुवृत्ति त्यांच्या पवित्र आचरणावर अभद्रशब्दांचा वर्षाव करणें अथवा त्यांच्या कीर्तिफलकावर तामसोद्भवशक्तीचा प्रताप कोरून ठेवणें, केवढें अधमपणाचें कृत्य; किं ज्या कृत्याच्या नाशार्थ रा. दाजीसाहेबांनीं कोट्यावधि जन्म धारण करून ब्राम्हण वर्गातील मुलांच्या * * धुतल्या तरी त्या दोषांपासून त्यांना मुक्त होतां येणार नाहीं.

रा. गोपाळ हे सरकारी अधिकारी या नात्यानें कळविण्याचा आव घालीत आहेत. " तमाम हिंदुलोकांस जाहीर करण्यांत येतें" असें जें लिहित आहेत, त्याला आधार काय ? ब्राम्हण बाहेर देशांतून आले असें जें प्रतिपादन केलें आहे तें केवळ निराधार आहे. सगळें पुस्तक अशा वात्रटपणानें भरलें आहे कीं, त्यांतील लहान सहानदोष बाहेर काढण्याचा प्रयत्न केल्यास एक मोठा ग्रंथच होईल.

असले वायचळलेले सत्यशोधक उन्मत्त होऊन हल्लीं ब्रम्हवर्गाशीं इतके उद्धतरीतीनें वागतात कीं, त्या अश्लाघ्य प्रकारा-

चें नांव लिहून पवित्र लेखणीस श्रम देणें हें होय. ते स्वतःब्रम्हकर्म करूं लागले आहेत; परंतु मी त्यांना असें विचारतों कीं, तुम्ही स्वतः वेदाच्या ऋचा शिकाव्यात असें कोठें प्रमाण आहे कां ? तुम्ही म्हणाल ब्राम्हणांनीं ग्रंथ लिहिले तेव्हां आमचा अधिकार ते कसे लिहितील ? सत्यशोधका, तुझी ही मोठी चुकी आहे कीं, आचारभ्रष्टलोकांस वेद शिकविण्याची परवानगी देण्या इतके आमचे ब्रम्हपूर्वज मूर्ख नव्हते, तुझ्या त्या भ्रमभरित दृष्टीस तसें दिसत असेल जर तो तुझा केवळ मूर्खपणा. अरे, जेथें सात्विकीवृत्ति प्रकाशित आहे, अशा ठिकाणीं द्वैतभाव आढळेल तरी कसा ? सत्यशोधका, तुझें म्हणणें अगदीं अयोग्य व दोषांनीं भरलेलें आहे.

आमचे शास्त्रकार ह्मणतात कीं, जो मनुष्य राग, मोह, द्वेष, मद इत्यादि दोषांनीं व्याप्त झाला असेल, त्याला खरें कोणतें आणि खोटें कोणतें तें कांहीं समजत नाहीं.

न पश्यतीह जात्यन्धो रागान्धोऽपि न पश्यति ।
न पश्यति मदोन्मत्तो लोभाक्रान्तो न पश्यति ॥

अशी स्थिति तर गोपाळ्यांना झाली नसेल ना?

मागें एकें ठिकाणीं गोपाळ्यांनीं धर्म नाहीं अशा केलेल्या अरोळीसंबंधानें येथें लिहिणें विशेष प्रशस्त आहे. सत्यशोधका, धर्म नाहीं कोणाला? तो सर्वांना आहे. पशुपक्ष्यांनासुद्धां धर्म आहे; तुह्मी मात्र तूर्त अधर्मी बनला आहा. तुमचा धर्म ब्राह्मणांनीं मुळींच हिरावून घेतला नाहीं. उलटें तुमच्याकरितां त्यांनीं मोठमोठे ग्रंथ करून ठेविले आहेत. त्यांतील रहस्याचा थोडथोडा आस्वाद घेण्याचा तूं क्रम ठेविलास तरी तुझे दोन तीन जन्म होईपर्यंत तें ग्रंथभांडार संपणार नाहीं, हें मीं खात्रीनें सांगतों. तूं केवळ असत्यप्रलाप करणारा आहेस, तेव्हां धर्माचें खरें रहस्य काय

आहे तें तुला काय सांगावें? अरे, आमचें सनातनशास्त्र असें सांगतें कीं,

भूर्तदुर्जनविद्वेषीकृतघ्नानां कदा च न ।
न प्रकाश्यमिदं शास्त्रं रहस्यं केवलं यतः ॥

पूर्वोक्त श्लोकांत सांगितल्याप्रमाणें सर्व दुर्गुण गोपाळ्यांच्या शरीरांत पूर्णपणें भरले असावेत असें त्यांच्या या पुस्तकावरून दिसतें. तेव्हां त्यांना धर्मशास्त्राचें खरें रहस्य कळविणें म्हणजे आमच्या धर्मशास्त्राच्या आज्ञेचा भंग करणें हें होय. ज्याला "श्री" म्हणजे काय हें माहित नाहीं, त्यापुढें शास्त्रार्थ सांगण्यांत अर्थ तो कोणता ?

सत्यशोधका, तूं असा खोटा प्रलाप काय मांडिला आहेस ? तुझ्या त्या बहकण्यानें ब्राह्मणांचें सुईच्या अग्रभागा एवढेंही नुकसान होणार नाहीं. कोल्हेकुईनें जसें सिंहाचें महत्व कमी होत नाहीं; तीच स्थिति तुझ्या बहकण्याची. अरे, तुझ्या त्या अज्ञान कल्पना पाहिल्या असतां, असे शतमूर्ख लोक या भरतजननीच्या उदरीं कसे निपजले त्याचें आश्चर्य वाटतें. जे भूदेव त्यांच्यावर तूं असे खोटे आरोप आणितोसना? कांहीं हरकत नाहीं, त्यावद्दल तुला चांगलें प्रायश्चित्त लवकरच मिळेल. असो.

सत्यशोधका, ब्राह्मण शब्दाची व्याख्या खालीं दिली आहे ती नीट लक्ष देऊन वाच व मग ये पुढें.

गर्भाधानादिभिर्युक्तस्तथोपनयनेन च ।
न कर्मत्निन्नचाधीते स भवेद्‌ब्राम्हणः स्मृतः ॥

दानचंद्रिका.

आतां ब्राम्हण कोणते? तुझे ते मूर्ख विचारांचें गाठोडें गुंडाळून ठेव कसें तें. सत्यशोधका, अशा लपंडावानें सिद्धता होत नसतें हें लक्षांत ठेव.

अहो, मराठ्यांनो, तुम्ही ह्या गोपाळ्यासारख्या क्षुद्रमनुष्याच्या वाग्लालीत्यास भुलूं नका. हे केवळ दुसरे पाद्री साहेब आहेत. यांचे विचार फक्त चुली जवळचेच होत. तुम्हांस फसवून धर्मभ्रष्ट करण्याविषयीं यांनीं समाजापुढें विडा उचलिला आहे, हें तुम्ही आपल्या पवित्रांत:करणांत नेहमीं वागवा. तुम्ही पितृद्रोही व गुरुद्रोही बनूं नका; हेंच माझें सांगणें आहे.

सत्यशोधका, जरा प्राचीन इतिहासाकडे दृष्टि दे. विक्रम, भोज, भर्तृहरी, शूद्रक, कुमारपाल, रंतिदेव, बल्लाळसेन, इत्यादि क्षत्रियवीरांचे इतिहास नीट मन लावून वाच. अरे, ज्या भर्तृहरीनें संस्कृतभाषेंत मोठ मोठे ग्रंथ केले, इतकेंच नव्हे तर त्याचें ग्रंथ वाचून ब्रह्मवर्ग पण खूष होत आहेत. तो तुझ्या सारखा द्वेषी आहे असें त्यांच्या स्वप्नींहि आलें नाहीं. जो भोजप्रबंध नांवाचा ग्रंथ वाचून ब्रह्मवर्ग भर्तृहरीच्या ज्ञानाची किती तरी प्रशंसा करीत आहेत. तीच गोष्ट शूद्रक राजाची. सत्यशोधका, या राजमंडळीचें इतिहास नीट मन लावून एकदां वाच; भिऊ नको. ज्या राजांना केवळ रणकंदनेंच नव्हें विद्येचा पण पूर्ण संस्कार झाला होता, असे राजे ब्राह्मणांना मान देत होते किं नाहीं? अद्भुतसागरासारखा प्रचंड ग्रंथ लिहून जगास ज्ञानसागरांत स्नान घालणारा जो बल्लाळसेन तो ब्राह्मणांना किती तरी पूज्य मानीत असे. सत्यशोधका, पूर्वींचे ते राजमंडळ मूर्ख होतें कां? अरे, त्यांच्या सारखे धर्मशास्त्रवेत्ते पुरुष याकाळीं निर्माण होण्याचा अभावच आहे. अरे, त्या राजवर्गास वैदिककाळ अगोदर कीं तुला? त्यांना हें उघड आहे. वेदासंबंधाची विशेष माहिती त्या राजमंडळांस जास्त किं तुला? सत्यशोधका, तुझ्या सारखे ते अनाचाराचें माहेरघर झाले नव्हते.

मित्रा, शारदेचा असाच कांहीं धर्म आहे कीं, असत्याकडे तिचा उपयोग होत गेल्यास तिला विशेष त्वेष चढतो व सर्व दोष ती बाहेर पाडिते. सत्यास स्मरून चालणारावरच ती फिदा असते. तूं थोडथोडा टक करायला शिकला नाहींस तोंच तिचा दुरुपयोग करण्यास प्रवृत्त झालास! अरे, हा तुझा केवढा दुष्टस्वभाव! तूं सत्यशोधकांचा प्रसिद्ध उपदेशक ह्मणवितोस, आणि तुझें असें अश्लाध्य आचरण? अरे, तुझे पूर्वज ब्राह्मणांना मान देत होते ह्मणून तूं त्यांच्यावर वायचळल्यासारखें तोंड टाकितोस कां? पण हो, सत्यशोधका, तुझ्या समाजांतील सर्व मंडळी तर तुझ्या सारखी अर्ध्याहळकुंडानें पिवळी होणारी नाहींतना? तुझ्याकडून घडलेल्या चुकीचें निरसन जोंपर्यंत त्या मंडळीनें केलें नाहीं, तोंपावेतों तुमची ती मंडळीही तशीच असली पाहिजे हें उघड आहे. आणि तसें जर असेल तर तेथें सगळे अंधळे कसे निर्माण झाले?

हे अज्ञानांधा, हें धर्मराज्य आहे, येथेंच विश्वामित्रऋषींनीं तपश्चर्या करून ब्राह्मण्य संपादन केलें; हें पक्कें लक्षांत ठेव. येथें वैदिकधर्मानुयायी मोठ मोठे पंडित हल्लीं विद्यमान आहेत. वेदांचें खरें रहस्य येथें अद्यापि जागृत आहे, झोंपीं गेलें नाहीं. येथें मोठ मोठे विद्वान् पुरुष पूर्वी होऊन गेले, हल्लीं होत आहेत व पुढें कित्येक होतील ही गोष्ट तूं पक्की लक्षांत ठेव. तुझ्या त्या अज्ञानपटुसमाजाचें येथें कांहीं चालावयाचें नाहीं. विश्वामित्राप्रमाणें लोहपिष्ट भक्षण करून जरी तूं कोट्यावधि वर्षें उग्र तपश्चर्या केलीस, तरी तुझ्या त्या कपटी हेतूंना श्रेष्ठपणा कधींही मिळणार नाहीं. तूं येथें येऊन तुझ्या त्या कुक्कुटांडसमाजाचें बीं पेरिलें आहे ह्मणून कृतार्थता मानीत आहेस, हा तुझा केवढा तरी मूर्खपणा! अरे, अशा का कोठें विरुद्धाचरणानें समाजाची स्थापना होते? स-

त्यशोधका, तुझ्या त्या अश्लिल कृत्यावरून परमेश्वर तुला कोणती गती देईल तें मात्र सांगवत नाहीं. तूं आपण स्वतः खाड्यांत पडून तुझ्या त्या सत्यशोधक समाजास त्यांत नकोरे टाकूं. सत्यशोधका, अजूनही तुला जर पश्चात्ताप होत नसेल तर तुझ्या साऱखा निगरगट्ट व दुराग्रही दुसरा एखादा मनुष्य असेल असें मला वाटत नाहीं.

सत्यशोधका, आतां जर तूं येथें तुझा तो समाज बलवत्तर दशेंत आणण्याचा प्रयत्न चालवून आरेरावी बाणा दाखविशील तरतूं खात्रीनें समज कीं, येथील भिक्षुक ब्राह्मण तुला याच विश्वामित्रीच्या पवित्रातिरीं सक्षौर प्रायश्चित्त देऊन स्वतः तीर्थ देण्यास तयार होतील. आणि असें करण्यास श्रींकेदारेश्वरच्या आफाट फौजेंतील एकच मनुष्य मूळ कारण होईल. हें धर्मराज्य आहे, येथें आज पांचहजार ब्राह्मणांची वस्ती आहे हें नीट लक्षांत ठेव.

मित्रा, मागें तूं महासाधु तुकाराम बुवांचे वेदान्तपर अभंग देऊन जातिभेद नसावा, इतकेंच नव्हे तर चोखामेळा वगैरेच खरे ब्राह्मण असें तूं म्हटलें आहेस. ते अभंग ज्ञानकांडाचे द्योतक असें मीं पूर्वीच सांगितलें आहे. तूं ज्या महासाधुला पूज्य मानितोस तेच काय म्हणतात तें पाहिलें आहेस कां?

गुरुविण मार्ग नाहीं कर्मनिष्ठा; दामेविण हाटा जाऊं नये ।
ब्राम्हणें ब्राम्हण सद्गुरु करावा; इतर न करावा शूद्रादिक॥
जरी तो ब्राम्हण झाला कर्मभ्रष्ट; तुका म्हणे श्रेष्ठ तिहींलोकीं॥ १॥

२

झाली गाढवी दुधाळ, माहिमा गाईची पावेल! ॥
श्वान झालेसें चांगलें, तरि कां सांगाते जेविल! ॥

झाली शिंदळा चांगली; तरि कां पतिव्रता झाली? ॥
तुका ह्मणे नीच जाति, काय उंचपण पावती? ॥

साधुशिरोमणि जे तुकाराम महाराज त्यांचे हे कर्मकांडपर अभंग आहेत. वेदांतपर. अभंगानें जातिभेद मोडून टाकण्याचा यत्न करणें म्हणजे एखाद्या अर्मकानें सूर्यबिंबास हस्तगत करण्याचा प्रयत्न करणें हें होय. साधुराज पण ब्राम्हणांस श्रेष्ठत्व देत आहेत. जो ज्ञानी तो कधींही खोटें सांगणार नाहीं. जातिभेद नसावा. असें जर साधुराजांस वाटत होतें; तर त्यांनीं वरिल अभंग कां बरें तयार केला? सत्यशोधका, वडाची साल पिंपळास लावून कां कोठें सिध्दता होते? महासाधु पण ब्राम्हणांस पूज्य मानित होते; तर मग त्यांपुढें तुझी ती काय कथा ?

अरे, तुझ्या त्या खोडसाळपणामुळें साधुराजांवर खोटा आरोप नाहीं कां येत? जे स्पष्टरीतीनें जातिभेद कबूल करीत आहेत, त्यांच्याच ग्रंथांतील भिन्नविषयावर अभंग काढून स्वपक्ष सिद्ध केल्यानें त्या महासाधूच्या वाक्कुसुममालेस नाहीं कां दोष लागत? एके ठिकाणीं एक म्हणणें व दुसऱ्या ठिकाणीं दुसरें; असें साधुराज कधीं तरी म्हणाले असतील कां? तात्पर्य साधुराज तुकारामबुवा यांस जातिभेद हा कबूलच होता व तें ब्राह्मणांस विशेष पवित्र मानीत असत, हे वरील अभंगद्वयावरून नाहीं कां सिद्ध होत ?

सत्यशोधका, तुकाराम बुवा तर जातिभेद कबूलच करित आहेत, पण हल्लींचे तुमचे पुण्यग्रामस्थ “ सत्यप्रकाश” बंधु जे तुमच्या पंक्तीला बसून जेवतात; त्यांनीं “ दीनबंधु ” ला काय उत्तर दिलें आहे तें तूं वाचिलें आहेस कां? अरे, जें सत्य तें सत्यच. हें तूं कसा विसरलास?

" ब्राह्मणांस शिध्या देणें व स्वजातीयांनीं केलेल्या सत्यनारायणाच्या वगैरे पूजा, लग्नविधि, व अंत्यविधि यांची प्रसिद्धि करणें ह्यांतच आपली इतिकर्तव्यता व मागासलेल्या लोकांचें हित आडखून राहिलें आहे, असें आम्हांस वाटत नाहीं. "

सत्यप्रकाश तारीख ३१ माहे आगष्ट सन १८९१

तुमचे चांगले सुजाणते लोक काय ह्मणत आहेत? जे खरे विद्वान् ते कधींही खोटें मत देणार नाहींत हें निर्विवाद आहे. "उथळ पाण्यास खळखळ फार " अशी जी एक ह्मण आहे ती सत्यशोधकांस विशेष शोभते. सत्यप्रकाशसमाजांतील लोकांनीं जें मत दिलें आहे, तें अत्यंत आदरणीय असून सत्य आहे यांत संशय नाहीं. सारांश सत्यप्रकाशासारख्या आमच्या मराठेबंधूंनीं निपक्षपातपणानें दिलेलें मत सत्यशोधकांच्या काळजांस घरें पाडील, असें मानण्यास हरकत नाहीं.

सत्यशोधका, तुझ्या त्या धर्मढोंगपरिस्फोटनाचें आतां मात्र यथाशास्त्र खंडन झालें. तूं जर खरा सत्यशोधक असशील तर सत्यधर्माचा अंगिकार कर. आपले वडील व गुरु यांची निर्भर्त्सना केली आहेस त्याबद्दल न लाजतां, उघडपणानें क्षमा माग; ह्मणजे त्वां केलेल्या पापाची क्षमा सृष्टिकर्ता जो परमेश्वर तो तुला करील. तूर्त तुला एवढाच आशिर्वाद देऊन हा ग्रंथ सद्यः पुरा करितों.